CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६ | वर्ष ४ थे अंक १७४ | पाने १२ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

सर्व प्रकारचे युनिफॉर्म साड्या मिळतील
• शाळा • कॉलेज • भजनी मंडळ • गणपती मंडळ • केटरिंग • हॉस्पिटल व इतर सर्व प्रकारचे युनिफॉर्म मिळेल
घरगुती साडी विक्रेत्या महिलांसाठी व्यवसाय वाढवण्याची खास सुवर्णसंधी..!
N.R. DHOOT GROUP
धूत सिल्क सारीज्
महाराष्ट्राचे सिल्क वस्त्र वैभव

## विचारपुष्प



शाखेतला हुतुतु असा आहे. हिंदू राष्ट्राच्या निर्मितीचे मोठे काम आपल्याला करायचे आहे. ते करताना कष्टाचे जीवन जगावे लागणार आहे. ते कष्ट सुसह्य व्हावेत म्हणून हुतुतुचा खेळ हा विरंगुळा आहे.

**स्व. प्रल्हादपंत अभ्यंकर**
रा. स्व. संघाचे माजी महाराष्ट्र प्रांत संघचालक

# जितेंद्र मिश्रा राम मंदिर न्यासचे पहिले 'सीईओ'

## गोविंद देव गिरी नवीन सरचिटणीस • महेश भागचंदका खजिनदार

**अयोध्या, २ सप्टेंबर**

ऑपरेशन सिंदूर' दरम्यान 'वेस्टर्न एअर कमांड'चे नेतृत्व करणारे एअर मार्शल जितेंद्र मिश्रा (निवृत्त) यांची बुधवारी 'श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यास'चे पहिले मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) म्हणून नियुक्ती करण्यात आली. न्यासच्या बैठकीत नवीन सरचिटणीस आणि खजिनदाराचीही निवड करण्यात आली. गोविंद देव गिरी न्यासचे नवीन सरचिटणीस तर महेश भागचंदका नवीन खजिनदार म्हणून काम पाहतील.

न्यासच्या बैठकीत मदन मोहन पांडे (अयोध्या) आणि डॉ. निर्मला यादव (अयोध्या) या नवीन सदस्यांचीही निवड करण्यात आली.

५,५८५ अर्जांमधून निवडलेल्या तीन उमेदवारांच्या अंतिम यादीतून मिश्रा यांची निवड करण्यात आली. मंदिराच्या देणग्यांच्या कथित अपहारावरून निर्माण झालेल्या वादामुळे आठ जणांना अटक आणि चंपत राय यांनी सरचिटणीसपदाचा दिलेला राजीनामा, या पृष्ठभूमीवर जितेंद्र मिश्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.




गोविंद देव गिरी | महेश भागचंदका

निवड समितीचे नेतृत्व निवृत्त न्या. प्रमोद कोहली यांनी केले आणि या समितीत निवृत्त लेफ्टनंट जनरल विष्णुकान्त चतुर्वेदी व माजी शास्त्रज्ञ सुरेश हावरे यांचा समावेश होता. समितीने आपला अंतिम अहवाल मंगळवारी न्यासचे कोषाध्यक्ष गोविंद देव गिरी यांच्याकडे सादर केला.

नेतृत्वक्षमता, व्यवस्थापन कौशल्य, सचोटी आणि दूरदृष्टी यांचे मूल्यमापन केल्यानंतर समितीने तीन अत्यंत पात्र व्यावसायिकांची शिफारस केली होती, असे समितीचे सचिव समीर पांडा यांनी सांगितले. कथित देणगी अपहार उघडकीस आल्यानंतर न्यासची ही तिसरी बैठक होती. सीईओ निवड प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने केलेली छाननी आणि प्रत्यक्ष मूल्यमापन या दोन्ही पद्धतींचा समावेश होता, असे न्यासच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. प्राप्त झालेल्या ५,५८५ अर्जांपैकी ३,५७७ उमेदवारांनी ६०० गुणांच्या आराखड्यानुसार मूल्यमापनासाठी आवश्यक तपशील सादर केले. त्यानंतर ही प्रक्रिया अशा १०८ उमेदवारांपर्यंत मर्यादित झाली. या उमेदवारांनी आभासी संवादांमध्ये ४७० किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवले होते. त्यानंतर ११ आणि १२ ऑगस्ट रोजी अयोध्येत १६ उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या. ◂ (वृत्तसंस्था)



"इतक्या अनेक पात्र उमेदवारांमधून या पदासाठी माझी निवड होणे, ही माझ्यासाठी अत्यंत भाग्याची गोष्ट आहे. हा भगवान श्रीरामाचा आशीर्वाद असल्याचे मी मानतो. भारतीय वायुदलात ४३ वर्षे देशाची सेवा केल्यानंतर, आता मला श्री राम मंदिर आणि श्रीरामांच्या भक्तांची सेवा करण्याची ही पवित्र संधी मिळाली आहे."

**जितेंद्र मिश्रा,** राम मंदिर न्यासाचे 'सीईओ'

### हवाई दलात ४३ वर्षे सेवा

जितेंद्र मिश्रा मूळचे उत्तरप्रदेशातील देवरिया जिल्ह्याचे आहेत. त्यांना 'ऑपरेशन सिंदूर'मधील भूमिकेसाठी सर्वोत्तम युद्ध सेवा पदक प्रदान करण्यात आले. त्यांच्या प्रदीर्घ लष्करी कारकीर्दीत त्यांना अति विशिष्ट सेवा पदक आणि विशिष्ट सेवा पदकही देण्यात आले होते. ६ डिसेंबर १९८६ रोजी भारतीय वायुदलात नियुक्त झालेले लढाऊ वैमानिक मिश्रा यांनी ३० एप्रिल २०२६ रोजी निवृत्त होण्यापूर्वी ३९ वर्षांहून अधिक काळ सेवा दिली.

**कारगिल युद्ध आणि 'ऑपरेशन सिंदूर'मधील योद्धा**
(पान ३ वर...)

# दिशा सालियानच्या मृत्यूची सीबीआय चौकशी करा

## मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश | तपासातील दिरंगाईबद्दल पोलिसांना फटकारले

**मुंबई, २ सप्टेंबर**

दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूतची माजी व्यवस्थापक दिशा सालियानच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणाची सीबीआय चौकशी करा, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी दिला. तपासातून उत्तरे मिळण्याऐवजी प्रश्नच जास्त उपस्थित झाले आहेत, असे न्यायालयाने या प्रकरणी एफआयआर दाखल न केल्याबद्दल पोलिसांना फटकारताना म्हटले.



एखाद्या प्रकरणाचा तपास अवाजवी काळापर्यंत चालू राहू शकत नाही आणि या प्रकरणात केंद्रीय यंत्रणेमार्फत तपास होणे आवश्यक होते, असे न्या. सारंग कोतवाल आणि न्या. रणजितसिंह राजा भोसले यांच्या खंडपीठाने म्हटले. पोलिसांनी या प्रकरणाकडे केवळ अपघाती मृत्यू म्हणून पाहिले आणि त्यांच्या तपासातील स्पष्ट विसंगती निदर्शनास आल्या आहेत, असे खंडपीठाने पोलिसांना फटकारले.

दिशा सालियानचा २०२० मध्ये ज्या परिस्थितीत मृत्यू झाला, त्यावर तिच्या वडिलांनी शंका उपस्थित करीत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या प्रकरणात सहा वर्षांपासून तपास सुरू आहे. पोलिसांनी केलेल्या तपासात उत्तरे मिळण्याऐवजी प्रश्नच जास्त उपस्थित झाल्याने हा तपास सीबीआयकडे सोपवणे आवश्यक झाले, असे न्यायालयाने स्पष्ट केले. या प्रकरणात एफआयआर दाखल करून दिशाचे वडील सतीश सालियान यांचे बयाण नोंदवा, असा आदेश न्यायालयाने सीबीआयला दिला. मात्र, तपासादरम्यान पुरेसे पुरावे मिळाल्याखेरीज कुणालाही आरोपी म्हणून वागणूक देऊ नका, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

सतीश सालियान यांनी उबाठा गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची मागणी केली. मात्र, तपास करणे ही केंद्रीय तपास यंत्रणेची जबाबदारी असल्याचे नमूद करीत न्यायालयाने कोणत्याही व्यक्तीविरुद्ध भाष्य करणे टाळले. पोलिस तपासात अनेक ठळक विसंगती आहेत. त्यामुळे एका योग्य आणि सखोल तपासाची गरज निर्माण झाली आहे, असे न्यायालयाने ४४ पानांच्या निकालात म्हटले.

दिशा सालियन जिथे पडलीत्या ठिकाणी रक्त न आढळल्यामुळे आणि तिच्या डोक्यावर रक्तस्त्राव होईल अशी कोणतीही जखम नसल्यामुळेही शंका निर्माण झाली. व्यक्ती बाराव्या मजल्यावरून तोंडावर पडली, तर मृतदेहाच्या हनुवटीवर केवळ एकच जखम होती हे मान्य करणे कठीण आहे, असे न्यायालयाने म्हटले. ◂ (वृत्तसंस्था)

### घटनास्थळाचा पंचनामा उशिरा

पोलिसांनी केलेल्या तपासातील काही त्रुटी न्यायालयाच्या निदर्शनास आल्या. घटनास्थळाचा पंचनामा उशिरा करण्यात आला होता. तसेच घटनास्थळी रक्त न आढळल्यामुळे आणि तिच्या डोक्यावर कोणतीही जखम नसल्यामुळेही शंका निर्माण झाली. बाराव्या मजल्यावरून पडूनही हनुवटीवर केवळ एकच जखम होती हे मान्य करणे कठीण आहे. चेहऱ्याचे एकही हाड मोडलेले नव्हते. हे आम्हाला पटण्यासारखे वाटत नाही, असे उच्च न्यायालयाने म्हटले.

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात घसरण

**मुंबई :** पश्चिम आशियातील वाढत्या भूराजनीतिक तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली मोठी वाढ आणि कमकुवत जागतिक संकेतांमुळे भारतीय शेअर बाजारात सलग तिसऱ्या दिवशी घसरण पाहायला मिळाली. बुधवारच्या सत्रात भारतीय शेअर बाजारातील दोन्ही प्रमुख निर्देशांक घसरणीसह बंद झाले. बुधवारी भारतीय निर्देशांकांची सुरुवात जागतिक बाजारातील नकारात्मक वातावरणामुळे घसरणीने झाली. दिवसभरातील विक्रीच्या दबावामुळे निफ्टीने २३,७८६.८० या सत्रातील सर्वात सखल पातळीला स्पर्श केला. मात्र, क्लोजिंग ऑक्शन सेशन नंतर निफ्टी पुन्हा एकदा २३,९०० च्या पातळीवर बंद होण्यात यशस्वी ठरला. सत्र अखेरीस सेन्सेक्स ३७३.९३ अंक घसरणीसह ७६,५७०.३५ वर बंद झाला. तर निफ्टी १४१.३५ अंक घसरणीसह २३,९१४.४५ च्या पातळीवर बंद झाला.

### शेतशिवारात बिबट्याची दहशत

**तेल्हारा :** तालुक्यातील बेलखेड-कोठा शेतशिवारात वान धरणाच्या बेलखेड शिवारातील योगेश तायडे नामक शेतकऱ्याच्या शेतातील निंबाच्या झाडावर मृतावस्थेत अडकलेले हरीण आढळून आल्याने दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याने हरणाची शिकार करून निंबाच्या झाडावर हरणाचा फडशा पाडल्याची चर्चा हिंगणी, कोठा, रायखेड, बेलखेड परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आहे. शेतकरी, शेतमजूर कथित बिबट्याच्या दहशतीने धास्तावले आहेत. माहिती प्राप्त होताच वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले.

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

# मूळ विचारधारा डावलल्याने पक्षात फूट

## शिवसेनेच्या वकिलाचा युक्तिवाद; उबाठाचे दावे निराधार

**नवी दिल्ली, २ सप्टेंबर**

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या हक्कावरून सुरू असलेल्या कायदेशीर लढाईत सर्वोच्च न्यायालयात बुधवारी शिवसेना पक्षाच्या वकिलाने केलेल्या युक्तिवादात उबाठाचे दावे फेटाळत मूळ विचारधारा डावलल्याने पक्षात फूट पडल्याचे सांगितले. एखाद्या राजकीय पक्षाला चिन्ह मिळण्यासाठी त्यांना मिळालेल्या जागा आणि मते हे महत्त्वाचे निकष असतात असे सुभाष देसाई खटल्यातील निकालात म्हटले असल्याचे त्यांनी न्यायासनाच्या लक्षात आणून दिले.

उबाठा गटाच्या युक्तिवादानंतर शिवसेना पक्षाचे वकील नीरज कौल यांनी बुधवारपासून अंतिम युक्तिवादाला सुरुवात केली. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जयमाल्य बागची आणि न्या. व्ही. मोहन यांच्या न्यायासनासमोर झालेल्या सुनावणीवेळी बाजू मांडताना कौल यांनी म्हटले की, निवडणूक आयोगाने पक्षाच्या घटनेची तपासणी करण्याचे अधिकार क्षेत्र स्वतःहून निर्माण केले, जे यापूर्वी अस्तित्वात नव्हते. १९९४ पासून विविध आदेशांद्वारे आणि पत्रव्यवहाराद्वारे निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना त्यांच्या पक्षाच्या घटना लोकशाहीवादी असाव्यात असे सूचित केले. जर पक्षात एकतर्फी कारभार किंवा मनमानी असेल तर बहुमताचा निर्णय कसा घ्यायचा? यासंदर्भात निवडणूक आयोगाने चौकट आखून देताना पक्षात निवडणुका होणे आवश्यक आहे आणि केवळ १-२ सदस्यांनी बहुसंख्य सदस्यांची नियुक्ती करणे योग्य नाही असे स्पष्ट केले होते.

#### पुराव्याचा अभाव

निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार १९९९ मध्ये जी लोकशाहीवादी घटना स्वीकारली गेली होती, तिचे स्वरूप या नवीन घटनेमुळे पूर्णपणे कसे बदलले हा महत्त्वाचा प्रश्न आहे. निवडणूक आयोगाला आम्ही २०१८ च्या घटनेबाबत कळवले होते असा समोरच्यांचा बचाव आहे, परंतु निवडणूक आयोगाने २०१८ ची घटना उपलब्ध नसल्याचे सांगितले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### घटनापीठाच्या निकालाचे उल्लंघन नाही

एखाद्या राजकीय पक्षाला चिन्ह मिळण्यासाठी त्यांना मिळालेल्या जागा आणि मते हे महत्त्वाचे निकष असतात असे सुभाष देसाई खटल्यातील निकालात म्हटले आहे. ज्या दिवशी निवडणूक आयोगाचा आदेश आला, त्या दिवशी सुभाष देसाई खटल्यातील निकाल आलेला नव्हता. त्यामुळे निवडणूक आयोगाने घटनापीठाच्या निकालाचे उल्लंघन केले असे म्हणता येणार नाही.

# पोषण आहारातील दोषासाठी शिक्षक जबाबदार

## शिक्षण विभागाची शाळांना ११ कलमी सूचना

**मुंबई, २ सप्टेंबर**

शाळेत मिळणारा पोषण आहार विद्यार्थ्यांसाठी केवळ दुपारचे जेवण नाही, तर अनेक मुलांसाठी दिवसातील महत्त्वाचा पौष्टिक आहार असतो. त्यामुळे त्यांच्या ताटात वाढला जाणारा प्रत्येक घास स्वच्छ, सुरक्षित आणि पौष्टिक असावा आणि त्याची चव घेऊनच विद्यार्थ्यांना द्यावा. आहारात दोष आढळल्यास याची जबाबदारी शिक्षकांची असेल आणि हलगर्जीपणा झाल्याचे समोर आल्यास शाळा प्रशासनावर कारवाई केली जाईल अशा सक्तीच्या सूचना शिक्षण विभागाने जारी केल्या आहेत.

चंद्रपूरच्या जिवती तालुक्यातील एका आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पोषण आहारात पाल पडल्याने ३० विद्यार्थ्यांना विषबाधा झाली होती. तसेच, आहारासंदर्भात अनेक तक्रारी मिळाल्याची दखल घेत शिक्षण विभागाने बुधवारी शाळांसाठी ११ कलमी सूचना जारी केल्या आहे. यात विद्यार्थ्यांना आहार देण्यापूर्वी धान्याचा दर्जा, स्वयंपाकाची स्वच्छता, पाण्याची गुणवत्ता आणि तयार अन्नाची चव याची काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती शिक्षण संचालक, प्राथमिक शरद गोसावी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारेही दिली. राज्यात इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पीएम-पोषण योजनेतून आहार दिला जातो. प्राथमिक विद्यार्थ्यांच्या आहारातून ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने, तर उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने मिळणे अपेक्षित आहे. पुरवठादाराकडून आलेला तांदूळ आणि इतर धान्य योग्य दर्जाचे व योग्य वजनाचे आहे का, याची खात्री करण्याची आणि गुणवत्ता तपासण्याची जबाबदारी शिक्षकांची राहणार आहे. आहार देण्यापूर्वी शिक्षकांना चव घ्यावी लागेल त्यानंतरच विद्यार्थ्यांना तो देण्यात यावा. ◂ (वृत्तसंस्था)

### मैदानावर नाही, स्वच्छ जागेत जेवण

विद्यार्थ्यांनी मातीवर किंवा मैदानात बसून जेवू नये, यासाठी शाळांनी स्वच्छ बैठक व्यवस्था करावी. शाळेच्या आवारापासून ५० मीटर परिसरात जास्त फॅट, साखर व मीठ असलेले पदार्थ, तसेच प्रतिबंधित जंक फूड विकण्यास बंदी आहे. याबाबत दर्शनी भागात फलक लावण्याचेही निर्देश आहेत. विद्यार्थ्यांना आहार देण्यापूर्वी माता-पालकांकडून त्याची चव तपासली जाणार आहे. त्यांचा अभिप्राय चव नोंद रजिस्टरमध्ये नोंदवावा लागणार आहे. मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समितीनेही दररोज आहाराची चव घेऊन गुणवत्ता तपासावी लागेल. जिल्हा आणि तालुकास्तरीय भरारी पथके शाळांना अचानक भेट देऊन आहाराची गुणवत्ता व स्वच्छता तपासणार आहेत.



भारताने स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करीत विकसित केलेल्या दीर्घपल्ल्याच्या खागंतक-२४३ या 'ग्लायडेड बॉम्ब'ची चाचणी हवाई दलाने बुधवारी अज्ञातस्थळी घेतली. ही चाचणी यशस्वी झाल्याचे हवाई दलाने म्हटले आहे

# 'स्क्रीनशॉट' असलेले तिकिट ठरणार अवैध

**नवी दिल्ली, २ सप्टेंबर**

रेल्वेत प्रवास करताना तिकिटाचा केवळ स्क्रीनशॉट दाखवणे पुरेसे ठरणार नाही. विशेषतः, दुसऱ्या मोबाईलवर पाठवलेली तिकिटे वैध मानली जाणार नाहीत. हा नियम न समजल्यास तिकीट तपासणीदरम्यान अडचणी येऊ शकतात आणि दंडही होऊ शकतो, असे भारतीय रेल्वेने स्पष्ट केले आहे. पश्चिम मध्य रेल्वेच्या कोटा विभागानुसार, 'रेल वन' अॅपद्वारे बुक केलेली तिकिटे केवळ त्याच मोबाईल फोनवर वैध असतील, ज्यावर अॅप नोंदणीकृत आहे आणि ज्यावरून तिकीट बुक केले आहे. जर तिकिटाचा स्क्रीनशॉट व्हॉट्सअॅप किंवा इतर कोणत्याही माध्यमातून पाठवला गेला, तर तो वैध मानला जाणार नाही. प्रवाशांनी तिकीट तपासणीदरम्यान वापरलेला तोच मोबाईल फोन दाखवणे आवश्यक आहे. डिजिटल तिकीट दाखवण्यासाठी मोबाईल फोन चालू असणे आणि त्यात पुरेशी बॅटरी असणे आवश्यक आहे.

रेल्वेने प्रवाशांना केवळ त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल फोनवरूनच तिकीट बुक करण्याचा आणि प्रवासादरम्यान तोच फोन सोबत ठेवण्याचा सल्ला दिला आहे. यामुळे तिकीट तपासणीच्या वेळी होणारा त्रास टळेल. रेल्वेने म्हटले आहे की, ट्रेनमध्ये चढण्यापूर्वी प्रवाशांकडे वैध तिकीट असणे आवश्यक आहे. तिकीटाशिवाय ट्रेनमध्ये चढल्यानंतर मोबाईल वापरून अनारक्षित तिकीट काढता येणार नाही. याचा अर्थ, तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी दिलेली तिकिटे वैध असणार नाहीत.
◂ (वृत्तसंस्था)

# समुद्राची पातळी वाढल्याने मुंबई-कोलकाताला धोका

**मुंबई, २ सप्टेंबर**

समुद्राच्या पातळीत झपाट्याने होणारी वाढ ही जगभरातील लोकसंख्येसाठी अत्यंत गंभीर धोक्यांपैकी एक ठरली आहे. वाढत्या जलपातळीमुळे भारतातील मुंबई, कोलकाता आणि बांगलादेशातील ढाका यांसारख्या शहरांमधील लाखो लोकांचा जीव संकटात असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालात नमूद करण्यात आले आहे.

हिमनद्या वितळणे आणि महासागरांच्या तापमान वाढीने सागराच्या पातळीत वेगाने वाढ होत आहे. 'समुद्रसपाटीची वाढ, आव्हाने आणि त्यावरील उपाययोजना' या सोमवारी प्रसिद्ध झालेल्या संयुक्त राष्ट्र महासचिवांच्या अहवालानुसार, समुद्राची पातळी वाढल्याने शहरी पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, ऊर्जा ग्रीड, इमारती आणि भूजल संसाधनांचे मोठे नुकसान आधीच सुरू झाले आहे. याचे दूरगामी परिणाम दीर्घकालीन विकास आणि आर्थिक स्थिरतेवर होत आहेत. दक्षिण आशियातील सखल डेल्टा भाग आणि मुंबई-कोलकाता यांसारख्या शहरांमध्ये १.४ कोटींपेक्षा जास्त लोकांचे क्षेत्र कायमस्वरूपी पाण्याखाली जाण्याचा थेट धोका आहे.




२०१४ ते २०२३ या काळात, जागतिक समुद्रसपाटीत दरवर्षी ४.७ मिमीने वाढ झाली. २०२४ मध्ये समुद्रसपाटीत ५.९ मिमीने वाढ झाली, ज्यामुळे एक नवीन विक्रम प्रस्थापित झाला. याचे मुख्य कारण महासागरांचे अति-तापमान वाढणे हे आहे. काही प्रदेशांमध्ये तापमान वाढीचा वेग मागील चार हजार वर्षांतील सर्वाधिक आहे. २०५० पर्यंत हा वेग आणखी वाढण्याची शक्यता आहे. अहवालानुसार, सुमारे ७७ कोटी लोक, जे जागतिक लोकसंख्येच्या साधारणपणे १० टक्के आहेत ते किनारपट्टीच्या भागात राहतात आणि त्यांना मोठ्या धोक्यांचा सामना करावा लागत आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### पर्यावरणावर होताहेत गंभीर परिणाम

तटीय भागात महापूर, पिण्याचे पाणी खारे होणे, जमिनीची धूप आणि परिसंस्थेचा ऱ्हास यांमुळे अर्थव्यवस्था, संस्कृती आणि पर्यावरणावर गंभीर परिणाम होत आहेत. कृषी, पर्यटन आणि व्यापाराचे होणारे नुकसान टाळण्यासाठी दीर्घकालीन योजना, आपत्कालीन निधी, अचूक वैज्ञानिक डेटा आणि मजबूत तांत्रिक व कायदेशीर चौकटीची तातडीने गरज असल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

# शासकीय विभागातील भ्रष्टाचाराच्या ७० हजार तक्रारी

**नवी दिल्ली, २ सप्टेंबर**

गेल्या वर्षी सरकारी विभागांविरुद्ध भ्रष्टाचाराच्या ७०,५०० हून अधिक तक्रारी प्राप्त झाल्या, ज्यात बँका आणि रेल्वेविरुद्ध सर्वाधिक तक्रारी प्राप्त झाल्याची माहिती केंद्रीय दक्षता आयोगाच्या अहवालातून समोर आली.

आयोगाच्या वतीने काम करणाऱ्या मुख्य दक्षता अधिकाऱ्यांना एकूण ७०,५८४ तक्रारी प्राप्त झाल्या. यापैकी, ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ६४,९०५ तक्रारींचे निराकरण करण्यात आले. २०२५ च्या अखेरपर्यंत एकूण ५,६७९ तक्रारींची चौकशी झाली नव्हती. यापैकी २,००२ तक्रारी तीन महिन्यांपेक्षा जास्त काळापासून प्रलंबित होत्या. तीन महिन्यांच्या आत तक्रारींची चौकशी पूर्ण केली जाणार आहे. बँकांविरुद्ध सर्वाधिक ९,९३३ तक्रारी प्राप्त झाल्या. यापैकी ९,५२० तक्रारींचे निराकरण करण्यात आले, तर ४१३ तक्रारी प्रलंबित राहिल्या.

रेल्वेसंबंधित ९,३८१ तक्रारी प्राप्त झाल्या. यापैकी ८,७५४ तक्रारींचे निराकरण करण्यात आले, तर ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ६२७ तक्रारी प्रलंबित राहिल्या. गृहनिर्माण आणि शहरी व्यवहारसंबंधित एकूण ६,५३१ तक्रारी प्राप्त झाल्या. गेल्या वर्षी प्राप्त झालेल्या ४,११८ तक्रारी कोळसा क्षेत्रातील कामगारांशी संबंधित होत्या. ◂ (वृत्तसंस्था)

## अंतरंग

| | |
|---|---|
| २ | दक्षिण विभाग दुलिप ट्रॉफीच्या अंतिम फेरीत |
| ३ | मंदाकिनीचे रौद्ररूप; रामघाट पुन्हा पाण्याखाली |
| ४ | नोकरशाहीला 'सुप्रीम' चपराक (अग्रलेख) |
| ८ | तीन दशकांच्या राजकीय संघर्षानंतर स्नेहभेट |

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### ब्राझील, उरुग्वेविरुद्धचे सामने महत्त्वाचे टप्पे

**नवी दिल्ली :** पाच वेळा विश्वविजेते ठरलेल्या ब्राझील आणि दोन वेळा विजेते ठरलेल्या उरुग्वेविरुद्ध त्यांच्याच घरच्या मैदानावर खेळणे हे एक स्वप्न सत्यात उतरण्यासारखे आहे आणि भारतीय फुटबॉलसाठी हा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल, असे मत भारताचे राष्ट्रीय संघाचे मुख्य प्रशिक्षक खालिद जमील यांनी व्यक्त केले. त्यांच्या मते, हे सामने भारताला पुढील वर्षी होणाऱ्या आशियाई कप पात्रता फेरीसाठी तयारी करण्यास मदत करतील. त्यांनी सांगितले, हा भारतीय फुटबॉलसाठी एक महत्त्वाचा टप्पा असेल. आम्ही ब्राझीलविरुद्ध पहिल्यांदाच खेळणार आहोत. आपण सकारात्मक विचार केला पाहिजे. आपण एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित केले पाहिजेः भारताने पुढे जायलाच हवे. २०२७ च्या आशियाई कपसाठी पात्र ठरणे हे आमचे मुख्य ध्येय आहे, असे जमील म्हणाले.

### कसोटी क्रिकेट माझ्या रक्तात : तिलक वर्मा

**बंगळुरू :** प्रत्येक तरुण खेळाडूप्रमाणे, भारतीय टी-२० संघाचा उपकर्णधार तिलक वर्माचेही कसोटी क्रिकेट खेळण्याचे स्वप्न आहे आणि त्याचा विश्वास आहे की खेळाचा हा सर्वात दीर्घ प्रकार त्याच्या रक्तातच आहे. उत्तर विभागाविरुद्धच्या दुलिप ट्रॉफीच्या उपांत्य सामन्यात दक्षिण विभागाकडून खेळताना ११६ आणि नाबाद ५१ धावा करून तिलकने पुन्हा एकदा लाल चेंडूच्या क्रिकेटमधील (दीर्घ स्वरूप) आपली क्षमता सिद्ध केली. त्याच्या या शानदार कामगिरीमुळे दक्षिण विभागाला अंतिम फेरीत पोहोचण्यास मदत झाली. आपल्या संघाच्या विजयानंतर तिलक म्हणाला, मला सुरुवातीपासूनच लाल चेंडूचे क्रिकेट खेळायला आवडते. मी भारतासाठी मर्यादित षटकांचे क्रिकेट खेळण्याचे कधीच स्वप्न पाहिले नव्हते, पण ही देवाची इच्छा होती. मी भारतासाठी टी-२० आणि एकदिवसीय सामन्यांमध्ये पदार्पण केले आहे, पण लाल चेंडूचे क्रिकेट हे माझे बलस्थान राहिले आहे. तिलकने गेल्या तीन वर्षांत ५३ टी-२० आंतरराष्ट्रीय आणि पाच एकदिवसीय सामने खेळले आहेत, पण असे असूनही मी लाल चेंडूने सराव करणे सुरूच ठेवले आहे. दीर्घकालीन क्रिकेट हा माझा मजबूत पैलू राहिला आहे आणि मला कसोटी क्रिकेट खेळायला आवडते. ही गोष्ट नेहमीच माझ्या रक्तात भिनलेली असल्याचे तो म्हणाला.

### मिझोरममध्ये क्रीडा सुविधांचे आश्वासन

**आयझॉल :** केंद्रीय युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी मिझोरममधील क्रीडा प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि खेळाडूंना, विशेषतः मुष्टियोद्ध्यांना भेडसावणाऱ्या पायाभूत सुविधांशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले आहे. राज्यातील भारतीय जनता पक्षाने बुधवारी एका निवेदनात ही घोषणा केली. निवेदनानुसार, मांडविया यांनी मंगळवारी नवी दिल्लीत राज्य भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष रॉबिन्सन मालसावमतलुआंगा ह्मार आणि उपाध्यक्ष एच. मालसावमतलुआंगा यांच्यासोबत झालेल्या बैठकीदरम्यान हे आश्वासन दिले. ह्मार यांनी केंद्रीय मंत्र्यांना आवाहन केले की, मिझो युवकांना क्रीडा क्षेत्रात अधिक पाठिंबा आणि संधी द्याव्यात आणि सुविधांमध्ये सुधारणा करावी, जेणेकरून राज्यातील अधिक खेळाडू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करू शकतील. निवेदनानुसार, ह्मार यांनी मांडविया यांना सांगितले की, मिझोरममध्ये क्रीडा प्रतिभेची कमतरता नाही आणि २०३६ च्या ऑलिम्पिक खेळांच्या यजमानपदासाठी भारताच्या प्रस्तावित बोलीच्या पृष्ठभूमीवर राज्यात आधुनिक क्रीडा पायाभूत सुविधांची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. मांडविया यांनी भाजप नेत्यांना आश्वासन दिले की, मिझोरममध्ये खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि राज्यातील तरुण खेळाडूंना पाठिंबा देण्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल.

# दक्षिण विभाग दुलिप ट्रॉफीच्या अंतिम फेरीत

## तिलक वर्माचे अर्धशतक, आता गाठ पूर्व विभागाशी

**बंगळुरू, २ सप्टेंबर**

कर्णधार तिलक वर्माच्या नाबाद अर्धशतकाच्या जोरावर दक्षिण विभागाने बुधवारी येथे झालेल्या उपांत्य फेरीच्या चौथ्या आणि अंतिम दिवशी उत्तर विभागावर सात गडी राखून विजय मिळवत दुलिप ट्रॉफीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. उत्तर विभागाने दिलेल्या १८१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, तिलक वर्मा (नाबाद ५१) आणि रविचंद्रन स्मरमन (नाबाद ३२) यांच्यातील चौथ्या गड्यासाठीच्या अभेद्य ८० धावांच्या भागीदारीच्या जोरावर दक्षिण विभागाने विजय मिळवला. दुसऱ्या सत्राच्या अखेरीस तीन गडी गमावून १८२ धावा करत दक्षिण विभागाने विजय निश्चित केला. सामनावीर तिलक वर्मा ठरला.


फटका मारताना सामनावीर तिलक वर्मा

आता ६ सप्टेंबरपासून चेन्नईमध्ये होणाऱ्या विजेतेपदाच्या लढतीत त्यांचा सामना पूर्व विभागाशी होईल.

पहिल्या डावात नाबाद ११६ धावा करून दक्षिण विभागाला ११७ धावांची महत्त्वपूर्ण आघाडी मिळवून देणारा तिलक, जेव्हा त्याच्या संघाने १०२ धावांत तीन गडी गमावले होते, तेव्हा फलंदाजीसाठी आला. अफगाणिस्तानविरुद्धच्या भारताच्या आगामी टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी उपकर्णधार म्हणून निवड झालेल्या डावखुरा फलंदाज तिलकने वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रार आणि डावखुरा फिरकी गोलंदाज आबिद मुश्ताक यांच्या नेतृत्वाखालील उत्तर विभागाच्या गोलंदाजीचा सामना करण्यासाठी पुन्हा एकदा उत्कृष्ट संयम आणि तंत्र दाखवले.

ब्रारने वेगवान आणि शरीराला लागून येणाऱ्या चेंडूंनी तिलकची सातत्याने परीक्षा घेतली, तर मुश्ताकने खेळपट्टीच्या असमान उसळीचा फायदा घेत त्याच्या फूटवर्कला आव्हान दिले. तिलकने ऑफ साईडला काही उत्कृष्ट फटके मारून या आव्हानांना शानदारपणे तोंड दिले. स्मरणने दुसऱ्या टोकावरून त्याला चांगली साथ दिली. त्याने निशांत सिंधूच्या गोलंदाजीवर मारलेला जोरदार फटका लक्षवेधी होता.

नारायण जगदीशन (४३), रिकी भुई (४२) आणि शेख रशीद हे सुरुवातीलाच बाद होऊनही, तिलक आणि स्मरण यांच्या आत्मविश्वासपूर्ण खेळीमुळे दक्षिण विभागाने लक्ष्य गाठले. जगदीशन आणि भुई यांनी पहिल्या गड्यासाठी ६४ धावांची भागीदारी केली होती. सामन्याच्या चारही दिवस फलंदाजी करणाऱ्या तिलकने, अर्धवेळ लेग-स्पिनर कामरान इक्बालच्या चेंडूवर कव्हरवरून चौकार मारून अखेर दक्षिण झोनचा विजय निश्चित केला.

यापूर्वी, उत्तर विभागाने आपल्या दुसऱ्या डावात सात गडी गमावून २५६ धावांवर दिवसाची सुरुवात केली होती आणि त्यांच्याकडे १३९ धावांची आघाडी होती. अंशुल कंबोजच्या २९ चेंडूंतील आक्रमक ३६ धावांच्या खेळीमुळे संघाला आपली आघाडी १८० धावांच्या पुढे नेण्यास मदत झाली.

खचत चाललेली खेळपट्टी आणि चेंडूच्या असमान उसळीमुळे दक्षिण विभागाला हे लक्ष्य गाठणे कठीण वाटत होते, परंतु उत्तर विभागाच्या खराब क्षेत्ररक्षणामुळे दक्षिण विभागाला या बिकट परिस्थितीतून सावरण्यास मदत झाली. अखेरीस, तिलक आणि स्मरण यांनी सूत्रे हाती घेऊन दक्षिण विभागाला विजय मिळवून दिला आणि अंतिम फेरीत पोहोचवले. ◂ (वृत्तसंस्था)

# हाँगकाँगविरुद्ध उणिवा दूर करण्याचा भारताचा प्रयत्न

## महिला आशिया कप स्पर्धेत आज सामना

**दुबई, २ सप्टेंबर**

थायलंडविरुद्ध सलामीच्या सामन्यात मोठा विजय मिळवूनही, भारतासाठी फलंदाजी ही एक चिंतेची बाब आहे आणि महिला टी-२० आशिया कपमध्ये पाकिस्तानचा सामना करण्यापूर्वी, गुरुवारी हाँगकाँगविरुद्धच्या सामन्यात ते ही उणीव दूर करण्याचा प्रयत्न करतील.

एकदिवसीय सामन्यांमध्ये चार आणि टी-२० मध्ये तीन आशिया कप विजेतेपदे पटकावलेला भारतीय संघ, थायलंडविरुद्धच्या आपल्या पहिल्या सामन्यात अपेक्षित कामगिरी करण्यात अपयशी ठरला. भारताने सामन्याची चांगली सुरुवात केली. १० षटकांत दोन गडी गमावून १०१ धावा केल्या होत्या आणि २०० पेक्षा जास्त धावा करण्याच्या तयारीत होता, परंतु २९ धावांत सात गडी गमावून केवळ १५९ धावाच करू शकला.

मात्र, याचा सामन्याच्या निकालावर परिणाम झाला नाही, कारण भारताने थायलंडचा ९४ धावांनी सहज पराभव केला. या सामन्यात मोठा विजय मिळवूनही, भारतीय संघ व्यवस्थापनाला आत्मसंतुष्ट राहणे परवडणारे नाही, कारण एका अव्वल संघाविरुद्ध अशी कामगिरी महागात पडू शकते. भारताला हाँगकाँगविरुद्ध विजय मिळवण्यात कोणतीही अडचण येणार नाही, आणि म्हणूनच, ते या सामन्यात उत्तम फलंदाजी करण्यासाठी कटिबद्ध असतील.



हरमनप्रीत कौर, मरियम बिबी

पहिल्या सामन्यात भारतासाठी शेफाली वर्माने धडाकेबाज ६४ धावा करून शानदार कामगिरी केली, तर दीप्ती शर्मानेही एकही धाव न देता तीन बळी घेत आपले कौशल्य सिद्ध केले. यामुळे ती महिलांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वाधिक बळी घेणारी गोलंदाज ठरली.

परंतु दुखापतग्रस्त जेमिमा रॉड्रिग्जच्या जागी आलेल्या स्मृती मंधाना आणि प्रतिका रावल यांना आपल्या चांगल्या सुरुवातीचे मोठ्या धावसंख्येत रूपांतर करण्याची गरज आहे. कर्णधार हरमनप्रीत कौरसुद्धा आपल्या फॉर्मबद्दल आणि टी-२० क्रिकेटमधील भविष्याबद्दलच्या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी एक मोठी खेळी खेळण्याच्या प्रयत्नात असेल. आशिया कपनंतर, भारतीय संघ जपानमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होईल आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये अपेक्षित निकाल मिळवण्यात अपयशी ठरल्यामुळे, त्यांना त्यापूर्वी सर्वोत्तम कामगिरी करण्याची गरज असेल.

दुसरीकडे, हाँगकाँगला स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात थायलंडकडून सहा धावांनी पराभव पत्करावा लागला. १२१ धावांचे लक्ष्य गाठताना हाँगकाँगने सात गडी गमावून ११४ धावा केल्या. वेगवान गोलंदाज मरीना लॅम्पलॉफने ११ धावांत चार बळी घेतले आणि भारतीय फलंदाजांना तिच्यापासून सावध राहावे लागेल. ◂ (वृत्तसंस्था)

### भारत महिला चॅम्पियन्स यजमानपद भूषवणार

**नवी दिल्ली :** आयसीसीने महिला चॅम्पियन्स ट्रॉफीचे ठिकाण आणि तारखा जाहीर केल्या आहेत. सहा संघांची ही स्पर्धा भारतात १४ ते २८ फेब्रुवारी २०२७ दरम्यान आयोजित केली जाईल. सर्व सामने मुंबईतील क्रिकेट क्लब ऑफ इंडिया आणि वडोदरा येथील वडोदरा आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळले जातील. आयसीसीने सांगितले की, ही स्पर्धा मूळतः श्रीलंकेत आयोजित करण्याचे ठरले होते, परंतु आता ती भारतात हलवण्यात आली आहे. श्रीलंका क्रिकेटच्या प्रशासनात सरकारी हस्तक्षेपामुळे हा निर्णय घेण्यात आला.

# इवेरेव्हचा संघर्षमय विजय; रायबाकिना, गॉफ दुसऱ्या फेरीत


विजय मिळवल्यानंतर जर्मनीचा अलेक्झांडर इवेरेव्ह इटलीच्या लोरेन्झो सोनेगोशी हस्तांदोलन करताना

### यूएस ओपन टेनिस स्पर्धा

**न्यूयॉर्क, २ सप्टेंबर**

अव्वल मानांकित अलेक्झांडर इवेरेव्हने मंगळवारी येथील आर्थर ॲश स्टेडियमवर झालेल्या यूएस ओपन टेनिस स्पर्धेच्या पहिल्या फेरीतील सामन्यात चुरशीचा विजय मिळवला, तर एलेना रायबाकिना आणि कोको गॉफ यांनी सरळ सेटमध्ये विजय मिळवून पुढील फेरीत प्रवेश केला.

फ्रेंच ओपन चॅम्पियन इवेरेव्हने बिनमानांकित लॉरेन्झो सोनेगोचा धक्कादायक विजयाचा प्रयत्न हाणून पाडत, चार तास ५२ मिनिटे चाललेल्या रोमांचक सामन्यात ६-४, ३-६, ६-७(७), ७-५, ६-४ असा विजय मिळवला.

दुसरा आणि तिसरा सेट गमावल्यानंतर इवेरेव्हने जोरदार पुनरागमन करत इटलीच्या ८९ व्या क्रमांकावरील खेळाडू सोनेगोच्या आशा धुळीस मिळवल्या. सोनेगोविरुद्ध इवेरेव्हचा हा सलग सातवा विजय आहे. आपल्या १० व्या यूएस ओपनमध्ये सोनेगो कधीही दुसऱ्या फेरीच्या पुढे जाऊ शकलेला नाही.

सामन्यानंतर इवेरेव्ह म्हणाला, असा सामना जिंकता आल्याचा मला आनंद आहे. मला अशा सामन्याची गरज होती कारण गेल्या दोन स्पर्धांमध्ये माझी कामगिरी चांगली झाली नव्हती. कधीकधी तुम्ही संघर्ष करता आणि तुम्हाला अनुकूल निकाल मिळतो, आणि मला आशा आहे की भविष्यातही मी स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी करत राहीन.

दुसऱ्या मानांकित रायबाकिनाने १७ वर्षीय कॅलिफोर्नियन खेळाडू थिया फ्रोडिनचा ६-३, ६-२ असा पराभव केला. चौथ्या मानांकित गॉफनेही झेनेप सोन्मेझला ६-३, ६-४ असे हरवून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

पाचव्या मानांकित मारिया आंद्रीवाने इंडोनेशियन खेळाडू जेनिस जेनिस जेनचा ६-२, ६-२ असा पराभव केला, तर १७व्या मानांकित ॲलेक्स मैलाने मारी एस्टोइयानाचा ६-१, ६-२ असा पराभव केला. महिला एकेरीमध्ये, १२व्या मानांकित बेलिंडा बेन्सिकला अनपेक्षित पराभवाला सामोरे जावे लागले. कझाकस्तानच्या बिनमानांकित युलिया पुतिनत्सेवाकडून ती ४-६, ७-५, ६-३ ने पराभूत झाली. मॅडिसन कीजने सरळ सेटमध्ये विजय मिळवून पुढील फेरीत प्रवेश केला.

पुरुष गटात, अमेरिकेच्या नवव्या मानांकित टेलर फ्रिट्झने आपल्याच देशाच्या डार्विन ब्लँचला ६-३, ६-२, ६-४ ने पराभूत केले. मात्र, इटलीच्या पाचव्या मानांकित फ्लाविओ कोबोलीला अर्जेंटिनाच्या फ्रान्सिस्को कोमेसानावर ३-६, २-६, ६-३, ६-४, ६-४ ने विजय मिळवण्यासाठी पाच सेटपर्यंत संघर्ष करावा लागला.

गेल मॉनफिल्सने पहिला सेट गमावल्यानंतर जोरदार पुनरागमन करत अडोल्फो डॅनियल व्हॅलेजोला २-६, ६-१, ६-२, ६-० ने पराभूत केले आणि आपला ४० वा वाढदिवस संस्मरणीय बनवला.

मॉनफिल्स वर्षातील अंतिम ग्रँड स्लॅम स्पर्धेत सामना जिंकणारा सर्वात वयस्कर पुरुष खेळाडू ठरला. जिमी कॉनर्सने यापूर्वी २ सप्टेंबर १९९२ रोजी, वयाच्या ४० व्या वर्षी जेमी ओन्सिन्सला पराभूत करून हा पराक्रम साधला होता. ◂ (वृत्तसंस्था)

# लक्ष्य सेन बाहेर, श्रीकांत आणि तन्वी विजयी

### चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धा

**शेन्झेन, २ सप्टेंबर**

बुधवारी चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या पहिल्या फेरीत खराब कामगिरीमुळे लक्ष्य सेन स्पर्धेतून बाहेर पडला, तर किदाम्बी श्रीकांत आणि तन्वी शर्मा यांनी अनुक्रमे पुरुष आणि महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत सरळ गेममध्ये विजय मिळवून प्रवेश केला.



जागतिक चॅम्पियनशिप २०२१ कांस्यपदक विजेता लक्ष्यने अनेक चुका केल्या आणि तो कॅनडाच्या जागतिक क्रमवारीत नवव्या क्रमांकावर असलेल्या व्हिक्टर लाईकडून ३८ मिनिटांत १४-२१, ७-२१ असा पराभूत झाला. लाईने गेल्या महिन्यात जागतिक चॅम्पियनशिपमध्ये आपले दुसरे कांस्यपदक जिंकले होते.

कॅनडाच्या या खेळाडूकडून लक्ष्यचा हा तिसरा पराभव होता. लाईविरुद्धचा त्याचा एकमेव विजय यावर्षी मार्चमध्ये ऑल इंग्लंड चॅम्पियनशिपमध्ये झाला होता.

तथापि, अनुभवी भारतीय खेळाडू श्रीकांतने दुसऱ्या पुरुष एकेरीच्या सामन्यात चायनीज तैपेईच्या ची यू जेनला २१-१६, २१-१५ असे पराभूत करून दुसऱ्या फेरीत स्थान मिळवले. जागतिक चॅम्पियनशिप २०२१ चा रौप्यपदक विजेता आणि माजी जागतिक क्रमवारीत अव्वल असलेला श्रीकांत पुढील फेरीत लाईचा सामना करेल.

गेल्या महिन्यात तैपेई ओपनमध्ये आपले पहिले बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर विजेतेपद पटकावणाऱ्या तन्वीने, डेन्मार्कच्या अमाली शुल्झला २१-१६, २१-१७ असे हरवून महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. पंजाबच्या १७ वर्षीय तन्वीने गेल्या वर्षी गुवाहाटी येथे झालेल्या ज्युनियर जागतिक चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक जिंकले होते. ती पुढील फेरीत जपानच्या तोमोका मियाझाकीचा सामना करेल.

दोन वेळा जागतिक चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक विजेते सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनीही मलेशियाच्या जुनैदी आरिफ आणि कांग खाई शिंग या जोडीला २१-११, २१-१६ असे हरवून पुढील फेरीत प्रवेश केला. आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेती ही जोडी आता फ्रान्सच्या पोपोव्ह बंधू, क्रिस्टो आणि टोमा ज्युनियर यांचा सामना करेल.

भारतीय मिश्र दुहेरी जोडी ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो यांनी थायलंडच्या टोनाकॉर्न सेहेंग आणि टोनिचा सेहेंग यांचा २१-८, २१-९ असा पराभव करून पुढील फेरीत प्रवेश केला. पुढील फेरीत या भारतीय जोडीचा सामना चायनीज तैपेईच्या लिऊ कुआंग हेंग आणि सु यिन हुई यांच्याशी होईल.

मात्र, बल्गेरियाच्या कलोइना नालाबंतोवाकडून २१-१८, २१-१५ असा पराभव झाल्याने देविका सिहागचा प्रवास संपुष्टात आला. मिश्र दुहेरीमध्ये, रोहन कपूर आणि रुत्विका गड्डे या जोडीलाही सुरुवातीचा अडथळा पार करता आला नाही. चायनीज तैपेईच्या वू गुआन शुन आणि ली चिया शिन या जोडीकडून त्यांना १६-२१, १८-२१ असा पराभव पत्करावा लागला. ◂ (वृत्तसंस्था)

### फुटबॉल सामन्याच्या तिकीट विक्रीला प्रचंड प्रतिसाद

**कोलकाता :** फुटबॉलसाठी ओळखल्या जाणाऱ्या कोलकाताच्या चाहत्यांनी, पुढील महिन्यात होणाऱ्या बहुप्रतीक्षित भारत-ब्राझील मैत्रीपूर्ण सामन्यासाठी बुधवारी ऑनलाईन तिकीट विक्री सुरू होताच प्रचंड प्रतिसाद दिलाा. या सामन्याची कमी किमतीची तिकिटे ऑनलाईन विक्री सुरू झाल्यानंतर एका तासातच विकली गेली. भारत ३ ऑक्टोबर रोजी पाच वेळच्या विश्वविजेत्या ब्राझीलशी सामना करणार आहे. या खेळाबद्दल आणि विशेषतः ब्राझीलच्या राष्ट्रीय संघाबद्दल उत्कट प्रेम असलेल्या या शहरात, या सामन्याभोवती फुटबॉलचा उत्साह आधीच वाढत आहे.

# गिल, बुमराहची घसरण, पडिक्कलची प्रगती

## आयसीसी कसोटी क्रमवारी जाहीर

**दुबई, २ सप्टेंबर**

बुधवारी जाहीर झालेल्या ताज्या आयसीसी कसोटी क्रमवारीत भारतीय कर्णधार शुभमन गिल दोन स्थानांनी घसरला आहे आणि जसप्रीत बुमराह एका स्थानाने खाली आला आहे. देवदत्त पडिक्कल ५४ व्या स्थानावर पोहोचला आहे.

श्रीलंका दौऱ्यावर तीन डावांमध्ये केवळ एक अर्धशतक झळकावणारा गिल दोन स्थानांनी घसरून नवव्या स्थानावर आला आहे. यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंत सातव्या स्थानासह कसोटी क्रिकेटमधील अव्वल क्रमांकाचा भारतीय फलंदाज आहे.

यशस्वी जैस्वालच्या क्रमवारीत कोणताही बदल झालेला नाही. तो ११ व्या स्थानावर कायम आहे. श्रीलंकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांमध्ये दोन शतकांच्या मदतीने ३२८ धावा करणारा पडिक्कल पाच स्थानांनी वर चढून ५४ व्या स्थानावर पोहोचला आहे. अनुभवी वेगवान गोलंदाज बुमराहने मात्र कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत आपले दुसरे स्थान गमावले आहे. तो आता ऑस्ट्रेलियाचा मिचेल स्टार्क आणि न्यूझीलंडचा मॅट हेन्री यांच्या मागे तिसऱ्या स्थानावर आहे.

गुडघ्याच्या दुखापतीमुळे बुमराह श्रीलंका दौऱ्याला मुकला होता. अफगाणिस्तानविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी त्याची भारतीय संघात निवड झाली आहे, परंतु त्याची उपलब्धता तंदुरुस्तीवर अवलंबून आहे.

भारताविरुद्धच्या कोलंबो कसोटीच्या दोन्ही डावांमध्ये शतके झळकावणारा श्रीलंकेचा युवा फलंदाज सोनल दिनुशा फलंदाजीच्या क्रमवारीत २९ स्थानांनी वर चढून २५ व्या स्थानावर पोहोचला आहे.

इंग्लंडचा हॅरी ब्रूक कसोटी फलंदाजी क्रमवारीत अव्वल स्थानी कायम आहे. ऑस्ट्रेलियाचा स्टीव्ह स्मिथ दुसऱ्या, तर जो रूट तिसऱ्या स्थानावर आहे. श्रीलंकेचा कामिंदू मेंडिस दोन स्थानांनी वर चढून अव्वल १० खेळाडूंमध्ये पोहोचला आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# सायकलिंगला प्रोत्साहन, सीएफआय सदस्या भैरवी जोशी यांचा सन्मान



**नवी दिल्ली, २ सप्टेंबर**

सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (सीएफआय) च्या विकास समितीच्या सदस्या डॉ. भैरवी जोशी यांना, देशात या खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल, संयुक्त राष्ट्र जागतिक सायकल दिनाचे संस्थापक लेझेक सिबिलस्की उत्कृष्टता प्रमाणपत्राने सन्मानित करण्यात आले आहे.

अलिकडेच येथे आयोजित एका विशेष 'ब्रिक्स संडे ऑन सायकल' कार्यक्रमादरम्यान क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पोलिश राष्ट्रीय सायकलिंग संघाचे माजी सदस्य, समाजशास्त्रज्ञ आणि सायकलिंगप्रेमी लेझेक सिबिलस्की यांनी या पुरस्काराची सुरुवात केली.

संयुक्त राष्ट्र महासभेने २०१८ मध्ये ३ जून हा जागतिक सायकल दिन म्हणून साजरा करण्याचा एकमताने निर्णय घेतला. यानंतर, जगभरात सायकलिंगला प्रोत्साहन देण्यासाठी कार्यरत असलेल्या व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी या पुरस्काराची स्थापना करण्यात आली.

येथे जारी केलेल्या एका प्रसिद्धीपत्रकानुसार, पेशाने दंतवैद्य असलेल्या जोशी यांनी सायकल चालवण्याच्या संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी शाळा, महाविद्यालये, स्थानिक संस्था आणि सरकारी संस्थांसोबत काम केले. त्या 'फिट इंडिया मिशन'च्या सल्लागारही आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

# अनाहत सिंग आणि रमित टंडन पुढील फेरीत

### लंडन स्क्वॅश क्लासिक

**लंडन, २ सप्टेंबर**

विद्यमान विश्व ज्युनियर चॅम्पियन अनाहत सिंगने इजिप्तच्या मरियम मेटवॉलीला सरळ गेममध्ये पराभूत करून १,४४,००० अमेरिकी डॉलरच्या लंडन स्क्वॅश क्लासिकच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. जागतिक क्रमवारीत २० व्या क्रमांकावर असलेल्या अनाहत सिंगने पीएसए गोल्ड स्पर्धेतील आपला पहिला सामना ११-३, ११-२ असा जिंकला.

या वर्षी जुलैमध्ये ज्युनियर विश्वविजेतेपद जिंकणारी पहिली भारतीय ठरलेली १८ वर्षीय अनाहत, गेल्या दोन हंगामांपासून उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. तिने २०२५ च्या विश्व ज्युनियर चॅम्पियनशिपमध्ये कांस्य पदकही जिंकले होते.

पुरुषांच्या पहिल्या फेरीत, जागतिक क्रमवारीत ४२ व्या क्रमांकावर असलेल्या रमित टंडनने कतारच्या अब्दुल्ला अल-तमिमीला ११-६, ११-७ असे पराभूत केले. मात्र, जगात ३८ व्या क्रमांकावर असलेला वीर चोत्रानी स्वित्झर्लंडच्या यानिक विल्हेल्मीकडून ९-११, ९-११ ने पराभूत झाला. ◂ (वृत्तसंस्था)

### एल्मा अवेरो आणि सतीशन यांची भेट

**तिरुवनंतपुरम :** स्टार फुटबॉलपटू क्रिस्टियानो रोनाल्डोची बहीण, एल्मा अवेरो, हिने बुधवारी केरळ दौऱ्यादरम्यान राज्याचे मुख्यमंत्री व्ही. डी. सतीशन यांची भेट घेतली. मुख्यमंत्री कार्यालयाने (सीएमओ) दिलेल्या माहितीनुसार, ही भेट मंगळवारी कोझिकोड येथे झाली. सतीशन यांनी या संक्षिप्त भेटीचा एक व्हिडीओ 'एक्स'वर शेअर करत म्हटले, माझ्या केरळ दौऱ्यादरम्यान, क्रिस्टियानो रोनाल्डोची बहीण, एल्मा अवेरो हिच्याशी माझे संभाषण झाले. मल्याळी लोकांमध्ये फुटबॉल आणि क्रिस्टियानो रोनाल्डोबद्दल असलेली प्रचंड आवड आणि प्रेम याबद्दल मी तिला सांगितले. ते म्हणाले की, केरळच्या फुटबॉल चाहत्यांनी रोनाल्डोला पाठवलेल्या हार्दिक शुभेच्छा आणि स्नेह पोहोचवण्याचे आश्वासन अवेरोने दिले आहे.

## महत्त्वाचे

### टोल प्लाझा फसवणूक प्रकरणी इडीचे छापे

**नवी दिल्ली:** भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अर्थात् एनएचएआय प्लाझांवरील फसव्या टोल वसुलीशी संबंधित मनी लॉण्ड्रिंगच्या तपासाचा भाग म्हणून ईडीने बुधवारी अनेक राज्यांमध्ये छापेमारी केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. उत्तरप्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र, जम्मू-काश्मीर, मध्यप्रदेश, दिल्ली-एनसीआर आणि पश्चिम बंगालमधील सुमारे १४ ठिकाणांवर छापे टाकण्यात आल्याचे सांगण्यात आले. पोलिसांच्या दोन एफआयआरची दखल घेत बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. टोलच्या पावत्या तयार करण्यासाठी अनधिकृत सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन्सचा वापर आणि अधिकृत लेखा प्रणालीबाहेर टोलची वसुली वळवल्याचा आरोप एफआयआरमध्ये करण्यात आला आहे.

### यमुनेत बोट उलटून दोन जवान बेपत्ता

**यमुनानगर:** हथनीकुंड बॅरेजजवळ लष्कराची बोट अचानक यमुना नदीत उलटली. या अपघातात दोन जवान बेपत्ता झाले असून शोध आणि बचाव कार्य सुरू आहे. ही घटना मंगळवारी सायंकाळी घडली. १ सप्टेंबरला हथनीकुंड बॅरेजवर संयुक्त जलक्रीडा प्रशिक्षणादरम्यान एक बोट बॅरेजच्या खालच्या बाजूला असलेल्या जोरदार प्रवाहात अडकली. पथकांनी बोट बाहेर काढण्यासाठी तातडीने प्रयत्न केले. तथापि, स्लुईस गेट्सजवळील जोरदार भोवऱ्यात बोट अडकली आणि उलटली. त्यामुळे बोटीवरील जवान जोरदार प्रवाहात वाहून गेले. बोटीवरील दोन जवान सध्या बेपत्ता आहेत. लष्कर, हवाई दल, स्थानिक पोलिस आणि नागरी प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने शोध आणि बचाव मोहीम सुरू असून बेपत्ता जवानांना शोधून घेण्यासाठी सर्व उपलब्ध संसाधने वापरली जात आहेत.

### अधिकारी-कर्मचाऱ्यांचे 'लेखणीबंद' आंदोलन

**मुंबई:** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने तयार केलेल्या नव्या प्रस्तावित आकृतीबंधाविरोधात राज्यभरातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एल्गार पुकारला आहे. क्षेत्रीय पातळीवरील वास्तव आणि तांत्रिक मनुष्यबळाचा अभाव याकडे दुर्लक्ष करून लादल्या जाणाऱ्या या रचनेविरोधात 'महाराष्ट्र राज्य कृषी सेवा महासंघा'ने बुधवारपासून राज्यव्यापी 'लेखणीबंद' आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही शासनाकडून ठोस तोडगा न निघाल्याने कर्मचाऱ्यांमधील असंतोष आता रस्त्यावर येण्याची चिन्हे आहेत. ३१ ऑगस्ट रोजी कृषी विभागाचे सचिव आणि कृषी आयुक्तांसमवेत पार पडलेल्या उच्चस्तरीय बैठकीतही कर्मचाऱ्यांच्या व्यथा मांडण्यात आल्या. मनुष्यबळाची कमतरता आणि आकृतीबंधातील विसंगतींवर दीर्घ चर्चा झाली; मात्र प्रशासनाने यावर कोणताही सकारात्मक निर्णय न घेतल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

# पाकिस्तानात १०० वर्षे जुने हिंदू मंदिर पाडले

**भारताने व्यक्त केली तीव्र नाराजी**

**नवी दिल्ली, २ सप्टेंबर**

पाकिस्तानातील सुमारे शंभर वर्षे जुन्या हिंदू मंदिराच्या विध्वंसावर भारताने तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. ही घटना पाकिस्तानच्या नारोवाल जिल्ह्यातील सिराज गावात घडली. भारताने मंदिराच्या विध्वंसाचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. या प्रकरणाची तात्काळ आणि पारदर्शक चौकशी करावी, अशी मागणी परराष्ट्र मंत्रालयाने केली आहे.

परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकृत प्रवक्ते, रणधीर जयस्वाल यांनी या घटनेवर भारताची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, पाकिस्तानमधील एका ऐतिहासिक हिंदू मंदिराच्या विध्वंसावर भारताने गंभीर चिंता व्यक्त केली आहे. शतकानुशतके जुन्या अल्पसंख्याक


पाकिस्तानात पाडलेले हिंदू मंदिर

प्रार्थनास्थळाची झालेली ही तोडफोड निंदनीय आहे. भारताने केवळ मंदिराच्या विध्वंसाच्या वृत्ताबाबतच नव्हे, तर तेथील अधिकाऱ्यांच्या भूमिकेबद्दलही चिंता व्यक्त केली आहे. अधिकाऱ्यांची उदासीनता आणि मंदिराचे संरक्षण करण्यात आलेले अपयश चिंताजनक आहे. अशा घटनांमुळे पाकिस्तानमधील अल्पसंख्याक समुदायांच्या स्थितीबद्दल आणि त्यांच्या धार्मिक स्थळांच्या सुरक्षेबद्दल गंभीर प्रश्न निर्माण होतात, असेही ते म्हणाले.

**अल्पसंख्याक समुदायांच्या धार्मिक स्थळांचे संरक्षण महत्वाचे**

परराष्ट्र मंत्रालयाने पुढे म्हटले की, अशा घटना पाकिस्तानमधील अल्पसंख्याक समुदायांना भेडसावणाऱ्या सततच्या असुरक्षिततेची आठवण करून देतात. धार्मिक स्वातंत्र्य आणि प्रार्थनास्थळांच्या हक्कांचे कथित उल्लंघन हा एक गंभीर मुद्दा आहे. अल्पसंख्याक समुदायांच्या धार्मिक स्थळांचे आणि सांस्कृतिक वारशाचे संरक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे.

**सांस्कृतिक वारशाचे रक्षण सरकारची जबाबदारी**

भारताने पाकिस्तानी सरकारकडे या प्रकरणाची तात्काळ आणि पारदर्शक चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच, या घटनेसाठी जबाबदार असलेल्यांना ओळखून त्यांना जबाबदार धरले पाहिजे. केवळ चौकशी पुरेशी नाही. जबाबदार असलेल्यांवर कारवाईही झाली पाहिजे. आपल्या सर्व अल्पसंख्याक नागरिकांची सुरक्षितता, संरक्षण आणि कल्याण सुनिश्चित करणे ही पाकिस्तानची प्राथमिक जबाबदारी आहे. शिवाय, त्यांच्या सांस्कृतिक वारशाचे रक्षण करणे ही सरकारची जबाबदारी आहे, असेही भारताने म्हटले आहे.

(वृत्तसंस्था)


२६ ऑगस्टला हिमालयीन त्सुनामीमुळे नेपाळमध्ये अपरिमित मानवी आणि वित्तहानी झाली. अनेकांचे संसार उघड्यावर आले. नुवाकोट येथील बेत्रावती येथे नदीच्या खोऱ्यात बाजारपेठ अस्तित्वात होती. आता तिचे नामोनिशाणही उरले नाही.

# राहुल गांधी यांची पदाधिकाऱ्यांशी 'बंद दाराआड'च चर्चा

**काँग्रेस जिल्हाध्यक्षांच्या निवासी शिबिराचा समारोप**

**नाशिक, २ सप्टेंबर**

येथील गंगापूर धरण परिसरात एका रिसॉर्टमध्य सुरू असलेल्या काँग्रेसच्या नवनियुक्त जिल्हाध्यक्षांच्या निवासी शिबिराच्या समारोप सत्रात बुधवारी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पदाधिकारी, नवनियुक्त जिल्हाध्यक्ष यांच्याशी बंद दाराआड चर्चा केली. आदिवासी हे मुलनिवासी आहेत, असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

दरम्यान. पुण्यातील एका कार्यक्रमात एका आदिवासी विद्यार्थिनीने मांडलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर खासदार गांधी यांनी, 'आपण आदिवासी विद्यार्थ्यांच्या सोबत आहोत. तसेच मला बोलवा मी तुमच्या आंदोलनात नक्की येईल',



असे आश्वासन दिले होते. त्या पार्श्वभूमीवर येथे सकल आदिवासी विद्यार्थी आंदोलन कृती समितीच्या नेतृत्वात येथील आदिवासी विकास आयुक्तालयासमोर सुरू असलेल्या आमरण उपोषण आंदोलनातील विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाची गांधी यांनी भेट घेतली. यावेळी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर सुमारे दीड तास सविस्तर चर्चा झाली. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या सर्व मागण्या रास्त असून, त्यांना आपला शंभर टक्के पाठिंबा असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितल्याची माहिती समितीचे प्रतिनिधी सोनू गायकवाड यांनी दिली.

(तभा वृत्तसेवा)

### आदित्य ठाकरे आज नाशिकमध्ये

दरम्यान, शिवसेना (उबाठा) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे उद्या (दि. ३) नाशिक दौऱ्यावर येत असून, सकाळी दहाला ते आदिवासी बांधवांच्या विविध प्रश्नांसाठी सुरु असलेल्या उपोषणाला भेट देऊन आंदोलकांशी संवाद साधणार आहेत. यावेळी ते आंदोलनाला पक्षाच्या वतीने पाठिंबा व्यक्त करणार आहेत.

# जंतर मंतर आंदोलन; सर्व एफआयआर रद्द

**नीट पेपरफूट : सर्वोच्च न्यायालयाचा निकाल**

**नवी दिल्ली, २ सप्टेंबर**

नीट-यूजी पेपरफुटीविरोधात जंतर मंतरवर केलेल्या आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांविरुद्ध दाखल केलेल्या एफआयआरबाबत सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी एक महत्त्वपूर्ण निकाल दिला. कलम १४२ अंतर्गत आपल्या विशेष अधिकारांचा वापर करून न्यायालयाने दिल्ली आणि चार राज्यांमध्ये दाखल केलेले एफआयआर रद्द करण्याचे आदेश दिले.

दिल्ली पोलिस आणि आसाम, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल आणि बिहार या चार राज्य सरकारांनी



कलम १४२ अंतर्गत हे खटले रद्द करण्याची न्यायालयाला विनंती केली होती. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या न्यायासनाने या प्रकरणाची सुनावणी घेत २० ते २५ जुलैदरम्यान झालेल्या आंदोलनाशी संबंधित दाखल एफआयआर रद्द करण्याचा आदेश दिला आहे.

**पीडित कुटुंबांना मिळणार नुकसानभरपाई**

सुनावणीदरम्यान, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, केंद्र सरकार आंदोलकांशी झालेल्या चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनांवर ठाम आहे. नीट आंदोलनादरम्यान आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई दिली जाईल. यासाठी केंद्राने तीन महिन्यांचा वेळ मागितला आहे. नुकसानभरपाईची पद्धत निश्चित करण्यासाठी विविध राज्य सरकारे आणि संबंधित पक्षांशी चर्चा केली जात आहे.

**२,८७३ व्यक्तींविरुद्ध नवीन एफआयआर दाखल करा**

न्यायालयाने आंदोलनाशी संबंधित प्रकरणांमध्ये दिलासा दिला, परंतु गुन्हेगारी पृष्ठभूमी असल्याचा आरोप असलेल्या २,८७३ व्यक्तींविरुद्ध नवीन एफआयआर दाखल करण्यास केंद्राला परवानगी दिली.

(वृत्तसंस्था)

### भारताची योग्यवेळी मदत : बालेन शाह

**काठमांडू :** नेपाळच्या महापुरात सुमारे १,१२७ लोकांचा मृत्यू झाला असून अद्यापही ४,८५८ लोक बेपत्ता आहेत. सशस्त्र दलाने आतापर्यंत ६,५४१ लोकांना वाचवले आहे. या आपत्तीत भारताने योग्यवेळी मदत केली, आम्ही त्यांचे आभारी आहोत असे पंतप्रधान बालेन शाह यांनी संसदेत बोलताना म्हटले आहे. नेपाळच्या संसदेत बोलताना शाह म्हणाले, आम्ही कधीही आंतरराष्ट्रीय मदतीला नकार दिला नाही. ज्यावेळी अशाप्रकारची आपत्ती कोसळले, तेव्हा मदत नाकारण्याचा प्रश्नच येत नाही. आमचे मित्र राष्ट्र असलेल्या चीन आणि भारताने त्यांचे तंत्रज्ञ पाठवले. पहिल्या दिवसांपासून ते या समस्येवर लक्ष ठेवून होते. त्यांनी हवाई टेहळणी केली आणि नुकसानीचा आढावा घेतला. ज्या भागाला फटका बसला आहे, तिथे उतरणे शक्य आहे का, याची माहिती घेतली.

# मुंबई, नागपूर, पुणे विद्यापीठांत 'कुलपती पदक'

**कुलगुरूंना प्रातिनिधिक धनादेश प्रदान**

**मुंबई, २ सप्टेंबर**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्रातील मुंबई विद्यापीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आता 'कुलपती पदक' प्रदान करण्यात येणार आहे. राज्यपाल तथा राज्य विद्यापीठांचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांच्या पुढाकाराने सुरू करण्यात येत असलेल्या या उपक्रमासाठी राज्यपालांच्या हस्ते तिन्ही विद्यापीठांच्या कुलगुरूंना प्रत्येकी १० लाख रुपयांचा प्रातिनिधिक धनादेश बुधवारी मुंबईतील लोकभवनात प्रदान करण्यात आला. या वेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते 'इन्स्टिट्यूट ऑफ हायर अँड डिजिटल लर्निंग : इंडस्ट्री-अकॅडेमिया कोलॅबोरेशन फॉर इम्प्रूव्हिंग एम्प्लॉयेबिलिटी' या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.

'कुलपती पदक' हे केवळ शैक्षणिक गुणवत्तेपुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाची, नेतृत्वगुणांची, नवोन्मेषाची, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरीची, सामाजिक बांधिलकीची आणि विद्यापीठासाठीच्या विशेष योगदानाची दखल घेणारे असावे, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली आहे. पदकासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी विद्यापीठांनी पारदर्शक आणि गुणवत्ताधिष्ठित निकष निश्चित करावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी 'कुलपती पदक' उपक्रमाची पृष्ठभूमी स्पष्ट केली. या कार्यक्रमाला मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी, यांच्यासह विविध विद्यापीठांचे प्र-कुलगुरू, संचालक, अधिष्ठाता, प्राचार्य, उद्योग व शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधी, माजी विद्यार्थी, क्रीडा पुरस्कार विजेते तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

(तभा वृत्तसेवा)

### सामाजिक उपक्रमांत सहभाग घ्यावा

राज्यपालांनी महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या सहभागासाठी क्षयरोगमुक्त महाराष्ट्र अभियान, नशामुक्त भारत अभियान तसेच महाराष्ट्रातील लोप पावत चाललेल्या कला व पारंपरिक वारशाचे जतन आणि पुनरुज्जीवन हे तीन महत्त्वपूर्ण उपक्रमही पुढे आणले आहेत. विद्यापीठे ही केवळ शिक्षणाची केंद्रे नसून समाजाप्रती त्यांची व्यापक जबाबदारी आहे. त्यामुळे या उपक्रमांमध्ये विद्यापीठांनी सक्रिय भागीदार म्हणून सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

# मंदाकिनीचे रौद्ररूप; रामघाट पुन्हा पाण्याखाली

**■ चित्रकूटमध्ये भीषण पूरस्थिती ■ दुकाने, घरे, आश्रम, हॉटेल्समध्ये शिरले पाणी**

**चित्रकूट, २ सप्टेंबर**

मध्यप्रदेशाच्या डोंगराळ भागात झालेल्या मुसळधार पावसानंतर मंदाकिनी नदीने पुन्हा एकदा रौद्ररूप धारण केले आहे. दोन दशकांचा विक्रम मोडत झालेल्या पावसामुळे नदीच्या पाण्याने धोक्याची पातळी ओलांडली आहे. त्यामुळे चित्रकूट परिसरात भीषण पूरस्थिती निर्माण झाली आहे. चित्रकूटमधील रामघाट परिसर पुन्हा पाण्याखाली गेला असून, घाटालगतची दुकाने, घरे, आश्रम आणि हॉटेल्समध्येही पाणी शिरले आहे. रामघाट ते कामतनाथ, आरोग्यधाम आणि जानकीकुंडकडे जाणारे रस्त्यांवर नौका दिसून आल्या.

गेल्या दोन दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे पाण्याची पातळी झपाट्याने वाढली. काही तासांतच परिस्थिती आणखी बिकट झाली. रामघाट येथे पाणी ओसरल्यानंतर पुन्हा आलेल्या


चित्रकूटमधील जलमय परिसर

पुरामुळे दुकाने पुन्हा पाण्याखाली गेली. रामघाट येथील भारत मंदिरात पुजाऱ्यासह सुमारे १५ जण पाण्यात अडकले. पुजारी श्यामजी पांडे यांनी सांगितले की, मंदिरातील सर्व खोल्यांमध्ये पाणी शिरले. दरम्यान, जिल्हाधिकारी पुलकित गर्ग यांनी सांगितले की, मुसळधार पावसामुळे मंदाकिनी नदीची पाणी पातळी वाढली आहे. रात्रीच्या निवारागृहांमध्ये अनेक लोकांना अन्न आणि पाणी पुरवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

**दीनदयाल संस्थानतर्फे मदतीचे आवाहन**

चित्रकूटला त्याच्या इतिहासातील सर्वांत भीषण आणि विनाशकारी पुराचा सामना करावा लागला आहे. या भागात मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, अनेक कुटुंबांचे जीवन विस्कळीत झाले आहे. संकटाच्या काळात या कुटुंबांना अन्न, कपडे, औषधे, पिण्याचे स्वच्छ पाणी आणि इतर आवश्यक साहित्याची तातडीने गरज आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदत पोहोचवण्याच्या निर्धाराने 'दीनदयाल रिसर्च इन्स्टिट्यूट'ने नेहमीच कार्य केले आहे. आज, पूरग्रस्त कुटुंबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्यासाठी आणि त्यांचे जनजीवन पूर्ववत करण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे. यासाठी, संस्थेने स्थानिक समुदायाच्या सहकार्याने स्थानिक पातळीवर मदतकार्य सुरू केले आहे. या मदतकार्यात आपण आपल्या क्षमतेनुसार योगदान द्यावे आणि आपल्या संपर्कातील सक्षम व्यक्तींनाही या उदात्त कार्यासाठी मदत करण्यास प्रोत्साहित करावे, असे आवाहन दीनदयाल शोध संस्थानने (डीआरआय) केले आहे.

(वृत्तसंस्था)

**बँक खात्याची माहिती**

खात्याचे नाव : दीनदयाल रिसर्च इन्स्टिटट्यूट
खाते क्रमांक : 20400343148
खात्याचा प्रकार : बचत
आयएफएससी कोड: IDIB000P513
बँकेचे नाव : इंडियन बँक
शाखा : चुना मंडी, पहाडगंज नवी दिल्ली - 110058
ऑनलाईन मदतीसाठी खालील लिंकचा वापर करू शकता
https://donate.dri.org.in

# नितीन गडकरींच्या हस्ते 'हरियाणा' विशेषांकाचे प्रकाशन

**नागपूर, २ सप्टेंबर**

संपूर्ण देशभर जाहिरात क्षेत्रात कार्यरत तरुण-भारत असोसिएटस तर्फे हरियाणा राज्यातील विकासकामांवर आधारित 'काम दमदार, हरियाणा सरकार' हा माहितीपूर्ण विशेषांक नुकताच प्रसिद्ध करण्यात आला. केंद्रिय परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.

याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज मुळे, महाव्यवस्थापक महेंद्र बांगरे, व्यवसाय महाव्यवस्थापक ओम ढाकुलकर उपस्थित होते. या अंकाकरिता तरुण भारत असोसिएट्सचे दिल्ली येथील व्यवसाय महाव्यवस्थापक कमलेश त्रिपाठी यांचे



विशेष सहकार्य लाभले. हरियाणा राज्यात भाजपाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांच्या नेतृत्वातील सरकारने अल्पावधीत केलेली विकासकामे व त्यातून हरियाणा राज्याच्या यशोगाथेची माहिती महाराष्ट्रासह इतर राज्यातील नागरिकांना व्हावी, हा या विशेषांक प्रकाशनामागील मुख्य हेतू आहे. यात नितीन गडकरी यांनी हरियाणामध्ये केलेली मूलभूत सोयी-सुविधांची उभारणी यांचा सचित्र आढावा घेतला. याशिवाय हरियाणातील कृषी, पर्यटन, उद्योगाची गाथाही अंकात मांडण्यात आली आहे. तरुण भारत असोसिएट्सने एक उत्तम व परिपूर्ण अंक प्रसिद्ध केला आहे, अशी प्रशंसा नितीन गडकरी यांनी या अंकाची केली.

(तभा वृत्तसेवा)

# कारगिल युद्ध आणि 'ऑपरेशन सिंदूर'मधील योद्धा

**माजी एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांचा देशसेवेचा थक्क करणारा प्रवास**

**नवी दिल्ली, २ सप्टेंबर**

कारगिल युद्ध, 'टायगर हिल सफेद सागर ते 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये महत्त्वाची भूमिका बजावलेले वायुदलाचे माजी एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे पहिले मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) म्हणून नियुक्ती झाली. त्यांची वायुदलातील ३८ वर्षांची कारकीर्द थक्क करणारी आहे. ३ हजार तास उड्डाणाचा अनुभव, १८ हून अधिक लढाऊ विमाने, ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्ट आणि हेलिकॉप्टर उडवण्याची त्यांची कुशलता आणि 'ऑपरेशन सिंदूर'मधील महत्त्वाच्या भूमिकेबाबत त्यांना स्वातंत्र्य दिनी युद्ध सेवा मेडल पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

वायुदलातील अनुभवी आणि माजी वरिष्ठ अधिकारी एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांनी 'ऑपरेशन सिंदूर'च्या काळात भारतीय वायुलाच्या पश्चिम कमांडचे नेतृत्व केले. त्याआधी त्यांनी 'इंटिग्रेटेड डिफेन्स स्टाफ'मध्ये (आयडीएस) 'ऑपरेशन्स डेप्युटी चीफ' तसेच 'डॉक्ट्रिन ऑर्गनायझेशन' आणि प्रशिक्षण विभागाचे डेप्युटी चीफ म्हणूनही काम केले. कारगिल युद्धाच्या सुरुवातीच्या काळात मिराज-२००० विमानांवर लेझर-गाइडेड बॉम्ब लोड करण्याची


माजी एअर मार्शल जितेंद्र मिश्रा

महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर होती. त्यानंतर 'ऑपरेशन सफेद सागर'दरम्यान टायगर हिल आणि मुंथो ढालो यांसारख्या मोहिमांमध्ये त्यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली.

**काय असेल जबाबदारी ?**

श्री राम मंदिराच्या दैनंदिन प्रशासकीय कार्यांचे व्यवस्थापन करण्यात आणि सरकारी संस्थांसोबत त्याच्या कामकाजाचा समन्वय साधण्यात सीईओ महत्त्वाची भूमिका बजावतील. हे पद महत्त्वाचे आहे. कारण अयोध्या हे भारतातील सर्वात मोठ्या धार्मिक स्थळांपैकी एक आहे, जेथे मोठ्या संख्येने भाविक येतात.

(वृत्तसंस्था)

### पुण्याच्या खडकवासला अकादमीतून प्रशिक्षण

उत्तर प्रदेशच्या देवरिया जिल्ह्यातील बनकटा येथे राहणारे जितेंद्र मिश्रा यांची १९८६ साली वायुदलात निवड झाली होती. जवळपास ४ दशके त्यांनी सैन्यदलात राहून देशाची सेवा केली. त्यांनी पुण्याच्या खडकवासला येथून राष्ट्रीय संरक्षण अकादमीतून प्रशिक्षण घेतले. त्यांनी डुंडीगल येथील वायुदल अकादमी, बंगळुरू येथील एअर फोर्स टेस्ट पायलट स्कूल, अमेरिकेतील अलबामा येथील मॉंटगोमेरी येथील एअर कमांड अँड स्टाफ कॉलेज आणि युके येथील रॉयल कॉलेज ऑफ डिफेन्स स्टडीज येथेही शिक्षण आणि प्रशिक्षण घेतले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# नोकरशाहीला ‘सुप्रीम’ चपराक

देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी आणि त्यांच्या मानसिक स्वास्थ्याशी थेट जुळलेल्या ‘नीट’ प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणाचे वादळ पूर्णपणे शांत झालेले नसताना, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अत्यंत महत्त्वाच्या निर्णयाने देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. नीट पेपरफुटीनंतर शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा व नीट परीक्षा विश्वासार्ह आणि पारदर्शी करण्याच्या मागणीसाठी जुलै महिन्यात विद्यार्थी आंदोलक रस्त्यावर उतरले होते. त्यांच्यावर दाखल केलेले सर्व ‘एफआयआर’ सर्वोच्च न्यायालयाने भारतीय संविधानाच्या कलम १४२ अंतर्गत मिळालेल्या विशेषाधिकारांचा वापर करून पूर्णपणे रद्दबातल ठरवले आहेत. संविधानातील कलम १४२ सर्वोच्च न्यायालयाला कोणत्याही खटल्यात किंवा प्रकरणात ‘पूर्ण न्याय’ (कम्प्लिट जस्टिस) देण्याचे विशेष आणि व्यापक अधिकार प्रदान करते. या कलमाचा वापर करण्याचा प्रसंग सर्वोच्च न्यायालयावर आला म्हणजे हा विषय गंभीरच असला पाहिजे, असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो.

आंदोलन संपविण्याच्या संदर्भात वाटाघाटी सुरू असताना विद्यार्थ्यांना दिलासा देण्याचा शब्द सरकारने दिला होता. आता जे सर्वोच्च न्यायालयाने केले, ते खरे तर सरकारनेच करायला हवे होते. मात्र, सरकारने दिलेल्या आश्वासनानंतर महिने उलटत चाललेले असताना प्रशासन आपल्या पठडीप्रमाणे कागदाला कागद जोडत राहिले. अखेर सर्वोच्च न्यायालयाने विशेषाधिकार वापरीत विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेतले व पुढील तपासालाही पूर्णविराम दिला. या आंदोलनामुळे खचून जाऊन आत्महत्या केलेल्या दुर्दैवी विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना तीन महिन्यांच्या आत आर्थिक भरपाई देण्याचे स्पष्ट आदेशही दिले. ही बाब निश्चितच दिलासादायक आहे. परंतु, येथे प्रश्न असा निर्माण होतो की, हे काम मुळात कुणाचे होते? सर्वोच्च न्यायालयाला संवैधानिक विशेषाधिकाराचा वापर करावा लागतो तेव्हा कुणी तरी जबाबदारीच्या पालनात चुकलेले असते. मग ते कोण? त्याचे उत्तर असे की, प्रशासन किंवा कार्यपालिकेला आपले कर्तव्य वेळेत निभावता आले नाही म्हणून सर्वोच्च न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला. आपल्या देशात अनेकदा एक अध्यादेश किंवा प्रशासकीय आदेश जारी करून एका रात्रीत मोठमोठे धोरणात्मक निर्णय घेतले जातात. तेथे विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेण्यासाठी प्रशासनाला इतके दिवस का लागतात? नोकरशाहीची संथ चाल न्यायालयाच्या या हस्तक्षेपाने उघडी पडली आहे. ‘एफआयआर’ दाखल झाल्यानंतर तो रद्द करण्याची नेहमीची प्रक्रिया अत्यंत किचकट, लांबलचक आणि मानसिक क्लेश देणारी असते. त्यात वर्षानुवर्षे निघून जातात. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना या प्रक्रियेतून जाण्यास बाध्य करणे ही बाब त्यांचे मनोबल संपविणारी ठरली असती. हा विषय अधिक काळ लालफितशाहीत अडकून राहिला असता तर शैक्षणिक प्रवेशावर, नोकरीच्या संधींवर आणि चारित्र्य पडताळणीवर गुन्हेगारी प्रकरणांची छाया कायम राहिली असती. गृहविभागाकडून कायदा विभागाकडे नस्ती पाठवणे आणि कायदा विभागाकडून पोलिसांना मार्गदर्शक सूचना जारी करणे इत्यादी प्रक्रियेत प्रशासनाने अडीच महिन्यांपेक्षा जास्त वेळ वाया घालवला. अखेर सर्वोच्च न्यायालयाला स्वतःहून हस्तक्षेप करावा लागला ही नोकरशाहीला लावली गेलेली चपराक आहे, हे कथित सनदी वर्तुळाच्या लक्षात आले पाहिजे. प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि तातडीने विद्यार्थ्यांच्या भावना समजून घ्यायला हव्या होत्या. सरकारने आश्वासन दिले होते. पुढचे काम प्रशासनाचे असते. त्यात प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरले. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला असा निर्णय द्यावा लागला.

आंदोलक विद्यार्थ्यांविरुद्ध कोणतीही कठोर कारवाई केली जाणार नाही आणि त्यांच्याविरुद्धचे ‘एफआयआर’ मागे घेतले जातील, असे आश्वासन केंद्राने दिले होते. हा शब्द सर्वोच्च न्यायालयाने दिलेला नव्हता, तर लोकनिर्वाचित सरकारने दिला होता. एखादे आंदोलन शांत करण्यासाठी किंवा विद्यार्थ्यांच्या नकळत झालेल्या चुका पोटात घेऊन सरकार एखादे आश्वासन देते, तेव्हा त्याची पूर्तता करणे ही प्रशासनाची किंवा नोकरशाहीची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी असते. कारण आदेश किंवा निर्णय नोकरशाही जारी करीत असते. तरीही प्रशासन ढिम्म होते. हजारो तरुण विद्यार्थी मानसिक तणावाखाली होते. सध्याचे केंद्रीय सरकार क्रांतिकारी आणि जलद धोरणात्मक निर्णयांसाठी ओळखले जाते. नोटबंदीसारखा आर्थिक निर्णय असो, कलम ३७० हटवणे असो किंवा रात्रीच्या वेळी अध्यादेश काढून तातडीने कायदे लागू करणे असो, अनेक मोठे निर्णय या सरकारने एका रात्रीत घेतले आहेत. तेव्हा प्रशासनाने सरकारच्या निर्देशांनुसार जलद हालचाली केल्या ना? मग विद्यार्थ्यांना दिलासा देण्यातच विलंब का? या विलंबामुळे आंदोलकांना दिल्लीत पुन्हा ५ सप्टेंबर रोजी मोर्चा काढण्याची घोषणा करावी लागली. या पृष्ठभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने २० ते २५ जुलै दरम्यानच्या आंदोलनाशी संबंधित देशभरातील सर्व ‘एफआयआर’ तत्काळ रद्द केले आणि पुढील तपास पूर्णपणे बंद केला. या आंदोलनाशी संबंधित घटनावरून कोणत्याही राज्यात नवीन गुन्हे दाखल करण्यास मनाई केली गेली आहे. परीक्षा रद्द झाल्याच्या आघातामुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना ३ महिन्यांत आर्थिक भरपाई देण्याचे निर्देश दिले गेले आहेत. लाठीमारात किंवा पोलिस कारवाईत जखमी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मदत व नुकसानभरपाई योजना तयार करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. ज्यांच्यावर गंभीर हिंसाचार किंवा गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आरोप आहेत, त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाईची मुभाही सर्वोच्च न्यायालयाने प्रशासनाला दिलेली आहे. हे सारे सर्वोच्च न्यायालय करू शकले. कारण ते संवेदनशील आहे. शिव्याशाप पचवूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मनाचा मोठेपणा दाखविला आणि विद्यार्थ्यांना माफ केले होते. सरकारतर्फे आंदोलकांना शब्द दिला गेला होता. अशा स्थितीत नोकरशाहीने अधिक सकारात्मक होऊन तातडीने विषय मार्गी लावणे अपेक्षित होते. आता सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे ‘कॉक्रोच जनता पार्टी’ आणि इतर विद्यार्थी संघटनांनी ५ सप्टेंबरचा मोर्चा मागे घेतला हे चांगले झाले. पण, याचे श्रेय सर्वोच्च न्यायालयाचे आहे, हे विसरता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलले असले, तरी त्याने नोकरशाही व प्रशासनाच्या असंवेदनशील वर्तनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या प्रकरणातून धडा घेऊन, भविष्यात अशा घटना घडल्यास नोकरशाहीला न्यायालयाची चपराक बसेपर्यंत सरकारने वाट पाहू नये. सरकार आणि प्रशासन या दोघांनीही स्वतःहून पुढाकार घेऊन गरजूंना न्याय दिला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने एकप्रकारे हा निर्णय देऊन सरकारला मदत केलेली आहे आणि आंदोलनाची घोषणा मागे घेण्यासाठी वातावरण निर्मिती केली आहे. एकीकडे न्यायालयांच्या सक्रियतेला नोकरशाही नावे ठेवते. दुसरीकडे नोकरशाहीला स्वतःच्या जबाबदाऱ्या नीट पार पाडता येत नाहीत. नोकरशाही ही शासनाची अर्थात सरकारची लोकांना प्रत्यक्ष दिलासा देणारी यंत्रणा असते. ती इतक्या लायकीची असेल तर तिला धारेवर धरण्याची आणि कामाला लावण्याची जबाबदारी सरकारची आहे. असंघटित क्षेत्रातील लोक अल्प वेतनात दिवस काढत असताना वेतन आयोगांचे अफाट फायदे घेणाऱ्या व त्यासाठी सतत आणि वेगाने कार्यरत असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली जाईल आणि त्यांना ते लक्षात येईल, तो सुदिन. नोकरशाहीतील लक्षावधी रत्नांना नागरिकांच्या पैशातून पोसणे न्याय्य आहे, हे कधी तरी सिद्ध व्हावे, एवढीच सामान्यांची अपेक्षा आहे. ■

## तंत्रवेध

# कृत्रिम बुद्धिमत्तेची नवी पिढी

**डॉ. दीपक शिकारपूर**

काही वर्षांपूर्वी कृत्रिम बुद्धिमत्तेशी संवाद साधणे हीच मोठी गोष्ट वाटत होती. प्रश्न विचारला की उत्तर मिळायचे, लेख लिहून मिळायचा, भाषांतर व्हायचे किंवा एखाद्या विषयाची माहिती मिळायची. आजही ही सुविधा अत्यंत उपयुक्त आहे, पण आता कृत्रिम बुद्धिमत्तेची वाटचाल त्याही पुढे सुरू झाली आहे. ती केवळ प्रश्नांची उत्तरे देणारी राहिलेली नाही, तर स्वतः नियोजन करणारी, निर्णय घेणारी, अनेक टप्प्यांमध्ये काम पूर्ण करणारी आणि आवश्यक तेव्हा इतर साधनांचा वापर करून उद्दिष्ट पूर्ण करणारी बनत आहे. यालाच ‘स्वयंकर्ती कृत्रिम बुद्धिमत्ता’ म्हणजेच ‘एजेंटिक एआय’ असे म्हणता येईल. ही प्रणाली काही प्रमाणात मानवी मेंदूप्रमाणे कार्य करते. ती सतत शिकत राहते, बदलत्या परिस्थितीनुसार स्वतःला जुळवून घेते आणि आवश्यकतेनुसार इतर बुद्धिमान प्रणालींसोबत सहकार्यदेखील करू शकते. त्यामुळे डिजिटल सहकार्याचे स्वरूप पूर्णपणे बदलण्याची क्षमता या तंत्रज्ञानात आहे. पारंपरिक एआय आणि एजेंटिक एआय यांच्यातील फरक अत्यंत महत्त्वाचा आहे. पारंपरिक प्रणाली मानवी आदेशांवर अवलंबून असते, तर एजेंटिक प्रणाली स्वतंत्रपणे काम करू शकते. पारंपरिक प्रणाली पूर्वनियोजित नियमांनुसार कार्य करते, तर एजेंटिक प्रणाली अनुभवातून शिकते आणि परिस्थितीनुसार निर्णय बदलू शकते. पारंपरिक प्रणाली साधी आणि पुनरावृत्तीची कामे उत्तम प्रकारे करते, परंतु एजेंटिक प्रणाली जटिल आणि बहुपदरी कामे हाताळू शकते.

एजेंटिक कृत्रिम बुद्धिमत्तेतील सर्वांत महत्त्वाची संकल्पना म्हणजे ‘ऑटोनॉमस एजंट्स’. ते केवळ आदेश पाळत नाहीत, तर परिस्थिती समजून घेतात, नियोजन करतात, माहिती गोळा करतात, पर्यायांचे विश्लेषण करतात आणि योग्य कृतीही करतात. उदाहरणार्थ, एखाद्या उद्योगाने ‘ग्राहक समाधान वाढवा’ असे उद्दिष्ट दिल्यास ऑटोनॉमस एजंट्स ग्राहकांच्या प्रतिक्रिया तपासतील, तक्रारींचे वर्गीकरण करतील, स्पर्धकांचा अभ्यास करतील, सुधारणा सुचवतील आणि आवश्यक असल्यास ग्राहकांशी संवादही साधतील. शिक्षणक्षेत्रात असे प्रतिनिधी विद्यार्थ्यांच्या



अभ्यासपद्धतीचे विश्लेषण करून वैयक्तिक अभ्यास आराखडा तयार करू शकतात, सराव चाचण्या घेऊ शकतात आणि कमकुवत विषयांवर विशेष मार्गदर्शन करू शकतात. भविष्यात अनेक ऑटोनॉमस एजंट्स एकत्र काम करून मोठी आणि जटिल कामे पूर्ण करतील. त्यामुळे उद्योग, संशोधन, आरोग्य, बँकिंग आणि शिक्षणक्षेत्र अधिक गतिमान, अचूक आणि कार्यक्षम बनतील. ही कृत्रिम बुद्धिमत्तेची पुढील पिढी आहे. आजचा बदल हा केवळ तांत्रिक नाही, तर काम करण्याच्या पद्धतीत आमूलाग्र परिवर्तन घडवणारा आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, उद्योगपती, व्यावसायिक आणि कर्मचारी यांनी या नव्या युगाची ओळख करून घेणे अत्यावश्यक आहे.

आज आपण कृत्रिम बुद्धिमत्तेला एखादा प्रश्न विचारतो आणि उत्तर मिळवतो. पण समजा, ‘माझ्या संस्थेसाठी पुढील सहा महिन्यांचा विकास आराखडा तयार कर, आवश्यक माहिती गोळा कर, खर्चाचा अंदाज काढ, सादरीकरण तयार कर आणि शेवटी कृती आराखडाही बनव.’ अशी आज्ञा दिली तर ती फक्त उत्तर देत नाही, तर अनेक टप्प्यांमध्ये विचार करते, माहिती तपासते, आवश्यक साधनांचा वापर करते आणि संपूर्ण काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करते.

हीच स्वयंकर्ती कृत्रिम बुद्धिमत्ता आहे. म्हणजेच ही प्रणाली केवळ संवाद साधत नाही, तर उद्दिष्ट समजून घेते, कामाचे छोटे भाग करते, प्रत्येक भाग पूर्ण करते, अडचणी आल्यास पर्याय शोधते आणि शेवटी अपेक्षित परिणाम देते. यामुळे ती एखाद्या बुद्धिमान सहायकापेक्षा अधिक सक्षम सहकारी बनते. यामुळे कार्यालयांचे स्वरूप झपाट्याने बदलणार आहे. आज एखादा कर्मचारी दिवसभर विविध लहानमोठी कामे करतो. माहिती गोळा करणे, अहवाल तयार करणे, ग्राहकांना उत्तर देणे, बैठकींची तयारी करणे, आकडेवारी तपासणे, माहितीची पडताळणी करणे आणि नियोजन करणे यासाठी बराच वेळ जातो. स्वयंकर्ती कृत्रिम बुद्धिमत्ताही अनेक कामे काही मिनिटांमध्ये पूर्ण करू शकते. त्यामुळे माणसाकडे विचार, कल्पना, नेतृत्व आणि निर्णय यासाठी अधिक वेळ उपलब्ध होईल. उद्योगक्षेत्रात तिचा उपयोग अधिक व्यापक असेल. उत्पादन नियोजन, साठा व्यवस्थापन, ग्राहकांच्या मागणीचा अंदाज, पुरवठा साखळीचे नियोजन, गुणवत्ता नियंत्रण आणि खर्च कमी करण्यासाठी ती सतत काम करू शकेल.

इथे स्वयंकर्त्या कृत्रिम बुद्धिमत्तेची मूलभूत तत्त्वे समजून घ्यावी लागतील. कृत्रिम बुद्धिमत्ता कसा विचार करते, माहिती कशी वापरते, तिच्या मर्यादा काय आहेत आणि योग्य सूचना कशा द्यायच्या हे शिकणे आवश्यक आहे. त्यानंतर प्रत्यक्ष वापर सुरू करता येईल. रोजच्या कामांमध्ये तिची मदत घेणे. पत्र लिहिणे, अहवाल तयार करणे, माहितीचे विश्लेषण करणे, अभ्यासाचे नियोजन, कल्पनांचा विस्तार आणि समस्या सोडवणे यासाठी तिचा उपयोग करता येईल. देशातील अनेक विद्यापीठे, तंत्रज्ञान शिक्षण संस्था, कौशल्य विकास केंद्रे आणि संशोधन संस्था कृत्रिम बुद्धिमत्तेवरील अभ्यासक्रम सुरू करत आहेत. शासनाच्या विविध कौशल्य विकास उपक्रमांमधूनही प्रशिक्षण उपलब्ध होत आहे. याशिवाय अनेक मुक्त अध्ययन व्यासपीठांवर विनामूल्य अभ्यासक्रम, व्याख्याने आणि प्रात्यक्षिके उपलब्ध आहेत. नियमित वाचन, तज्ज्ञांची व्याख्याने, चर्चासत्रे आणि प्रत्यक्ष प्रयोग यांद्वारेही या क्षेत्रात प्रगती करता येते. जगाला केवळ तंत्रज्ञान वापरणारे लोक नको आहेत, तर नवे उपाय निर्माण करणारे विचारवंत, संशोधक आणि उद्योजक हवे आहेत. आपल्या मातृभाषांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास करणेही तितकेच आवश्यक आहे. गावागावातील विद्यार्थी, शेतकरी, लघुउद्योजक आणि सामान्य नागरिक यांच्यापर्यंत या तंत्रज्ञानाचे लाभ पोहोचले, तरच त्याचे खरे सामर्थ्य दिसून येईल. स्वयंकर्ती कृत्रिम बुद्धिमत्ता ही केवळ नवीन तंत्रज्ञान नाही; ती काम करण्याची, विचार करण्याची आणि भविष्य घडवण्याची नवीन पद्धत आहे. या परिवर्तनाचे स्वागत ज्ञानाने, कौशल्याने आणि जबाबदारीने करायला हवे. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# कर्तव्याचे भान हरवतेय् का?

मूलभूत अधिकारांसह विविध अधिकारांची चर्चा नेहमीच होते. लोकशाही मजबूत होण्यासाठी नागरिकांना आपल्या अधिकारांची जाणीव असणे आवश्यकच आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समानतेचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, माहितीचा अधिकार, कायद्याचे संरक्षण, मतदानाचा अधिकार, सार्वजनिक सुविधांचा लाभ घेण्याचा अधिकार या सर्व अधिकारांमुळे नागरी व्यवस्था अधिक सक्षम झाली आहे. गत काही दशकांत सामान्य माणूस स्वतःच्या अधिकारांबाबत पूर्वीपेक्षा अधिक जागरूक झाल्याचे देखील दिसून येते. म्हणूनच अन्याय झाला तर प्रश्न विचारायचा, कार्यालयीन काम अडले तर जाब विचारायचा, सरकारी यंत्रणांना नागरी सुविधांची विचारणा करायची, चुकीच्या धोरणाविरोधात आवाज उठवायचा, हा सामान्य नागरिकांमध्ये सकारात्मक बदल झाला आहे. पण एकीकडे अधिकारांची जाणीव दृढ होत असतानाच दुसरीकडे कर्तव्याचे भान तुम्हा-आम्हाला आहे का, अधिकारांप्रमाणेच कर्तव्याचीही जाणीव वाढते आहे का? रस्ते स्वच्छ हवेत, पण कचरा कुठे टाकायचा याचे भान नाही. वाहतूक व्यवस्था चांगली हवी, पण वाहतुकीचे नियम पाळायचे नाहीत. पादचाऱ्यासाठी पदपथ हवेत, पण सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करायचे किंवा त्याकडे दुर्लक्ष करायचे. शासनाकडून मुबलक पाण्याची अपेक्षा करायची पण पाण्याचा अपव्यय थांबवायचा नाही. कराच्या पैशातून विकास हवा, पण कर भरण्याची वेळ आली की पळवाट शोधायची. ही विसंगती असेपर्यंत विकसित राष्ट्राची अपेक्षा करावी तरी कशी, याचा विचार करावा लागेल.

शहरांसह ग्रामीण भागात देखील अतिक्रमणाची समस्या आहे. रस्त्याच्या दुतर्फा नियोजित पादचारी मार्गावर तर हमखास अतिक्रमण केलेले आढळते. पण मुळात हे अतिक्रमण करणारे आणि त्याला कळत-नकळत मान्यता देणारे या समाजाचे घटकच आहेत ना? वाहतूक नियमांच्या बाबतीतही अशीच परिस्थिती आहे. सिग्नल तोडणे, हेल्मेट न वापरणे, सीटबेल्ट न लावणे, चुकीच्या दिशेने वाहन चालवणे, वाहन चालवताना मोबाईल वापरणे या कृतींना काही जण ‘छोटी चूक’ समजतात. परंतु अशा छोट्या चुका अनेकदा मोठ्या अपघाताचे कारण ठरतात. रस्त्यावर सुरक्षित प्रवास हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. पण इतरांच्या सुरक्षिततेचा विचार करून नियम पाळणे हे नागरिकाचे कर्तव्य नव्हे का?

स्वच्छतेच्या बाबतीत तर आपल्या शहरात आपल्याच मानसिकतेचे प्रतिबिंब स्पष्ट दिसते. स्वच्छ भारत, स्वच्छ शहर, कचरामुक्त परिसर अशा मोहिमा राबवल्या जातात. प्रशासन साफसफाई करते, कर्मचारी रस्ते झाडतात. पण काही तासांतच पुन्हा कचरा साचतो. कारण स्वच्छता ही केवळ सफाई कर्मचाऱ्यांची जबाबदारी आहे, अशीच अनेकांची धारणा असते. निसर्गाच्या लहरीपणाबाबत अनेक जण तासनतास गप्पा करतात. यावेळी पर्यावरणाचा ऱ्हास यावर तावातावाने आपले मत मांडणारेही आहेत. पण पर्यावरणाच्या संवर्धनासाठी प्रत्यक्ष पुढाकार घेऊन काम करणारे किती टक्के नागरिक असतील. सार्वजनिक स्तरावर मोठ्या प्रमाणात काम करणे सोडा, किती जणांचा वैयक्तिक व्यवहार पर्यावरणपूरक आहे. शहरात नाल्या तुंबल्या म्हणून रस्त्यावर गटाराचे पाणी आहे. असा ओरडा करणारी व्यक्तीच भाजीबाजार, किराणा दुकानातून विकत घेतलेल्या वस्तू दुकानदाराला निर्बंध असलेल्या प्लॅस्टिकच्या पिशवीत मागते. याच प्लॅस्टिकच्या पिशव्यांच्या दुष्परिणामांपैकी एक दुष्परिणाम शहरातील नाल्या तुंबण्यात होते. हे कटु सत्य नव्हे का? सामान्यजनांमध्ये आपल्या अधिकारांची जाणीव असायलाच हवी पण सोबतच कर्तव्याचे भान देखील आवश्यक आहे. विकसित राष्ट्र निर्माणाची जबाबदारी केवळ सत्तेतील पुढाऱ्यांचीच नव्हे तर देशातील प्रत्येक नागरिकाची आहे. स्वातंत्र्यापूर्वी महान देशभक्त आणि विचारवंत लोकमान्य टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर यांचा मोठा वैचारिक वाद झाला होता. आधी राजकीय स्वातंत्र्य की आधी सामाजिक सुधारणा असा तो विषय होता. याची व्याप्ती मोठी आहे. आता आपण स्वतंत्र होऊन ८० वर्षे होत आहेत. आणि दुर्दैव म्हणजे देशातील समाज शिक्षित होऊनही अपेक्षित सामाजिक सुधारणा अर्थात देश, समाजाप्रति कर्तव्याची भावना बळकट झाली नाही. असे अनेक घटनांवरून म्हणावेसे वाटते. आपल्या हक्काचे आपल्याला मिळावेच पण आपले कर्तव्य काय आहे, याचीही जाण आणि भान प्रत्येकाने ठेवावे यावर भविष्यात केवळ चिंतन नको तर प्रत्यक्ष कृती आवश्यक आहे. ■

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# संसदेचे विशेष अधिवेशन केव्हा?

**श्यामकांत जहागीरदार**

संसदेचे पावसाळी अधिवेशन संस्थगित झाल्याची अधिसूचना अद्याप जारी न झाल्यामुळे महिला आरक्षण आणि मतदारसंघाचे परिसीमन या मुद्यावर संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले जाण्याची शक्यता आहे. सामान्यपणे संसदेच्या कोणत्याही अधिवेशनाचे सूप वाजल्यानंतर ते अधिवेशन संस्थगित झाल्याची अधिसूचना राष्ट्रपती काढत असतात, यावेळी मात्र राष्ट्रपती भवनाने अशी अधिसूचना जारी केली नाही. अधिवेशन संस्थगित झाल्याची अधिसूचना निघत नाही तोपर्यंत संसदेचे अधिवेशन अधिकृतपणे संपले असे मानले जात नाही. त्यामुळे संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची चर्चा जोरात आहे.

सप्टेंबरमध्ये दोन-तीन दिवसांचे हे विशेष अधिवेशन होईल, असा अंदाज आहे. नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होईल. हिवाळी अधिवेशनात ही दोन्ही विधेयके मांडण्याचा सरकारचा विचार असता तर संसदेचे पावसाळी अधिवेशन संस्थगित करता आले असते, पण हे अधिवेशन अद्याप संस्थगित न झाल्यामुळे हिवाळी अधिवेशनाच्या आधी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याचा विचार सरकारने अद्याप सोडला नाही, असा काढता येतो. सरकारच्या दृष्टीने ही दोन्ही घटनादुरुस्ती विधेयके महत्त्वपूर्णच नाहीत तर प्रतिष्ठेचीही आहेत. त्यामुळे सरकार काहीही झाले तरी ही दोन घटनादुरुस्ती विधेयके पारित करून घेईल, यात शंका नाही. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी एका मुलाखतीत संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याचे संकेत दिले आहेत. काँग्रेसलाही सरकार या मुद्यावर संसदेचे विशेष अधिवेशन बोलवेल, असा अंदाज आहे. मतदारसंघाच्या परिसीमनाला विरोध करत पुढील २५ वर्ष लोकसभेच्या ५४३ जागा कायम ठेवण्याची मागणी काँग्रेसने केली असली तरी सरकार ही मागणी मान्य करण्याची कोणतीच शक्यता नाही. उलट काँग्रेसने अशी मागणी केल्यामुळे ही दोन्ही विधेयके लवकरात लवकर पारित करून घेण्याचा सरकारचा निर्धार आणखी दृढ झाला आहे. त्यामुळेच काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यापूर्वी सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची तसेच या दोन्ही विधेयकांचा मसुदा विरोधकांना उपलब्ध करून देण्याची मागणीही केली आहे.

मतदारसंघाच्या परिसीमनाला काँग्रेसचा विरोध असला तरी महिला आरक्षणाला आपला विरोध नाही, हे दाखवण्यासाठी काँग्रेसने २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू करण्याची मागणी केली आहे. लोकसभेच्या ५४३ या विद्यमान सदस्य संख्येतच महिला आरक्षण लागू करण्याची काँग्रेसची मागणी आहे. महिला आरक्षणांसदर्भातील घटनादुरुस्ती विधेयक सरकारने आधीच पारित केले आहे. महिला आरक्षण आणि मतदारसंघाचे परिसीमन ही दोन्ही घटनादुरुस्ती विधेयके आहेत, त्यामुळे संसदेत ती पारित करण्यासाठी दोनतृतीयांश बहुमताची आवश्यकता असते. एप्रिल महिन्यात म्हणजे संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर ही दोन्ही घटनादुरुस्ती विधेयके पारित करण्यासाठी सरकारने तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावले होते. मात्र सरकारला तेव्हा दोनतृतीयांश बहुमत जमवता न आल्यामुळे ही दोन्ही विधेयके लोकसभेत फेटाळली गेली होती. एकप्रकारे त्यावेळी सरकारचा पराभव झाला होता. त्यामुळे सरकार यावेळी कोणताही धोका पत्करण्याच्या मनःस्थितीत नाही. दुसऱ्यांदा ही घटनादुरुस्ती विधेयके फेटाळली जाणे सरकारला राजकीयदृष्ट्या परवडणारे नाही. त्यामुळे यावेळी आपल्याजवळ दोनतृतीयांश बहुमत जमले आहे, याची पूर्ण खात्री झाल्यावर सरकार लगेच संसदेचे दोन-तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलवेल, असा अंदाज आहे.

एप्रिलनंतर देशातील राजकीय परिस्थितीत मोठा बदल झाला आहे. विशेष म्हणजे तामिळनाडूतून द्रमुक सत्तेबाहेर गेला आहे. तामिळनाडूतील घटनाक्रमाने भाजपा आणि रालोआचे मनोबल उंचावले आहे. तामिळनाडूत भाजपाची सत्ता आल्यावरही जेवढा राजकीय फायदा भाजपाचा झाला नसता त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त फायदा तेथे टीव्हीकेची सत्ता आल्यामुळे भाजपाचा झाला आहे. राज्यात टीव्हीकेला स्पष्ट बहुमत न मिळाल्यामुळे त्याला सरकार स्थापन करण्यासाठी काँग्रेसचा पाठिंबा घ्यावा लागला.

आज द्रमुक इंडिया आघाडीतून बाहेर पडला असला तरी तो सध्या पूर्णपणे रालोआकडे झुकला नाही. एप्रिलच्या विशेष अधिवेशनात महिला आारक्षण आणि मतदारसंघाच्या परिसीमानाबाबतचे घटनदुरुस्ती विधेयक लोकसभेत फेटाळण्यामागे काँग्रेसचा मित्रपक्ष म्हणून द्रमुकची मोठी भूमिका होती. द्रमुकचा आता या दोन्ही विधेयकांना पहिलेसारखा विरोध राहिला नाही. द्रमुककडून अद्याप सरकारला याबाबतचे स्पष्ट आश्वासन मिळाले नाही. त्यामुळे विशेष अधिवेशन बोलावण्याबाबतचा अंतिम निर्णय सरकारला करता येत नाही. ज्यादिवशी द्रमुक या दोन्ही घटनादुरुस्ती विधेयकांना आपला पाठिंबा जाहीर करेल, त्याच्या दुसऱ्या दिवशी सरकार विशेष अधिवेशन बोलावेल, यात शंका नाही. या दोन्ही विधेयकांना जाहीर पाठिंबा देणे द्रमुकला राजकीयदृष्ट्या शक्य नसेल तर या दोन्ही घटनादुरुस्ती विधेयकावरील मतदानाच्या वेळी द्रमुक सरकाचा निषेध करत सभात्याग करू शकतो वा मतदानाच्या वेळी सभागृहात अनुपस्थितही राहू शकतो. कारण दोनतृतीयांश बहुमत हे सभागृहात त्यावेळी उपस्थित सदस्यसंख्येच्या प्रमाणात असते. दुसरीकडे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संख्याबळातही मोठी वाढ झाली आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडली आहे. २० खासदार या पक्षातून बाहेर पडले. शिवसेना उबाठाचे सहा खासदार शिवसेना एकनाथ शिंदे गटात आले आहेत. आम आदमी पक्षाचे सात राज्यसभा सदस्यही भाजपात सहभागी झाले आहेत. बिजू जनता दलाचे काही राज्यसभा सदस्यही भाजपात सहभागी झाले आहेत. त्यामुळे लोकसभेसोबत राज्यसभेतही भाजप बहुमताच्या जवळ पोहोचला आहे. काँग्रेसने आपल्या भूमिकेत बदल केला नाही तर काँग्रेसला वगळून अन्य विरोधी पक्षांना आपल्याकडे वळवण्याचा सरकारचा प्रयत्न राहू शकतो. एप्रिल महिन्यातील विशेष अधिवेशनात सभागृहातील फ्लोअर मॅनेजमेंटच्या मुद्यावर मोदी सरकारकडून अतिआत्मविश्वासासोबत काही चुकाही झाल्या होत्या. यावेळी मात्र सरकारने आपल्या सर्व चुका दुरुस्त केल्या आहेत. यावेळी सरकार दोनतृतीयांश बहुमत जमवण्याच्या बाबतीत प्रत्येक पाऊल सावधपणे टाकत आहे. त्यामुळे यावेळी ही दोन्ही घटनादुरुस्ती विधेयके पारित होण्यात कोणती अडचण येईल, असे वाटत नाही. गेल्या काही दिवसांपासून मंत्रिमंडळ विस्ताराची सातत्याने चर्चा सुरू आहे. पण मंत्रिमंडळ विस्ताराचे गाडे महिला आरक्षण आणि मतदारसंघाचे परिसीमन या दोन्ही घटनादुरुस्ती विधेयकांमुळे अडले आहे. जोपर्यंत ही दोन्ही घटनादुरुस्ती विधेयके पारित होणार नाहीत, तोपर्यंत मंत्रिमंडळाचा विस्तार होणार नाही, असे मानले जात आहे. ज्यादिवशी ही दोन्ही विधेयके पारित होतील, त्याच्यानंतर आठवडाभरातच मंत्रिमंडळाचा विस्तार होऊ शकतो. ■

९८८१७१७८१७

### आद्यकवी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज जयंती

मानवतेचे मूल्य समाजाला देणारे, ज्ञानीयांचा राजा, वेदांचा ज्ञाता, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज हे तेराव्या शतकातील प्रसिद्ध आद्य श्रेष्ठ संतकवी होते. त्यांचा जन्म २२ ऑगस्ट १२७५ साली श्रावण कृष्ण अष्टमीला आपेगाव, पैठण येथे झाला. यावर्षी दिनांकानुसार ४ सप्टेंबर रोजी संत ज्ञानेश्वर महाराजांची जयंती आहे. निवृत्तिनाथ हे संत ज्ञानेश्वर यांचे गुरू. निवृत्तिनाथांना नवनाथांपैकी श्री गहिनीनाथ यांनी दीक्षा दिली होती. त्यामुळे ज्ञानेश्वर हे नाथ संप्रदायाच्या शिष्य परंपरेतील होते. तसेच त्यांनी वारकरी वैष्णव भक्ती परंपरेची मुहूर्तमेढ रोवली. ‘ज्ञाना रचिला पाया तुका केलासे कळस’ हे



सार्थ झाले. ज्या वारकरी संप्रदायाचे आज आपण विराट स्वरूप बघतो आहोत, त्याचा पाया ज्ञानेश्वरांनी रचला आणि बाकी संतश्रेष्ठांसह तुकाराम महाराजांनी त्याला अत्युच्च शिखरावर नेले. संत ज्ञानेश्वर महाराजांना महाराष्ट्रात भक्तिभावाने माउली म्हटले जाते. ते सतत विठ्ठलभक्तीत लीन असायचे. त्यांनी संस्कृत भाषेतील भगवद्गीता प्राकृत मराठीत लिहून ज्ञानाचे दरवाजे सर्वसामान्यांसाठी खुले केले. तीच भावार्थदीपिका म्हणजे ज्ञानेश्वरी लिहिली. त्यांनी पसायदान लिहिले ते संपूर्ण जगाच्या कल्याणाकरिताच. जो जे वांछिल! तो ते लाहो! प्राणिजात! हेच त्यांचे ध्येय होते. केवळ मनुष्यच नव्हे, तर प्राणी, पक्षी, झाडे सर्व सुखी आणि आनंदी असावे असेच त्यांचे ईश्वराकडे मागणे होते. असे हे संतश्रेष्ठ कवी आपल्या महाराष्ट्रात जन्माला आले यासारखे दुसरे भाग्य ते काय!

त्यांचे अभंग आणि पसायदान हे लता मंगेशकर यांनी गाऊन ते प्रत्येक घराघरात पोहोचवले. एवढा अमूल्य ठेवा समाजाला देऊन ते विरक्तच राहिले. देवाचिये द्वारी उभा क्षणभरी! हरी मुखे म्हणा! हरी मुखे म्हणा! पुण्याची गणना कोण करी! हरी मुखे म्हणा याचा अर्थ अखंड नामस्मरण करण्याचा प्रयत्न करा, असे माउलींनी सांगितले आहे. तीच कलियुगातील सर्वश्रेष्ठ साधना आहे. ज्ञानेश्वर माउलींच्या चरणी कोटी कोटी कृतज्ञता.

**माधवी पत्की**/नागपूर

## वाचक पत्रे

■■■

### ग्लोबल वॉर्मिंगचा विळखा आणि हिमालयाची हाक

आज हिमालयाच्या कुशीत घडणाऱ्या घडामोडी आपल्याला एका मोठ्या संकटाची चाहूल देत आहेत. नुकतीच तिबेट आणि नेपाळच्या सीमावर्ती भागात ग्लेशियर तुटल्यामुळे आलेल्या महाप्रलयात मोठी जनहानी झाली. या दुर्घटनेत चीनच्या पूर्वसूचना यंत्रणेच्या मर्यादा पुन्हा एकदा उघड्या पडल्या असून, वेळेवर अलर्ट न मिळाल्याने मोठा अनर्थ ओढवला. विशेष म्हणजे, या आपत्तीनंतर तिथे निर्माण झालेले दोन नवीन नैसर्गिक तलाव कधीही फुटण्याची शक्यता असल्याने नेपाळसह संपूर्ण परिसर अद्याप धोक्यात आहे. नेपाळ आणि तिबेटमधून वाहणाऱ्या नद्या थेट भारताच्या दिशेने येतात. या संकटामुळे भारताच्या उत्तर आणि पूर्व भागातील जलसुरक्षेवर मोठा धोका निर्माण झाला आहे. शेजारी घडणाऱ्या या घटनांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, कारण उद्या आपल्याही सीमावर्ती राज्यांमध्ये असे जलप्रलय उभे ठाकण्याचा धोका अटळ आहे.

आज हिमालयात जे घडतंय, ती कोणतीही साधी दुर्घटना नसून ही खऱ्या अर्थाने आपत्काळाची सुरुवात आहे. आपल्या पूर्वजांनी निसर्गाप्रति कृतज्ञता म्हणून त्याला दिलेले देवत्व आणि संस्कार आपण विसरलो आहोत. निसर्गाशी प्रतारणा केल्यास विध्वंस घडू शकतो, ही त्यांनी केलेली भविष्यवाणी आता खरी ठरू लागली आहे. आज मानवाने विकासाच्या नावाखाली निसर्गाला ओरबाडणे चालवले आहे. माणसाचा लोभ वाढलाय आणि त्याची निसर्गाशी असलेली नाळ तुटली आहे. निसर्गाच्या विरोधात जाऊन केलेली कोणतीही कृती आज आपल्याला महागात पडत आहे. पृथ्वीला वाचवायचे असेल, तर आपल्याला आपली जीवनशैली बदलावी लागेल. आज निसर्गाच्या या प्रकोपामुळे भौतिक जगताच्या मर्यादा उघड्या पडल्या आहेत. अशा या भीषण संकटात माणसाला केवळ आणि केवळ परमेश्वराची भक्ती, साधना आणि अध्यात्मच तारून नेऊ शकते. नित्य साधना आणि ईश्वरावर अगाध श्रद्धा हीच संकटाच्या काळात माणसाला मानसिक बळ देणारी खरी कवचकुंडले आहेत. जेव्हा मानवाचे विज्ञान आणि तंत्रज्ञान अपुरे पडेल, तेव्हा केवळ ईश्वरी कृपा आणि आध्यात्मिक बलच आपल्याला या महाविनाशापासून वाचवू शकेल. हिमालयाचे हे अक्राळविक्राळ स्वरूप वेळीच ओळखा, अन्यथा हा रोष संपूर्ण मानवासाठी एका महाविनाशाची सुरुवात ठरेल! ■

**वर्षा आवदे**/ नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## महत्वाचे...



### एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

**सोलापूर, दि २ सप्टेंबर-**

माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल येथे भारतीय हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल पंच अनिल गिराम प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी इयत्ता विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या उत्साहवर्धक झुंबा नृत्याने कार्यक्रमात चैतन्य निर्माण केले. त्यानंतर क्रीडा प्रमुख कुमार प्रज्वल जाधव याने विद्यार्थ्यांना राष्ट्रीय क्रीडा दिनाची शपथ दिली. मुख्याध्यापिका रूपाली हजारे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळाचे महत्त्व अधोरेखित केले. यावळी इयत्ता पहिली ते दहावीच्या इंटर हाऊस क्रीडा स्पर्धांतील विजेत्या संघांचा यावेळी प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.



### सोलापुरात क्रीडा जनजागृती रॅली उत्साहात

**सोलापूर, दि. २ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हा क्रीडा कार्यालय व सोलापूर शहर व जिल्हा शारीरिक शिक्षण क्रीडा शिक्षक महासंघ यांच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त क्रीडा जनजागृती रॅली उत्साहात पार पडली. चार हुतात्मा चौक ते संगमेश्वर महाविद्यालय पर्यंत क्रीडा जनजागृती घेण्यात आली. या रॅलीत समर्थ स्पोर्टस अकॅडमी, हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालय, छत्रपती शिवाजी प्रशाला या शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला या रॅलीचे उद्घाटन सोलापूर शहर व जिल्हा शारीरिक शिक्षण महासंघाचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष दशरथ गुरव, भारती लिंगडे यांच्या हस्ते करण्यात आले. या रॅलीत ३८० खेळाडूंनी भाग घेतला. रॅली यशस्वी करण्यासाठी शहराध्यक्ष विठ्ठल कुंभार, सचिव प्रा. प्रमोद चुंगे, प्रा. राहुल हजारे, डॉ.उज्वल मलजी, मारुती घोडके, विरेश अंगडी, विक्रांत विभुते यांचे सहकार्य लाभले.

### विजापूर रोडवर मोटारीच्या धडकेने दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. २ सप्टेंबर-**



विजापूर रोडवरील अशोक नगर येथे पाठीमागून मोटर धडकल्याने दुचाकी वरील गजानन रामचंद्र कंदले (वय १९ रा.कंदलगाव ता.दक्षिण सोलापूर) हा तरुण जखमी झाला. हा अपघात आज बुधवारी पहाटे चार वाजेच्या सुमारास घडला. तो विजापूर रोडवरून अशोकनगर येथे निघाला होता. त्यावेळी पाठीमागून मोटर धडकल्याने तो जखमी झाला. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## निधन वृत्त...

### मारुती पवार



**सोलापूर, दि. २ सप्टेंबर-**

पत्रकार संजय पवार यांचे वडील मारुती भीमराव पवार (वय ८१) यांचे आज अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### आशाबाई बनसोडे



**सोलापूर, दि. २ सप्टेंबर-**

आशाबाई बब्रुवान बनसोडे (वय ७२) यांचे दि. १ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानमागील मंत्री चंडक, सोलापुरातील रहिवासी होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी आणि ५ नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते आयुष्यमान कमलाकर बनसोडे यांच्या त्या आई होत्या.

### सुगलाबाई तमशेट्टी



**सोलापूर, दि. २ सप्टेंबर**

उत्तर कसबा येथील रहिवासी सुगलाबाई संगप्पा तमशेट्टी (वय ८८)यांचे मंगळवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रसिद्ध व्यापारी उदयकुमार आणि मनपा सफाई अधीक्षक विजयकुमार तमशेट्टी यांच्या त्या आई होत्या.

### कस्तुराबाई घुले



**सोलापूर, दि. २ सप्टेंबर -**

दमाणी नगर भागातील गडदर्शन सोसायटीमधील रहिवाशी कस्तुराबाई कृष्णात घुले (वय ९७) यांचे बुधवारी सायंकाळी राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रात्री कोयनानगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.

# सांगोल्यात शुक्रवारपासून पुरुषांच्या निमंत्रित राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धा

### कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके ४५व्या स्मृती समारोहानिमित्त विविध कार्यक्रम

### सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अमृत महोत्सवी वर्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि २ सप्टेंबर-**

सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै.गुरुवर्य चंद्रशेखर विश्वनाथ तथा बापूसाहेब झपके यांचा ४५वा स्मृती समारोह व चालू वर्ष हे संस्थेचे अमृत महोत्सवी वर्ष असून त्यानिमित्त आयोजित विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न होणार असल्याची माहिती संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संस्था सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, कार्यकारिणी सदस्य विश्वेश झपके, सांगोला तालुका बास्केटबॉल असोसिएशनचे सचिव प्रशांत मस्के, प्राचार्य चारुदत्त जगताप उपस्थित होते.




या स्मृती समारोहाच्या निमित्ताने शुक्रवार ४ ते रविवार ६ सप्टेंबर या कालावधीत पुरुषांच्या निमंत्रित राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धांचे आयोजन सांगोला विद्यामंदिर येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ शुक्रवार दि.४ सप्टेंबर रोजी स.१० वा. क्रीडा व युवक सेवा, पुणे विभागाचे उपसंचालक युवराज नाईक यांच्या शुभहस्ते व सांगोला नगरपरिषदेचे नगराध्यक्ष आनंदा माने यांच्या अध्यक्षतेखाली तसेच सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश म्हेहारे आणि सांगोला तालुका क्रीडा अधिकारी सचिन रणदिवे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ रविवार दि.६ सप्टेंबर रोजी सायं.५ वा. आंतरराष्ट्रीय लायन्स संघटना प्रांत ३२३४-ड प्रांतपाल राजेंद्र शहा-कांसवा आणि लायन्स विभागीय सभापती महेश नळे यांच्या हस्ते, महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल असोसिएशनचे माजी खजिनदार अनुप राजुरकर (नागपूर) यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उद्योगपती सिद्धार्थ झपके, विलास क्षीरसागर, सुहास होनराव, ज्ञानेश्वर तेली, नागेश तेली, श्रीकांत देशपांडे, मंगेश म्हमाणे, रत्नाकर ठोंबरे यांच्या उपस्थितीत होणार आहे.

### ८ व ९ सप्टेंबरला वक्तृत्व स्पर्धा

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी मंगळवार ८ सप्टेंबर रोजी ५ वी ते ७ वी गटासाठी तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आणि बुधवार ९ सप्टेंबर रोजी ८ वी ते १० वी व ११ वी-१२ वी गटासाठी जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धांचे उद्घाटन विक्रम बिस्कीटे, सुनील जगताप यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. तरी संस्थेच्या या अमृत महोत्सवी वर्षातील सर्व कार्यक्रमांना क्रीडाप्रेमी, नागरिक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रा. झपके यांनी केले आहे.

### १६ सप्टेंबरला गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण

या स्मृती समारोहाचा मुख्य सांगता कार्यक्रम आणि गुरूवर्य बापूसाहेब झपके जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा बुधवार दि.१६ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये स.७ वा. समाधी दर्शन व सामुदायिक प्रार्थना, स.८ वा. सांगोला विद्यामंदिर येथे कै.बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करण्यात येईल. त्यानंतर स.१० वा. मुख्य सांगता समारंभ कोल्हापूरचे प्रसिद्ध व्याख्याते युवराज पाटील यांच्या हस्ते होईल.



### तालुका पोलिस ठाण्याकडून तळेहिप्परगा व मार्डीतील ३० खेळाडूंना कीट वाटप

**सोलापूर, दि. २ सप्टेंबर-**

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतुन सोलापूर ग्रामीण पोलीस दलातर्फे ऑपरेशन पहाट अंतर्गत सोलापूर तालुका पोलीस ठाणेच्या वतीने राष्ट्रीय क्रिडा दिनानिमित्त तळेहिप्परगा व मार्डी येथील खेळाडूंना सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांच्या हस्ते सोलापूर तालुका पोलीस ठाणे आवारात ३० खेळाडू विद्यार्थ्यांना ट्रॅक पॅन्ट व टी शर्टचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरज जगताप यांचे मार्गदर्शनाखाली सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम व पोलीस नाईक अनंत चमके यांनी आयोजित केला होता. यावेळी सोलापूर तालुका, पोलीस ठाणेकडील सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम, प्रवीण जर्दे, सुनिल मोरे, महिला पोलीस उपनिरीक्षक स्नेहलता सुपे, सिमा डोगरीतोंट, मार्डी व तळेहिप्परगा येथील पोलीस पाटील, तळेहिप्परगा येथील मेघराज काळे व सोलापूर तालुका, पोलीस ठाणे कडील पोलीस अंमलदार उपस्थित होते.



# जिल्हा रोल बॉल अजिंक्यपद स्पर्धा व राज्य निवड चाचणी उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ सप्टेंबर -**

रोल बॉल असोसिएशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली '१७ वर्षांखालील मुले व मुली जिल्हास्तरीय रोल बॉल अजिंक्यपद स्पर्धा आणि राज्य निवड चाचणी' काल (दि. ३० ऑगस्ट) इंदिरा प्रशाला, शिंदे चौक, भागवत थिएटरसमोरील सोलापूर येथे अत्यंत उत्साहात पार पडली. या चाचणीतून कोल्हापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सोलापूर जिल्ह्याच्या मुले-मुलींच्या संघांची निवड करण्यात आला आहे.सायंकाळी ४ ते ७ या वेळेत पार पडलेल्या या स्पर्धेत सोलापूर शहर व जिल्ह्यातील अनेक क्रीडापटूंनी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. १७ वर्षांखालील (१ जानेवारी २०१० नंतरचा जन्म असलेले) ६० खेळाडू या चाचणीत सहभागी झाले होते. स्पर्धकांमध्ये उत्कृष्ट कौशल्य आणि चुरस पाहायला मिळाली. निवड समितीच्या वतीने खेळाडूंची गती, बॉल कंट्रोल आणि सांघिक कामगिरी लक्षात घेऊन अंतिम संघांची निवड करण्यात आला. या यशस्वी आयोजनाबाबत माहिती देताना रोल बॉल असोसिएशनचे अध्यक्ष श्री. दशरथ गुरव, उपाध्यक्ष विठ्ठल कुंभार आणि सचिव प्रमोद चुंगे यांनी सर्व सहभागी खेळाडूंचे कौतुक केले व निवड झालेल्या खेळाडूंना आगामी राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेचे यशस्वी आयोजन आणि संयोजन प्रमोद म्हेत्रे , शितल कुमार शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. याप्रसंगी स्थानिक क्रीडाप्रेमी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी महाविद्यालयात क्रीडा दिन उत्साहात




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ सप्टेंबर-**

सोलापूर : देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, संघभावना आणि खेळाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे राष्ट्रीय खेळाडू व हॉकीपटू राहुल पवार यांच्या हस्ते हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी व्हॉलीबॉल, फुटबॉल व क्रिकेट या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. डॉ. आशा रोकडे मॅडम, विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण संचालिका प्रा. सुवर्णा कांबळे मॅडम यांनी केले. राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी 'खेळा, निरोगी राहा आणि संघभावना जोपासा' हा संदेश आत्मसात केला.



### जाहीर नोटीस

**अपर मुख्य सचिव तथा विशेष कार्य अधिकारी (अ.व रि.),**
**महसूल व वन विभाग, मुख्य इमारत, पहिला मजला, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

क्र.आटीएस-३४२४/३७३०/प्र.क्र.५१७/ज-५, प्र.क्र.०२ (०१) २०२५/अवपु

**श्री. शामसुंदर मोहनदास मेहता - अर्जदार**
विरुध्द
**श्री. प्रकाश रामराव मोतीवाले व इतर - गैरअर्जदार**

शहर सोलापूर मजरेवाडी, जि. सोलापूर येथील सर्व्हे नं.११३/२/१ब/१ या वाद मिळकतीबाबत उपआयुक्त (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे यांचे क्र. आरटीएस फेरतपासणी अर्ज/सोलापूर-०००६१/२०१३, दि.३१/०३/२०१८ रोजीच्या आदेशाविरूध्द प्रस्तुत अर्जदार यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाकडे दाखल केलेल्या अपिल अर्जावर अपर मुख्य सचिव (अपिल व रिव्हीजन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सुनावणीची कार्यवाही सुरू आहे.

२. सदर फेरतपासणी अर्जाच्या अनुषंगाने दि. १९/०८/२०२६ रोजी आयोजित सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले की, खालील तक्त्यात नमुद गैरअर्जदार यांना पाठविण्यात आलेली दि.१९/०८/२०२६ रोजीची सुनावणीची नोटीस सदर इसम तेथे राहत नसल्यामुळे किंवा पत्ता अपुर्ण असल्यामुळे परत आलेली आहे.

| अ. क्र. | गैरअर्जदार क्र. | गैरअर्जदाराचे नाव | गैरअर्जदाराचा पत्ता | नोटीस परत येण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | गैरअर्जदार क्र.२ ब | कु. कांचन गुरुप्रसाद शागालोलू | सर्व रा. मॉडर्न हायस्कूल समोर दक्षिण सदर बझार, सोलापूर | नमुद पत्त्यावर राहत नाही |
| २ | गैरअर्जदार क्र.२ क | श्रीमती अश्विनी गुरुप्रसाद शागालोलू | | |
| ३ | गैरअर्जदार क्र.२ ड | कु. सोनाली गुरुप्रसाद शागालोलू | | |
| ४ | गैरअर्जदार क्र.२ उ | श्रीमती राणी गुरूप्रसाद शागालोलू | | |
| ५ | गैरअर्जदार क्र.६ | श्री. पंडीत विठ्ठलराव शागालोलू | | |

३. फेरतपासणी अर्जातील उक्त नमुद पक्षकारांना सुनावणीची नोटीस प्रयत्न करूनही प्राप्त झालेली नाही. त्यामुळे, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश क्रमांक ४ मधील कलम २० नुसार सदर पक्षकारांना पर्यायी मार्गाचा अवलंब करून सुनावणीच्या नोटीसीची बजावणी करणे आवश्यक आहे.

४. सदर फेरतपासणी अर्जाची पुढील सुनावणी दि. ०५/११/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे, उक्त नमुद तक्त्यात नमुद पक्षकार त्या सुनावणीस उपस्थित राहण्याच्या अनुषंगाने, सदर पक्षकार यांना दि. ०५/११/२०२६. रोजीच्या सुनावणी सोबत जोडलेला समन्स लोकसत्ता/लोकमत /महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्राच्या राज्यस्तरीय सर्व आवृत्तीत व सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक वितरित होणाऱ्या स्थानिक मराठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करून बजावण्याची कार्यवाही अर्जदार यांनी सदर आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसांत करावी असा आदेश देण्यात येत आहे.

**दिनांक - २१/०८/२६**
**ठिकाण- मुंबई**

शिक्का

**सही/-**
**(संतोष कुमार)**
**अपर मुख्य सचिव तथा वि.का.अ. (अ.व रि.)**

### शिवलाल रामचंद वाचनालय, माढा

**वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

शिवलाल रामचंद वाचनालयाची सर्वसाधारण सभा रविवार, दि. २०/०९/२०२६ रोजी दुपारी ३ वाजता संस्थेच्या वालुबाई सभागृहात आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे. ही नम्र विनंती. विषयपत्रिका वाचनालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आली आहे. दिनांक ०३/०९/२०२६

**सही/-** संकल्प शहा (कार्यवाह)
**सही/-** झुंजार नाना भांगे (उपाध्यक्ष)

### जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३२/२०२६
नि.नं. ६

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर साहेब यांचे न्यायालयात**

१) **सुमित्राबाई सदाशिव जुजगार**
वय - ७३ वर्षे, धंदा - गृहिणी
रा. मौजे पानमंगरूळ, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

२) **मल्लप्पा नामदेव बरडोल**
वय - ३६ वर्षे, धंदा- शेती
रा. वॉर्ड नं.१४, नैकार कॉलनी, मरडी, चडचण, ता. चडचण, जि. विजापूर

३) **धुंडव्वा, परशुराम हलगल्ली**
वय - ४५ वर्ष, धंदा - गृहिणी
रा. पाण्याच्या टाकीशेजारी सोलापूर नाका, विजयपूर, ता. विजयपूर जि. विजयपूर

४) **शैला बसवराज डवळगी**
वय - ४० वर्षे, धंदा - गृहिणी
रा. बनशंकरी मंदिराजवळ, निडगुंदी, ता. निडगुंदी, जि. विजयपूर

— अर्जदार

विरूध्द
**कोणी नाही** - सामनेवाला

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII चे कलम ३ प्रमाणे अर्ज**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी कै. चंद्रभागा बसप्पा हुडदुंगे उर्फ पंचाक्षरी यांचे कायदेशीर वारस असलेबाबत जाहीर होऊन मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सदर कै चंद्रभागा बसप्पा हुडदुंगे उर्फ पंचाक्षरी यांचे दिनांक ०८/०२/२००३ रोजी रोजी निधन झाले आहे.

त्याअर्थी अर्जदार हे के चंद्रभागा बसप्पा हुडदुंगे उर्फ पंचाक्षरी यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत कोणाचीही कोणतीही तक्रार अथवा हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर रोजी मे. वकिलामार्फत मे. न्यायालयाने नेमलेली तारीख १२/१०/२०२६ न्यायालयात हजर राहून म्हणणे द्यावे अन्यथा मे. न्यायालय अर्जदार हे कै. चंद्रभागा बसप्पा हुडदुंगे उर्फ पंचाक्षरी यांचे कायदेशीर वारस असलेबाबत योग्य ते आदेश पारीत करतील याची नोंद घ्यावी.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले तारीख :- ०२/०९/२०२६

**सही/-** क. लिपीक
कोर्टाचा शिक्का
**सही/-** सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय अक्कलकोट

### जाहीर समन्स/नोटीस

आर.टी.एस. अपील. ३५१/२०२५

**सोलापूर येथील मा. उपविभागीय अधिकारी साहेब यांचे कोर्टात**

**संजय सुधाकरराव पाटील - अपेलंट**
विरुध्द
**सुशिलकुमार सुधाकरराव पाटील - रिस्पॉंडंट**

प्रति,

१. **सुशिलकुमार सुधाकरराव पाटील,** रा. १/१/४३३/१, १२९४ सी (१)/४६०, लिंबोणी बाग, शिंगाडे मिलजवळ, तांबरी विभाग, धाराशिव, ता व जि. धाराशिव-४१३५०१
२. **श्रीकांत सुधाकरराव पाटील,** रा. २६/२०९३, (३१)/१२००, ज्ञानेश्वर मंदिराचे पाठीमागे, महसुल कॉलनी, महात्मा गांधी नगर, धाराशिव, ता व जि. धाराशिव - ४१३५०१
३. **पद्मीनी सुधाकरराव पाटील** रा. १/१/४३३/१, १२९४ सी (१)/४६०, लिंबोणी बाग, शिंगाडे मिलजवळ, तांबरी विभाग, धाराशिव, ता व जि. धाराशिव ४१३५०१
६. **शैलजा भारत माने-पाटील,** रा. राजेसंभाजी चौक, मु.पो. जत, ता. जत, जि. सांगली
७. **मयत संगिता विश्वास देशमुख यांचे वारस**
**७ब) विक्रांत विश्वास देशमुख,** रा. पाटील प्लॉट, कर्मवीर नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर **७क) विशाखा महेश डुरे,** रा. द्वारा योगेश भारत डुरे, माढा रोड लगत इर्ले. ता. बार्शी, जि. सोलापूर
**७ड) सौ. पायली सुरज जगताप,** रा. द्वारा सुरज केशवराव जगताप-पाटील, राजर्षी शाहु नगर, के. एन. भिसे कॉलेज समोर, परंडा रोड लगत, कुर्दुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर
८. **मयत कल्पना संजय शिंदे यांचे वारस**
**८अ) संजय रामचंद्र शिंदे, ८ब) उत्कर्षा ऊर्फ सई संजय शिंदे, ८क) ईश्वरी संजय शिंदे, ८ड) कृष्णा संजय शिंदे,**
सर्व रा. शहाजी नगर, बावडा, ता. इंदापूर, जि. पुणे

ज्याअर्थी, अपेलंट यांनी रिस्पॉंडंट यांचे विरुध्द प्रस्तुतचे अपील दाखल केलेले आहे. सदर मे. कोर्टाने वेळोवेळी रिस्पॉंडंट नं. १, २, ३ व ६, ७ब, ७क, ७ड, ८अ, ८ब, ८क, ८ड यांचे विरुध्द त्यांचे पत्त्यावरती नोटीसा रजि. पोस्टाने काढलेल्या आहेत. सदर अपीलाचे नोटीस घेऊन संबंधित कर्मचारी सरनाम्यात दिलेल्या नमुद पत्त्यावर बजावणी करिता गेले असता, सदर पत्त्यावर नोटीस बजावणी स्विकारली नाही व चुकीचे पत्ते असलेबाबतचा चुकीचा रिपोर्ट प्राप्त झालेला आहे. तुम्ही जाणीवपूर्वक नोटीसची बजावणी हेतु पुरस्सर टाळाटाळ करीत आहात. तुम्हास सदर अपीलाची नोटीस बजावणी होणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे.

त्याअर्थी, या जाहीर नोटीसीद्वारे आपणास सुचित करण्यात येते की, आपण सदर अपीलकामी हे जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अथवा पुढील नेमलेली ता. २३/०९/२०२६ रोजी स्वतः अथवा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून मुदतीत आपले म्हणणे लेखी स्वरुपात मा. न्यायालयात सादर करावे. मुदतीत आपण हजर होवून आपले म्हणणे दिले नाहीतर आपणांस सदर नोटीस बजावणी होवूनही आपणांस काहीही सांगायचे नाही असे समजुन मा. न्यायालय सदरकामी पुढील यथा योग्य आदेश करतील याची नोंद घ्यावी.

सदरचे जाहीर समन्स आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे ता. ०२/०९/२०२६

शिक्का

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी**
**सोलापूर क्र.१. सोलापूर**

# RATANCHAND SHAH SAHAKARI BANK LTD.

## STATUTORY AUDIT REPORT FOR THE YEAR 2025-2026

[Under Section 31 of the Banking Regulation Act, 1949 and 81 (5-B) of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and Rule 69 of Maharashtra Co-operative Societies Rules, 1961]

**To,**
**The Members,**
Ratanchand Shah Sahakari Bank Ltd.,
Bajar Chowk,
Mangalwedha -413305

**Report on the Financial Statements**

We have audited the accompanying financial statements of Ratanchand Shah Sahakari Bank Ltd., Mangalwedha ('the Bank') as at 31st March 2026, which comprise the Balance Sheet as at 31 March 2026 and the Profit and Loss Account for the year then ended, and a summary of significant accounting policies and other explanatory information incorporated in these financial statements of the Bank along with its' branches audited by us for the year 1 April, 2025 to 31st March, 2026 in accordance with the letter of appointment no. HO/295/2025-26 dated 10/10/2025 issued by the Bank in terms of RBI approval no. Insp/Nag/S-549/15.10.008/2025-26 dated 18/09/2025.

**Management's Responsibility for the Financial Statements**

Management is responsible for the preparation of these financial statements that give a true and fair view of the financial position, financial performance and cash flow of the Bank in accordance with the Banking Regulation Act 1949 (as applicable to co-operative societies), the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, and the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961, (as applicable and as amended from time to time), the guidelines issued by the Reserve Bank of India and the Registrar of Cooperative Societies, Maharashtra, and generally accepted accounting principles in India so far as applicable to the Bank. This responsibility includes design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation of the financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error.

**Auditor's Responsibility**

Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit.

We conducted our audit in accordance with Standards on Auditing issued by the Institute of Chartered Accountants of India. Those Standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatements.

An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgement, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to the Bank's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedures that are appropriate in the circumstances, but not for the purpose of expressing an opinion on effectiveness of the Bank's internal control. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.

We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion.

**Basis of Qualified Opinion**

a. Non-Compliance with mandatory Accounting Standards as per Annexure A, effect of which is not quantified.
b. The Net Loss for the year is understated to the extent of Rs. 93,40,630/- due to the following adjustments/ observations
i. Non-reversal of interest on accounts identified as NPA during audit - Rs. 2,12,249/-
ii. Short provision for NPA to the extent of Rs. 30,24,799/-
iii. Non reversal of unrecovered charges debited to NPA Advances - Rs. 33,73,859/-
iv. Provision for Other Assets of Rs. 28,61,817/-
v. Interest Receivable on G-sec is booked lesser by Rs. 1,32,094/-
C. The Bank has overstated its' Net Worth (Capital Funds) by Rs. 93.41 Lacs in respect of matters stated in para (b) above.

Opinion

Subject to our remarks in the para on "Basis of Qualified Opinion", in our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the aforesaid financial statements, together with the Notes thereon, give the information required by the Banking Regulation Act, 1949 (as applicable to cooperative societies), the Maharashtra Cooperative Societies Act, 1960, the Maharashtra Cooperative Societies Rules, 1961 and the guidelines issued by the Reserve Bank of India as also Registrar of Cooperative Societies, Maharashtra in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India:
(a) In the case of the Balance Sheet, of the state of affairs of the Bank as at 31st March 2026;
(b) In the case of the Profit and Loss Account, of the Loss for the year ended on that date 31st March 2026.

Report on Other Legal & Regulatory Requirements

The Balance Sheet and the Profit and Loss Account have not been drawn up in Forms "A" and "B" respectively of the Third Schedule to the Banking Regulation Act, 1949 and provisions of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and the Maharashtra Co-operative Societies Rules 1961.

1. **We report that:**
   * We have obtained all the information and explanations, except stated otherwise, which to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found to be satisfactory;
   * In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Bank, except stated otherwise, so far as it appears from our examination of those books and proper returns adequate for the purposes of our audit have been received from the branches/offices;
   * The Balance Sheet, the Profit and Loss Account dealt with by this report, are in agreement with the books of account and the returns, except as stated separately;
   * Except for the matters described in the Para (a) and (b) of the Basis for Qualified Opinion paragraph, in our opinion, the Balance Sheet, Statement of Profit and Loss comply with applicable Accounting Standards.
   * Subject to the matters described in the Para (a) and (b) of the "Basis for Qualified Opinion" paragraph, the transactions of the Bank, which have come to our notice, have been within the powers of the Bank.
2. As per the information and explanations given to us and based on our examination of the books of account and other records, we have not come across material instances in respect of matters mentioned in the Rule 69(6) of Maharashtra Cooperative Societies Rules 1961, except otherwise reported.
3. We further report that for the year under audit, the Bank has been awarded "D" classification, in accordance with the CAMELS Rating Model promulgated by the Reserve Bank of India.

*For VDA & Associates.*
*Chartered Accountants,*
*FRN: 119179W*

*CA Ajay Naval Partner*
*M. No.: 163625Place: Pune*
*Date: 29.06.2026*
*UDIN: 26163625YSZBKT3587*



# रतनचंद शहा सहकारी बँक लि.

स्थापना : १९६२

मुख्यालय : बाजार चौक, मंगळवेढा, जि.सोलापूर.. फोन : ०२१८८-२२०३५५
email: ho@rss.bank.in



## दिनांक-३१ मार्च २०२६ रोजीचा ताळेबंद

| ३१/०३/२०२५ रक्कम रुपये | भांडवल व देणी | | ३१/०३/२०२६ रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| | **१) भाग भांडवल** | | |
| **२५००००००.००** | अ) अधिकृत भाग भांडवल | २५००००००.०० | |
| **१५९९४१२००.००** | ब) वसूल भाग भांडवल | १८५२६००००.०० | **१८५२६००००.००** |
| **५८०५२५५२९.७२** | **२) राखीव व इतर फंड** | | **५८१४०८८०१.५७** |
| ९०९४२०५१.२५ | राखीव निधी | ९१६४०३०४.४० | |
| २०२५१८०१.४७ | इमारत निधी | २०२५१८०१.४७ | |
| ३०७९१७२६७.०० | बुडीत व संशयित निधी | ३०५३९०५२७.७० | |
| ५४४५१८७.०० | उत्तम जिंदगीवरील आकस्मिक तरतूद | ५४४५१८७.०० | |
| ४५००००.०० | निवडणूक निधी | ३५००००.०० | |
| २०८०५३१६.०० | गुंतवणूक चढउतार निधी | १९८३५३१६.०० | |
| १७३००००००.०० | गुंतवणूक घसारा निधी | १७१४७०००.०० | |
| १०४६६११९०७.०० | गैरव्यवहार तरतूद | १०४६६११९०७.०० | |
| १२७५२०००.०० | पुर्नमूल्यांकन निधी | १२४६७७५८.०० | |
| ०.०० | बँक ताळमेळ तरतूद | ९२२०००.०० | |
| ०.०० | ऑादर असेट तरतूद | ३२९७०००.०० | |
| **२१५६५५८५४९.३५** | **३) ठेवी** | | **१८७९१५७४१७.९०** |
| १००२८.५० | पुनर्गुंतवणूक ठेव | १००२८.५० | |
| ४०१०५८९०५.३० | मुदत ठेव | २४१४८९८०९.३० | |
| ११८८२०२५.०० | रिकरिंग ठेव | ११३४००७५.०० | |
| २९८७९३१३.०० | पिग्मी ठेव | २९२४१२१७.०० | |
| २७१३९०७९७.९४ | सेव्हींग ठेव | २६७५२८६३९.२० | |
| २४३६२०१३.४१ | चालू ठेव | २२१९८८८५.८५ | |
| ६७२५६.०० | शॉर्ट टर्म डिपॉझीट | ६७२५६.०० | |
| ४२६३०४.०० | फॅमिली पेशन ठेव | ३४५३०४.०० | |
| १३३५६९१२४.०० | क्युम्युलेटिव्ह ठेव | ९०२९२६०१.०० | |
| २७६३१६५५५.२० | दामदुप्पट ठेव | २२०५६७७४४.२० | |
| १००७५९६२२७.०० | मुदत ठेव १५ महिने | ९९५६०७६०८.०० | |
| ४१२६५०.८७ | लाडकी बहिण योजना | ४६८२४९.८५ | |
| ०.०० | कर्जावरील जमा शिल्लक | १३८०२३५.२० | **१३८०२३५.२०** |
| **२१६५१६५४६८.९३** | **५) व्याज अनामत** | | **१५१३४६२५४९.२२** |
| **२१६५१६५४६८.९३** | अ) थकीत कर्जावरील व एन.पी.ए. कर्जावरील व्याज | १५१३४६२५४९.२२ | |
| **६६८५९०१४.२२** | **६) व्याज देणे मुदत ठेव** | ६९०३८३७०.०० | **६९०३८३७०.००** |
| **३५१५१९४२६.६८** | **७) इतर देणे** | | **३०६०२५९४.४१** |
| १५५१००.०० | शेअर अनामत | १५५१००.०० | |
| ११०४५६४.०० | अनामत | १०८७८४१.०० | |
| ५१३१६८.१५ | संड्री क्रेडीटर्स | ०.०० | |
| ४२११८.०० | कर्मचारी विमा देणे | ४२४०७.०० | |
| ११६७०९४.३२ | ऑडीट फी देणे | ९१२३६०.०० | |
| १६०११६.०० | पिग्मी कमिशन देणे | १७२२०५.०० | |
| २६८२९.०० | स्टाफ आणि पिग्मी इनकम टॅक्स देणे | १५२९.०० | |
| १३४०.०० | टि.डी.एस. ऑन कॅश विड्रॉल | ०.०० | |
| ५०६३५५.०० | कायदेशीर खर्च पेएबल | ४३५२७६.०० | |
| ६८८७६२.०० | वकिल फी देणे | ६७१७६२.०० | |
| ६४९७६६.२२ | कोर्ट खर्च देणे | ८५५८५७.२२ | |
| २४३७९२.५० | जी.एस.टी देणे | ४४९५८.०० | |
| ४५२३५२.०० | कर्मचारी प्रा. फंड देणे | ४१२२३६.०० | |
| ६४०० | कॅश सस्पेन्स | ०.०० | |
| ०.०० | इमारत भाडे देणे | ३०००.०० | |
| ५१००००००.०० | बँक इनकम टॅक्स देणे | ७४७५०००.०० | |
| १२६२५.०० | कर्मचारी व्यवसाय कर देणे | १२५००.०० | |
| २४११०३.०० | देखभाल खर्च | २१७५९०.०० | |
| ४१५८०.०० | सिक्युरिटी गार्ड पेएबल | ०.०० | |
| ४७०८१५४.८२ | टीडीएस देणे | २९६२१४३.८२ | |
| १४८९८२०६.६७ | डिफ अकाऊंट देणे (आर.बी.आय) | १५०६०६२१.३७ | |
| ०.०० | विमा शुल्क देणे | ८०२०८ | |
| | **८) नफा :-** | | ०.०० |
| **५१६०५६९१८८.९०** | **एकूण :-** | | **४२६०३०९९६८.३०** |

| ३१/०३/२०२५ रक्कम रुपये | मालमत्ता व येणी | | ३१/०३/२०२६ रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| | **१) रोख व हातातील शिल्लक** | | |
| **३४८६६२१७.६०** | **अ) हातावरील रोख शिल्लक** | | **२११२०८९१२.३५** |
| **१००१०००००.००** | **ब) रिझर्व्ह बँक खाते वरील शिल्लक** | | **१२०१०००००.००** |
| **१६२५३२७५६.३७** | **क) इतर बँकांतील शिल्लक** | | **१५४८६४२१४.८७** |
| **१२५७८९६१.८०** | एम.एस.सी. बँक मुंबई चालू ठेव | ६२४४१८३.८९ | |
| **५३८९२९९७.४२** | सोलापूर डी.सी.सी बँक चालू ठेव | ६०९९५३७०.३२ | |
| **४१५००६७३.५३** | बँक ऑफ इंडिया चालू ठेव खाते | ५२३८७००६.३९ | |
| **४६४८३००.०१** | स्टेट बँक ऑफ इंडिया चालू ठेव खाते | ५७४२५५१.८६ | |
| **५६२१५८६.८८** | बँक ऑफ महाराष्ट्र चालू ठेव खाते | ९५३५४१७.८९ | |
| **१२७६८३७०.८२** | आय.डी.बी.आय बँक चालू ठेव खाते | ७५९८२७९.१७ | |
| **१७३३४४९९.३३** | ॲक्सीस बँक चालू ठेव खाते | ११५२७६८८.९४ | |
| **५४००२७.१८** | युनियन बँक ऑफ इंडिया | ३८०५०२.११ | |
| **१३६४७३३९.५०** | येस बँक | ४५३२१४.३० | |
| **९४०६२७४१८.००** | **२) गुंतवणूक** | | **८४३३९७१८७.००** |
| **५०९७१२६४६.००** | अ) हेल्ड टू मॅच्युरिटी | **४३५४८५०१०.००** | |
| १६५११३३००.०० | १) केंद्र सरकार कर्ज रोखे (सी.जी.एल. खाते) | १६५०८३७१०.०० | |
| २९४७८१९४६.०० | २) राज्य सरकारी कर्ज रोखे (सी.जी.एल. खाते) | १७०८१२८००.०० | |
| ४९८९७४००.०० | ३) ट्रेझरी बील | ९९५८८५००.०० | |
| **३४५७३१८०३.००** | ब) अव्हेलेबल फॉर सेल | **३९६५१८३९९.००** | |
| ५९००३०००.०० | १) केंद्र सरकार सरकारी कर्ज रोखे (सी.जी.एल. खाते) | ५००७५०००.०० | |
| २८६७२८८०३.०० | २) राज्य सरकारी कर्ज रोखे (सी.जी.एल. खाते) | ३४६४४३३९९.०० | |
| १२७४९६९.०० | डी.सी.सी बँक सोलापूर शाखा मंगळवेढा नॉन रिफंडेबल | १३६५७७८.०० | |
| ८३८०००००.०० | सोलापूर डी सी सी शाखा मंगळवेढा फिक्स डिपॉझिट | १००००००००.०० | |
| २७०००.०० | डी.सी.सी बँक सोलापूर शेअर्स | २७०००.०० | |
| १०००.०० | एम.एस.सी बँक मुंबई, शेअर्स | १०००.०० | |
| **१३३३११४१९०.९५** | **३) कर्जे** | | **११८५२४८१४८.२३** |
| **५८६०५२०९८.४२** | **अ) अल्प मुदत कर्जे** | **४६८७९४०५०.७२** | |
| ९०७१६९७०.२१ | १) सरकारी व इतर मायवर सिक्युरिटी तारण | ८५२४४३०१.९० | |
| ४९५३६३२४२.७१ | २) इतर तारणावर | ३६८४५७८४५.८२ | |
| १७७१८८५.५० | ३) वैयक्तिक जबाबदारीवरील | १५०९१९०३.०० | |
| **१७१४८००५४.६२** | **ब) मध्यम मुदत कर्जे** | **२८०९६२०६७.०२** | |
| ५०५९४९.०० | १) सरकारी व इतर मायवर सिक्युरिटी तारण | ११८४३९४.०० | |
| ५१११४३८५.६२ | २) इतर तारणावर | २११८४५५०९.०२ | |
| ११९८५९७२०.०० | ३) वैयक्तिक जबाबदारीवरील | ६७९३२१६४.०० | |
| **५७५५८२०३७.९१** | **क) दिर्घ मुदत कर्जे** | **४३५४९२०३०.४९** | |
| ५७५५८२०३७.९१ | १) इतर तारणावर | ४३५४९२०३०.४९ | |
| **१२७५२०००.००** | **४) इमारत** | | **१२४६७७५८.००** |
| १२७५२०००.०० | बिल्डिंग रिव्हॅल्युएशन रिझर्व्ह | १२४६७७५८.०० | |
| **३१४७४०.२९** | **५) शाखा ताळेमेळ** | १४३३११.०० | **१४३३११.००** |
| **३२७५१६७.००** | **६) जागा व इमारत** | **३२७५१६७.००** | **२९९०९२५.००** |
| ०.०० | चालू सालातील वाढ | ०. | |
| २८४२४२.०० | - झीज | **२८४२४२.००** | |
| ३०१२३००.८३ | **७) फर्निचर** | **३०१२३००.८३** | **२४८३२४८.४३** |
| ०.०० | चालू सालातील वाढ | ०.०० | |
| ६९३०९०.४० | - झीज | **५२९०५२.४०** | |
| २६६८३१०.६९ | **८) डेडस्टॉक खाते शिल्लक** | **२९६८३१०.६९** | **२११६४८९.९३** |
| ०.०० | चालू सालातील वाढ | १६९३७.५० | |
| ९१०५००.३९ | - झीज | ५६८७५८.२६ | |
| **१.००** | **९) वाहन खाते** | १.०० | **१.००** |
| ०.०० | चालू सालातील वाढ | ०.०० | |
| **२१८८०६००८४.८५** | **१०) येणे व्याज** | | **१५२२७४६१०३.२२** |
| २२८९४६१५.९२ | अ) पी.ए. कर्जावरील व्याज | ९२८३५५४.०० | |
| २१६५१६५४६८.९३ | ब) थकीत कर्जावरील व एन.पी.ए कर्जावरील व्याज | १५१३४६२५४९.२२ | |
| **१५३९८५९०५.४३** | **११) इतर येणी** | | **१५२२३९५१२.३३** |
| ५४०४००.०० | स्टाफ दिवाळी ॲडव्हान्स | ५३७२००.०० | |
| १२८५२२७२.०० | व्याज येणे जी.ओ.आय | १११५१५८७.०० | |
| ६९२४०.०० | पिग्मी एजंट दिवाळी ॲडव्हान्स | ६०८४०.०० | |
| ६९१३४.०० | टेलिफोन सुरक्षा ठेव येणे | ६९१३४.०० | |
| १६४४४८८.०० | ॲडव्हान्स अनामत | १५४८२८८.०० | |
| १६५२९९०.०० | टी.डी.एस येणे डिपॉझीट वरील | १६५२९९०.०० | |
| १३५७०.०० | एम.एस.इ.बी. सुरक्षा ठेव | १३५७०.०० | |
| ६५००००००.०० | बँक इनकम टॅक्स ॲडव्हान्स | ९९७५०००.०० | |
| १३८९४८०.०० | ॲडव्हान्स इनकम टॅक्स | ४८६४४८०.०० | |
| १४८९८२०६.६७ | डिफ अकाऊंट येणे (आर.बी.आय ) कॉन्ट्रा | १५०६०६२१.३७ | |
| ३१०२५.७६ | डिफ क्लेम रिसीव्हेबल | ३३२४१.९६ | |
| १०३६५८९९६.०० | गैरव्यवहार रक्कम येणे | १०३६५८९९६.०० | |
| ४४६२१.०० | लॉकर भाडे येणे | ४३४३६.०० | |
| ९५१३८४०.०० | गुंतवणूकीवरील येणे व्याज | १५७०६८५.०० | |
| ३७४४६३.०० | आगाऊ भरलेला विमा | ३५११७६.०० | |
| ७३३१७९.०० | शुल्क येणे | १५६८०५९.०० | |
| ०.०० | विमा शुल्क येणे | ८०२०८.०० | |
| **२२५२६००९५.७९** | **१२) लॉस अकाऊंट** | | **२४०३०४१५६.९४** |
| ४४३६०८५२.०७ | चालू वर्षातील तोटा | १५०४४०६१.१५ | |
| १८०८९९२४३.७२ | मागील वर्षातील तोटा | २२५२६००९५.७९ | |
| **५१६०५६९१८८.९०** | **एकूण** | | **४२६०३९९६८.३०** |

तपासले, ऑडीट मेमोतील शेऱ्यास पात्र राहून बरोबर आहे
**व्ही. डी. ए. ॲण्डअसोसिएट्स, चार्टर्ड अकाऊंटंट, पुणे**

**श्री. किशोर मंगेश ब्रम्हे**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**श्री.महादेव सत्याप्पा माळी**
**व्हा. चेअरमन**

**श्री. राहुल सुभाष शहा**
**चेअरमन**

पान ७ वर...

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## खरेदीपूर्व जाहिर नोटीस

तमाम जनतेला या जहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन मिळकतीचे वर्णन डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढीतील मौजे बाळे येथील सर्व्हे नं. ५३/१ यांस नवीन सिटी सर्व्हे नं. १००९ पैकी बिनशेती प्लॉट जागा याचे वर्णन खालीलप्रमाणे सर्व्हे नंबर-५३/१, सि.स.नं. प्लॉ-१००९, प्लॉट नंबर, ३१ पैकी उत्तरेकडील बाजूची, क्षेत्र १४२.६३ चौ.मी अथवा १५३४.६९ चौ. फुट, यांसी हद्द पुर्वपश्चिम ५१.१६ फुट, दक्षिणोत्तर ३० फुट इतके आहे. यांसी प्लॉट जागेची चतुःसीमा - पुर्वेस :- ६.०० मी. रस्ता त्यापलीकडे प्लॉट नं. ३२, दक्षिणेस :- प्लॉट नं.३१ पैकी मूळ मालक गोटे यांची प्लॉट जागा, पश्चिमेस :-प्लॉट नं.९, उत्तरेस :- ६.०० मी रस्ता इतके आहे. आणि सर्व्हे नंबर ५३/१, सि.स.नं. १००९, प्लॉट नंबर ३१ पैकी दक्षिणेकडील, बाजुची, क्षेत्र - १३४.२७ चौ.मी अथवा १४४४.७४ चौ. फुट. यांसी प्लॉट जागेची चतुःसीमा-यांसी हद्द पुर्वपश्चिम ५१.१६ फुट, दक्षिणोत्तर २८.२३ फुट इतके आहे. पुर्वेस :- ६.०० मी रस्ता त्यापलीकडे प्लॉट नं. ३२ए, दक्षिणेस :- प्लॉट नं. ३४ए, पश्चिमेसः-प्लॉट नं. ९, उत्तरेस :- प्लॉट नं.३१ पैकी मूळ मालक गोटे यांची प्लॉट जागा इतके आहे.

यातील लिहून देणार नं. १ व २ यांनी लिहून घेणार आमचे आशिल नं. १ व २ यांना प्लॉट नं. ३१ याचे एकूण क्षेत्र २७६.९० चौ.मी अथवा २९७९.४४ चौ. फुट इतकी प्लॉट जागा विक्री केलेली आहे. सदर बिनशेती प्लॉट जागेचे आमचेशिवाय दुसरे कोणीही मालक वहिवाटदार नाहीत अशी आम्ही तुम्हास खात्री देतोत. सदर बिनशेती प्लॉट जागा विक्री करण्याचा आम्हाला पूर्ण अधिकार आहे.

सदरची घरजागा बिनशेती प्लॉट जागा आमचे अशिल यांना कायम खुषखरेदी देण्याचे कबुल करून आमचे अशिलांना इसारा पावती लिहून देवून इसारा रक्कम स्विकारली आहे. सदर प्लॉट जागेचा व्यवहार करून त्यांचे नावे खरेदीखत लिहून देण्याचे ठरले आहे. सदर प्लॉट जागा निर्वेध निजोखमी असल्याची खात्री त्यांना आमचे अशिलांना दिलेली आहे तथापी सदर प्लॉट जागेबाबत कोणाचीही मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, बोजा, टाच, जप्ती, लीज, वा अन्य कोणाचाही कसल्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिधदीकरण झाल्यापासून १० दिवसांचे आत खालील पत्यावर समक्ष याऊन लेखी स्वरूपात कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवून द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदरची शेतजमीन ही निर्वेध निजोखमी असल्याचे ग्राहय कोणाची कसलीही हरकत वा तक्रार ही आमचे अशिलांनी खरेदी घेतल्यावर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. ही जाहीर नोटीस दिली दि. ०१/०९/२०२६

सही/-
**ॲड. स्वरूपा संगप्पा कवलगी**
बी.ए., एम.एस.डब्ल्यू., एल.एल.बी.
रा. इ-१४९/१५० श्रीशैल नगर,
भवानी पेठ सोलापूर ४१३००२
मो.नं. ८६२५८०६६८९
आमचे आशील बनसोडे व इतर एक

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :-** डि. व सब डि. सोलापूर, ता. दक्षिण सोलापूर मौजे धोत्री येथील भूमापन गट नं. २४४/५ जिरायत शेतजमीन याचे एकूण क्षेत्र हेक्टर १ आर ७०, आकार रु. १.०५ पैसे इतके आहे. यांसी मुळ गटाची चतुःसिमा :- पुर्वेस : गट नं. २४४/४, पश्चिमेस : गट नं. २४४/६, दक्षिणेस : कुंभार यांची शेतजमीन, उत्तरेस : रस्ता, असे आहे. सदर शेतजमीन सिद्रामप्पा राचय्या स्वामी यांचे मालकीची असून ७/१२ उताऱ्यावर त्यांचे नावाची नोंद फेरफार क्र. ३५८ ने झालेली आहे. सदर मिळकत त्यांनी आमचे अशिल यांना विक्री करण्याचे ठरवून इसारापोटी रक्कम नोटरीकृत इसारा पावती लिहून दिलेले आहे. सदर प्लॉट जागा निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री त्यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे.

तरी परंतु सदर मिळकतीत कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, करार, दान, लिज, बक्षिस, साठेखत, खरेदीखत, वाटणी, पोटगी, टाच, जप्ती, कुळ, वहिवाट, कब्जाकरार, मदार, या संबंधीचा हक्क असेलस आणि इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचा बोजा, हक्क व हितसंबंध असलेस अथवा सदर मिळकती सबंधी कोणाचीही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास अथवा कोणत्याही प्रकारे सावकारी बोजा असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत सदर मिळकतीत असलेले हक्क दर्शविणारे कागदपत्रे पुराव्यासह खालील नमुद पत्यावर प्रत्यक्ष येऊन असलेल्या हक्काची खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार व हरकत न आल्यास ठरल्याप्रमाणे आमचे अशिल यांनी वरील मालकांबरोबर ठरवलेला वर नमुद मिळकती संबंधीच्या व्यवहारास कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार आमचे अशिल यांचेवर अगर त्यांनी खरेदी करुन घेतलेल्या मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाची फसवणूक, गैरसोय, नुकसान होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ही जाहीर नोटीस दिली ता. ०२/०९/२०२६

सही/-
**के. एम. शेख ॲन्ड एम.ए. नालवार**
ॲडव्होकेट्स
कार्यालय पत्ता : गाळा नं. ९,
लोखंडवाला टॉवर, पानगल
शाळेसमोर, जिल्हा परिषद रोड, सोलापूर
मो.नं. ९८२२५२६५६५, ९१७५४००४४४,

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, शहर अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील सि.स.नं. २०७४/अ यांसी एकूण क्षेत्र ४८४.८० चौ.मी. पैकीच्या निवासी इमारतीतील पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र. १०३ यांसी क्षेत्रफळ ५९.७१ चौरस मीटर मोजमापाची फ्लॅट ही श्रीमती अनिता सुनिल बंडगर, साहिल सुनिल बंडगर व स्वप्नील सुनिल बंडगर सर्व रा. अक्कलकोट, जि. सोलापूर यांच्या मालकी वहिवाटीची असून, त्यांनी वर नमुद मिळकत आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरविले आहे. त्याखातर त्यांनी आमच्या अशिलांकडून इसारादाखल रक्कम ही स्विकारलेली आहे. वरील मिळकतधारक श्रीमती अनिता सुनिल बंडगर, साहिल सुनिल बंडगर व स्वप्नील सुनिल बंडगर यांनी सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची हमी आमच्या अशिलांना दिली आहे.

तरी वर नमुद मिळकतीबाबत कोणाचेही हरकत व कायदेशीर हक्क लिज, गहाण, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, टाच, जप्ती, कोर्ट केसेस, साठेखत अगर सावकारी देणे-घेणे अथवा अन्य तऱ्हेचा हक्क व अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात हरकती कागदोपत्रानिशी खालील नमुद पत्यावर कळविण्यात यावे. सदर मुदतीत हरकती न आल्यास आमचे अशिल वर नमुद मिळकत ही निर्वेध निजोखमी असल्याचे गृहीत धरुन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, याची नोंद घ्यावी. मग त्यानंतर येणारी हरकत आमच्या अशिलांवर व वर नमुद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचेही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे, तारीख ०२/०९/२०२६.

सही/-
**व्ही.बी. पाटील**
ॲडव्होकेट ॲन्ड नोटरी भारत सरकार
रा. उत्कर्ष नगर, अक्कलकोट, जि. सोलापूर
मो.नं. ७५८८०४७५६२
अशिलातर्फे ॲडव्होकेट

Savitriabai Phule Shikshan Prasarak Mandal's

**N B Navale Sinhgad College of Engineering, Kegaon, Solapur**

Approved by DTE, AICTE & Affiliated to PAH Solapur University, Solapur

Accredited by **NAAC** with **"A" Grade**

**Website: www.sinhgadsolapur.org**

**Contact No.: 8380025630/8380025688**

IL and A-CAP ADMISSIONS 2026-27
Institute Code: 06640

Applications are invited for Institute Level (IL) Seats & Seats remaining vacant after CAP (ACAP) rounds (if any), for First Year B.Tech., Direct Second Year B.Tech., and First Year M.Tech. on or before date of allotment of final CAP Round of respective course.

| Under Graduate Course | Choice Code | IL Seats for F.Y.B.Tech. |
|---|---|---|
| Computer Science & Engineering | 0664024210 | 09 |

For Detailed information regarding admission Rules, Procedure & Schedule visit to college website.

**Chairman, SPSPM**



स्थापना : १९६२

# रतनचंद शहा सहकारी बँक लि.

मुख्यालय : बाजार चौक, मंगळवेढा, जि.सोलापूर.. फोन : ०२१८८-२२०३५५
email: ho@rss.bank.in



### दिनांक-३१ मार्च २०२६ अखेरच्या वर्षाचे नफा-तोटा पत्रक

| ३१.०३.२०२५ रक्कम रुपये | खर्च | | ३१.०३.२०२६ रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १४६३७९९६६.६० | १) व्याज नावे - ठेवी व कर्जावरील | | १२९७८८८३१.०० |
| १४६२९४०२३.६० | ठेवींवरील व्याज नावे | १२९७८८८३१.०० | |
| ८५९४३.०० | कर्जावर दिलेले व्याज | ०.०० | |
| २६२०१७४६.०० | २) पगार, भत्ते, प्रा.फंड | | २५५८१६४३.०० |
| २६२०१७४६.०० | पगार, भत्ते, प्रा.फंड व प्रशासकीय खर्च | २५५८१६४३.०० | |
| ६६५३४.०० | ३) जनरल मिटींग खर्च | ८६८६४.०० | ८६८६४.०० |
| ५४७३२९८.०० | ४) भाडे, दिवाबत्ती, विमाकर इ. | ७७५७५७०.०० | ७७५७५७०.०० |
| ३७८८९०.०० | ५) बँक विमा | ३७५४२८.०० | ३७५४२८.०० |
| ८६७२०.०० | ६) कायदा सल्लागार फी | ४९५०.०० | ४९५०.०० |
| ३५१६००.५० | ७) टपाल, तार, दूरध्वनी, बील व भाडे | ३५६११६.५६ | ३५६११६.५६ |
| १३२९२५०.०० | ८) लेखा परीक्षकांची फी तरतूद | १३३६०६१.३७ | १३३६०६१.३७ |
| १८९६२१६.८५ | ९) झीज व दुरुस्ती | १३९५०६६.२६ | १३९५०६६.२६ |
| २८३८२०.०० | १०) छपाई व स्टेशनरी | १४५३०२.०० | १४५३०२.०० |
| ३९६०.०० | ११) जाहिरात | १२२००.०० | १२२००.००० |
| ९०५९८३६२.४५ | १२) इतर खर्च | | ५७५१९०२२.९९ |
| ११८२१३९.१६ | किरकोळ खर्च | ११८०७५५.०८ | |
| ७००००.०० | सहकारी बँक वर्गणी फेडरेशन व असोसिएशन | ७००००.०० | |
| २३००३०३.०० | पिग्मी कमिशन | २२६५६६१.०० | |
| ३९८११०.०० | प्रवास खर्च व भत्ता | ५४८८२५.७५ | |
| ३३४००.०० | सेवक प्रशिक्षण खर्च | २४५००.०० | |
| १८३६.०० | वाहन खर्च | ०.०० | |
| २८१०६६३.०० | डी.आय.सी. विमा प्रिमियम | २५८९२२९.४५ | |
| ५१८१२३.०० | बँक सुरक्षा गार्ड खर्च | ४१२२४३.०० | |
| ०.०० | कर्मचारी कल्याण निधी वर्गणी | ८९२५.०० | |
| ६६२०००००.०० | बुडीत व संशयीत निधी | ३३३७८६१२.०० | |
| ३१८३३८.०० | गुंतवणूक Amortisation | २१२५४०.०० | |
| ४२६८.२१ | सिबील चार्जेस | २०९३.६४ | |
| ५६Nz४.०५ | एस जी एल चार्जेस | २६१५०.०० | |
| १३३८७.७७ | बँक चार्जेस | ३८२८.५६ | |
| १६१४००.०० | सल्लागार फी | १६००००.०० | |
| १६०५५.२८ | कमिशन | ५३८७४.४२ | |
| ४१३६३८८.०० | मागील वर्षाचा खर्च | ३१५०८१.०० | |
| ५०८८०४.०० | वसुली खर्च | ५९८६३४.०० | |
| १८९२७३१.०० | सी.बी.एस.चार्जेस | १९२९९३०.७५ | |
| ३१७४००.०० | इमारत खर्च | ३१७४००.०० | |
| १५५८४९१.७६ | जी.एस.टी. | २१७१५९०.४० | |
| १०१२३३.०० | कर्मचारी ग्रॅज्युइटी हप्ता | १०४७६८.०० | |
| ३०८९४५.३८ | संगणक खर्च | १३२६७७.८६ | |
| १०४७६०४.५२ | रिकन्सीलेशन ॲडजेस्टमेंट | ०.०० | |
| ३००६७.३२ | एन.पी.सी.आय. चार्जेस | ३०११६.०८ | |
| ०.०० | निवडणूक खर्च | २१७२९३५.०० | |
| ५९०००००.०० | बँक इन्कम टॅक्स प्रॉव्हिजन | ४०००००००.०० | |
| ०.०० | पेनल्टी पेड | २०९५२०.०० | |
| ०.०० | रिकन्सीलेशन तरतूद | ९२२०००.०० | |
| ०.०० | इतर मालमत्ता तरतूद | ३२९७०००.०० | |
| ०.०० | लोन चार्जेस | २१३४७६.०० | |
| ०.०० | प्रशासकीय शुल्क | १६६६५६.०० | |
| ७६३०००.०० | गुंतवणूक घसारा निधी तरतूद | ०.०० | |
| ०.०० | १३) चालू वर्षाचा नफा | | ०.०० |
| **२५९९६९५९७.७७** | **एकूण** | | **२२४३५९०५५.१८** |

| ३१.०३.२०२५ रक्कम रुपये | उत्पन्न | | ३१.०३.२०२६ रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| २२५०२३६७९.१६ | १) कर्ज व गुंतवणुकीवरील व्याज जमा | | २०३४९७११९.८० |
| १६००९४८७०.०३ | अ) कर्जावरील व्याज | १४८३४६३४१.१८ | |
| ८९९३६३७.०० | ब) गुंतवणुकीवरील व्याज | ९१६२५६१.४१ | |
| ५५९३५१७२.१३ | क) गव्हर्नमेंट सिक्युरिटी व्याज | ४५९८८२१७.२१ | |
| २२३१८६.७६ | २) कमिशन एक्स्चेंज | १९०५३६.७३ | १९०५३६.७३ |
| ३४४२६४६.४१ | ३) इतर उत्पन्न | | ५६२७३३७.५० |
| ४४१७१४.८४ | किरकोळ | १२१४०२५.०० | |
| ९००६६९.८७ | सुपरव्हिजन चार्जेस | ४५६५५९.०० | |
| ४६९६३९.०० | लॉकर भाडे जमा | ४५७२८३.०० | |
| १४३४३५.०० | इन्सिडेंटल चार्जेस | १५८५३९.०० | |
| २८०७८७.०० | नोटीस फी | ३६४९७४.०० | |
| १५०.०० | दंड व्याज जमा (रिकरिंग) | ४.५० | |
| १००.०० | डिव्हीडंड जमा | १००.०० | |
| ६२६६५९.७० | प्रायर प्रियर इन्कम | १३८७६.०० | |
| २५१७४०.०० | गुंतवणूक विक्रीवरील नफा | १७००४००.०० | |
| ०.०० | डेडस्टॉक / फर्निचर सेल | ३५००.०० | |
| ८७७२.०० | एन.फ.एस. शुल्क जमा | ३४२६.०० | |
| १०००२५.०० | छपाई खर्च | ९१२९४.०० | |
| २११०९२.०० | आयकरावरील व्याज | ०.०० | |
| २२२८.०० | चेक रिटर्न चार्जेस | ११७८०.०० | |
| ५६३४.०० | सिबील चार्जेस | ३५२४.०० | |
| ०.०० | एक्सेस प्रॉव्हिजन रिझर्व्ह | ११२३०००.०० | |
| ०.०० | ई.सी.एस. रिटर्न बँक | २५०५३.०० | |
| **४४३६०८५२.०७** | **चालू वर्षाचा तोटा** | | **१५०४४०६१.१५** |
| **२५९९६९५९७.७७** | **एकूण :-** | | **२२४३५९०५५.१८** |

तपासले, ऑडीट मेमोतील शेऱ्यास पात्र राहून बरोबर आहे
**व्ही. डी. ए. ॲण्डअसोसिएट्स, चार्टर्ड अकाऊंटंट, पुणे**

**श्री. किशोर मंगेश ब्रम्हे**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**श्री.महादेव सत्याप्पा माळी**
**व्हा. चेअरमन**

**श्री. राहुल सुभाष शहा**
**चेअरमन**

# श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि., बार्शी

**२५४९/१/१ड, जामगांव रोड, बार्शी, जि. सोलापूर पिन- ४१३ ४०१**

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस २०२५-२०२६
**(फक्त सभासदांसाठी)**

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २०/०९/२०२६ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता **'मातृमंदिर', दिनदयाळनगर, कुर्डुवाडी रोड, ढगे मळा, बार्शी** येथे खालील कामकाजाचा विचार करण्यासाठी होणार आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित राहण्यास विनंती आहे.

**-: सभेपुढील विषय :-**

१) दि. १४/०९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २०२६ अखेर संपलेली आर्थिक हिशोब पत्रकांस मान्यता देणे व संचालक मंडळाचा अहवाल स्वीकारणे.
३) संस्थेचे सन २०२५-२०२६ चे लेखापरीक्षक यांनी दिलेल्या लेखापरीक्षण अहवाल स्वीकारणे.
४) संस्थेचे सन २०२५-२६ सालाकरिता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटण्यास मान्यता देणेबाबत.
५) सन २०२६-२०२७ सालाकरिता संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचे वेतन ठरविणे.
६) मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

ठिकाण :- बार्शी
दिनांक :- ०३/०९/२०२६

मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन
**श्री. र. मा. माचवे,** व्यवस्थापक

**टीप :-** १) वरील सर्व बाबींचे कागदपत्रे संस्थेच्या कार्यालयात सुट्टीच्या दिवसाशिवाय कामकाजाच्या वेळेत सभासदांस पाहण्यास ठेवली आहेत. त्याबाबत काही प्रश्न विचारावयाचे असल्यास तसे लेखी प्रश्न दि. १५/०९/२०२६ पूर्वी पाठवावेत. २) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेण्यात येईल. त्यास कोरमची आवश्यकता लागणार नाही.

# श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

## नमुना झेड

**(नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) पहा) स्थावर मालमत्ता ताब्यात घेतलेबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री कृष्णाहरी यल्लप्पा मैसूर C/o श्री महावीर अर्बन को.ऑप. बँक ली., सोलापूर ही संस्था महाराष्ट्र सहकारी कायदा १९६१ अन्वये यादीतील ऋणको (थकबाकीदार) याने रक्कम जमा करण्यास कसूर केले आहे. त्या अर्थी खाली सही करणाऱ्याने खालील नमूद यादीतील ऋणको यांची स्थावर मिळकतबाबत जप्तीची नोटीस देऊन व रजी. गहाणखत अन्वये गहाण ठेवलेली या पुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे. ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला आणि सर्व नागरिकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करण्याऱ्याने त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार प्रतीकात्मक (सिम्बोलिक) ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, खाली नमूद केलेल्या यादीतील मालमत्तेसंबंधी कोणतेही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर या संस्थेच्या खाली नमूद केलेल्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यात होणारे इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | कर्जदार / जामिनदाराचे / मिळकतदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन | सि.स.नं./ गट नं/ क्षेत्र | दिनांक मागणी नोटीस व प्रतिकात्मक ताबा दि.३१/०५/२०२६ अखेर येणेबाकी |
|---|---|---|---|---|
| १ | महमद कासिमसाब सारवाड (अमन स्टील ॲन्ड प्लॅस्टिक सेंटर प्रोप्रा. महमद कासिम साब सारवाड) | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोमपा हद्दीतील | मौजे शेळगी येथील बसवेश्वर नगर मधील गट नं. १९/१/ब प्लॉट नं. ४८ यांची क्षेत्र ९२.९३ चौ.मी चतुसीमाः पूर्वेस - प्लॉट नं. ४९, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं.५०, उत्तरेस - प्लॉट नं.४६ | १७/०६/२०२६ ३१/०८/२०२६ रु. १५,८३,१९०/- |
| २ | सुरेखा धीरज रंगदळ (सुयश मेडिकल स्टोअर्स प्रोप्रा. सुरेखा धीरज रंगदळ) | डी. व सब डी. सोलापूर महानगरपालिका हद्दीतील कसबे सोलापूर | सि.स.नं.११९/१/अ/१/१ प्लॉट नं. ८ यांसी क्षेत्र २२२.१२ चौ.मी. | १७/०६/२०२६ ०१/०९/२०२६ रु. १५,९२,८९३/- |
| | | डी. व सब डी. सोलापूर महानगरपालिका हद्दीतील न्यू पाच्छा पेठ टी.पी.१ | सि.स.नं. १०३८८/३४अ/१/१८, ५ वा मजला, फ्लॅट नं.१७ यांसी क्षेत्र ४२.१० चौ.मी. | |

वरील सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा, ताबा पत्रावर सही करून, खाली नमूद वसुली अधिकारी यांच्याकडे या जाहीर प्रसिध्दीकरण दिनांकापासून १५ दिवसांच्या आत कर्जाची संपूर्ण रक्कम भरून ताबा घ्यावा. अन्यथा तसे न केल्यास मुदतीनंतर सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे अर्ज करून पार पाडले जाईल व तसेच उपरोक्त स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल. तरी त्यापुढील होणाऱ्या सर्व परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : ०१/०९/२०२६**

सही/-
**विशेष वसुली व विक्री अधिकारी,**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली, सोलापूर**

## महत्वाचे...



सोलापूर : भीमशक्ती सामाजिक संघटनेचे प्रदेश सचिव सुबोध वाघमोडे यांच्या यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना प्रकाश जाधव, आरपीआयचे प्रदेश उपाध्यक्ष के. डी. कांबळे भीमशक्ती सामाजिक संघटनेचे राजाभाऊ कदम तसेच पत्रकार बाळासाहेब वाघमोडे व गौतम चौधरी.



### नारायणराव कुचन शाळेच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ सप्टेंबर-**

पद्मशाली बिल्डिंगला १०९ वर्षे पूर्ण झाली. संस्थेच्या नारायणराव कुचन शाळेच्या नवीन वास्तू संकुलाचे भूमीपूजन बुधवारी (दि.२) बालाजी अमाईन्सचे मॅनेजिंग डायरेक्टर डी. राम रेड्डी, महापौर विनायक कोंडयाल व त्यांच्या पत्नी यांच्या उपस्थितीत झाले. उपस्थित मान्यवरांचा संस्थेचे सचिव दशरथ गोप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. श्री. राम रेड्डी यांनी संस्थेच्या कार्याचा, उपक्रमांना दाद देऊन ज्या पूर्वजांनी हि वास्तू बांधून दिली त्यांना धन्यवाद देऊन समाज सदैव त्यांचा ऋणी राहिल. नवीन वास्तू लवकरात लवकर पूर्ण होवो यासाठी माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या महापौर कोंडयाल यांनी समाजाचे पूर्वज कै. विठोबा बड्डेपल्ली व के. सिद्रामप्पा सारंगी यांच्या कुटुंबियांचे आभार मानत ज्यांनी इमारत बांधून दिली. त्यांची संस्थेने त्यांचे कार्य, आठवणी जतन करावे, त्यांची ओळख ठेवावी, त्यामुळे भविष्यात तरुण पिढीला याची माहिती होईल, अशी ईच्छा व्यक्त केली. याप्रसंगी कार्यक्रमास पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सहसचिव मल्लिकार्जून सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम, ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, इंदिरा कुडक्याल, ॲड, शैलजा क्यातम, मुख्याध्यापक पुलकेशी संगा व संस्था संचालित शाखेचे प्राचार्य, मुख्याध्यापक, उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक तसेच नारायणराव कुचन प्राथमिक शाळा व भूदेवीबाई कटकम बालक मंदिरचे सर्व स्टाफ उपस्थित होते.

### मागील भांडणाच्या रागातून तरुणास मारहाण; सहा जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २ सप्टेंबर -**

मागील भांडणाच्या रागातून मध्यरात्री रस्त्यात अडवून एकाला फायटर व लाकडाने बेदम मारहाण करून जखमी केले. तसेच दमदाटी केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. प्रभाकर अंबादास काशीद, स्वप्नील काशीद, संग्राम काशीद ,विवेक कदम, सचिन बन्ने, पुनम काशीद (सर्व रा. भवानी पेठ सोलापूर) अशी गुन्हा दाखल केलेल्या आरोपींची नावे आहेत. किशोर जाधव (रा हनुमान नगर भवानी पेठ) यांनी फिर्याद दिली आहे. ते २८ ऑगस्ट रोजी पहाटे पावणे एक वाजता हॉटेलमधून जेवण पार्सल घेवून राहते घरी जात असताना सिंहगड चौकात प्रभाकर काशीदने पुर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून इतरांना फोन करून बोलावून घेत सर्वांनी मिळून त्यांना शिवीगाळ करून फायटर, लाकूड, काठी, दगडाने मारहाण करून जखमी केले. तुला जास्त मस्ती आली आहे, तुझे विरूध्द पोलीसात खोटे गुन्हे दाखल करतो, तुला तडीपार करायला लावतो अशी दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार वाघमारे हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

### आजारास कंटाळून पेटवून घेतलेल्या वृद्ध महिलेचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि. २ सप्टेंबर-**

आजाराला कंटाळून काडीपेटीने पेटवून घेतलेल्या गवळी वस्ती येथील वयोवृद्ध महिलेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज बुधवारी सायंकाळी सहा वाजता मृत्यू झाला. मालनबाई सुदाम गायकवाड (वय ७५ वर्ष रा.लक्ष्मीपेठ, देगाव रोड,सोलापूर) असे मयत महिलेचे नाव आहे. मालनबाई यांनी आजारपणाला कंटाळून २१ ऑगस्ट रोजी दुपारी राहत्या घरी काडीपेटीने अंगावरील गाऊन पेटवून घेतला होता.त्यात भाजल्याने त्या येथील शासकीय रुग्णालयात उपचार घेतल्यानंतर घरी गेल्या होत्या.त्यानंतर याचा पुन्हा त्रास होत असल्याने त्या एकट्याच उपचाराकरिता सोमवारी सकाळी येथील शासकीय रुग्णालय दाखल झाल्या होत्या. मात्र उपचारादरम्यान त्यांचा आज बुधवारी सायंकाळी मृत्यू झाला.

### उळे येथे पाठीमागून ट्रक धडकल्याने ट्रॅव्हल्स मधील प्रवासी जखमी

**सोलापूर, दि. २ सप्टेंबर-**

तुळजापूर मार्गावरील उळे गावाजवळ पाठीमागून ट्रक धडकल्याने खाजगी बसमधील बाबासाहेब गोपाळ ताटे (वय ४५ रा. छत्रपती संभाजीनगर) हा प्रवासी जखमी झाला. हा अपघात आज बुधवारी सकाळी ६ वाजेच्या सुमारास घडला. ते तुळजापूर ते सोलापूर असा ट्रॅव्हल्स मधून प्रवास करीत होते. उळे गावाजवळ ट्रक धडकल्याने ते जखमी झाले. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# तीन दशकांच्या राजकीय संघर्षानंतर स्नेहभेट

### 'शिंदे-मोहिते-पाटील' पुन्हा एकत्र येणार?

**बबनराव शिंदे यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी विजयसिंह व रणजितसिंह मोहिते-पाटील निमगाव (टें)मध्ये**

**तभा वृत्तसेवा । अनिल जगताप**
**टेंभुर्णी, दि. २ सप्टेंबर-**

गेल्या तीन दशकांपासून माढ्याचे शिंदे विरुद्ध अकलूजचे मोहिते-पाटील असा राजकीय संघर्ष सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात सातत्याने चर्चेचा विषय होता. आमदारकीपासून जिल्हा परिषद, डीसीसी बँक, ग्रामपंचायत आणि विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपर्यंत अनेक ठिकाणी दोन्ही घराणी आमने-सामने उभी



राहिल्याचे चित्र पाहायला मिळाले. मात्र, हृदय प्रत्यारोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया झाल्यानंतर माढ्याचे माजी आमदार बबनदादा शिंदे यांच्या निमगाव येथील निवासस्थानी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील आणि माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी घेतलेल्या भेटीने सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेला अक्षरशः उधाण आले आहे. ही भेट केवळ प्रकृतीची विचारपूस करण्यापुरती मर्यादित असली तरी, दशकांपासून परस्परांचे राजकीय विरोधक असलेली दोन बलाढ्य घराणी पुन्हा जवळ येणार का? याबाबत राजकीय चर्चांना सुरुवात झाली आहे. परंतु राजकारण आपल्या जागी आणि सुसंस्कृतपणा आपल्या जागी हेच या भेटीतून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

#### भविष्यातील सकारात्मक राजकारणाची नांदी

आगामी काळात माढा लोकसभा मतदारसंघासह सोलापूर जिल्ह्यातील राजकीय समीकरणे बदलली आणि शिंदे-मोहिते-पाटील एकाच राजकीय व्यासपीठावर आल्यास त्याचा परिणाम जिल्ह्याच्या विकासासह राजकारणावर मोठ्या प्रमाणात होऊ शकतो, अशी चर्चा राजकीय जाणकारांमध्ये सुरू झाली आहे. मात्र, दोन बलाढ्य राजकीय घराण्यांची ही जवळीक भविष्यात कोणते नवे राजकीय समीकरण जन्माला घालते, याकडे संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

माढा, माळशिरससह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात अनेक निवडणुकांमध्ये शिंदे आणि मोहिते-पाटील हे एकमेकांच्या विरोधात राजकीय मैदानात उतरल्याची अनेक उदाहरणे आहेत. ग्रामपंचायतीपासून जिल्हा परिषद, सहकारी संस्था, डीसीसी बँक आणि विधानसभा-लोकसभा निवडणुकांपर्यंत या दोन घराण्यांच्या राजकीय संघर्षाचे पडसाद उमटलेले अनेकदा दिसून आले होते. अनेकदा पक्षीय समीकरणांपेक्षाही स्थानिक पातळीवर 'मोहिते विरुद्ध शिंदे' हीच राजकीय चर्चा अधिक प्रभावी ठरल्याचे पाहायला मिळाले. मात्र, राजकारणातील संघर्ष बाजूला ठेवत विजयसिंह मोहिते-पाटील आणि रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी बबनदादा शिंदे यांची भेट घेत त्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. बबनदादां लवकरात लवकर ते पूर्णपणे बरे व्हावेत, अशा शुभेच्छा मोहिते-पाटील यांनी व्यक्त केल्या. ही सदिच्छा भेट असली तरी तिच्या राजकीय अर्थावर सध्या जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे. दोन्ही घराण्यांमध्ये मागे अनेक वर्षांपासून व्यक्तिगत स्नेह आणि ऋणानुबंध होते हे सर्वश्रुत आहे. राजकीय पातळीवर कितीही मतभेद असले तरी वैयक्तिक नात्यांमध्ये कटुता येऊ न देणे, ही या दोन्ही घराण्यांची परंपरा असल्याचे समर्थकांचे म्हणणे आहे. त्यामुळे निमगावातील ही भेट राजकीय संघर्षाच्या पलीकडील नात्याची प्रचिती देणारी ठरली आहे.

# जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची आज बैठक

**विविध विभागांच्या कामांचा आढावा व शासन निर्णयांवरही आज होणार चर्चा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची बैठक गुरुवार, दि. ३ सप्टेंबर रोजी होणार असून, या बैठकीत जिल्ह्यातील विविध विकासकामांचा आढावा, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या जमा-खर्चासह जिल्हा ग्रामविकास निधीच्या माहितीवर चर्चा होणार आहे. त्यामुळे स्थायी समितीच्या बैठकीकडे जिल्हा परिषद वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

बैठकीच्या अजेंड्यावर एकूण सहा प्रमुख विषय ठेवण्यात आले आहेत. प्रारंभी दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करण्यात येणार आहे. त्यानंतर शासनाकडून प्राप्त झालेली महत्त्वाची परिपत्रके व शासन निर्णयांचे वाचन करून त्याची नोंद घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील विविध विभागांकडून सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा हा बैठकीतील महत्त्वाचा विषय ठरणार आहे. कामांची सद्यस्थिती, प्रगती आणि निधीच्या वापराबाबत सदस्यांकडून प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विभागनिहाय विकासकामांच्या अंमलबजावणीबाबत प्रशासनाकडून कोणती माहिती मांडली जाते, याकडे लक्ष आहे.

स्थायी समिती ही जिल्हा परिषदेच्या कामकाजावर देखरेख ठेवणारी महत्त्वाची समिती असल्याने या बैठकीला प्रशासकीयदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. विकासकामांवरील खर्च, निधीचे वितरण आणि विविध विभागांच्या कामांची प्रगती यावर सदस्यांकडून प्रशासनाला जाब विचारला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे बैठकीत विकासकामांच्या गुणवत्तेपासून निधीच्या वापरापर्यंत कोणते मुद्दे पुढे येतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष राहणार आहे. दरम्यान, विविध विषय समित्यांच्या ऑगस्ट २०२६ मधील बैठकींच्या कार्यवृत्ताचीही नोंद घेतली जाणार आहे. याशिवाय स्थायी समितीचे अध्यक्ष तथा सभापती यांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवरही चर्चा होणार आहे.



#### जमा-खर्चास मंजुरीचा विषय

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांकडील जमा-खर्चाचे अवलोकन करून त्यास मंजुरी देण्याबाबत विचार केला जाणार आहे. त्याचबरोबर जिल्हा ग्रामविकास निधीची माहितीही समितीसमोर मांडली जाणार असून, त्यावर चर्चा करून मंजुरी देण्याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे.

# अनुदानित महाविद्यालयांमध्ये ५०१२ सहाय्यक प्राध्यापक पदांच्या भरतीचा मार्ग मोकळा

**उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सुधारित मार्गदर्शक सूचना जारी; सोलापूर विभागातील २३१ पदांचा समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ सप्टेंबर -**

राज्य सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न असलेल्या मान्यताप्राप्त व अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमधील ५०१२ रिक्त सहाय्यक प्राध्यापक पदांच्या पदभरतीसाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अखेर सविस्तर आणि सुधारित मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या रिक्त पदामध्ये सोलापूर विभागातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी संलग्न अनुदानित महाविद्यालयातील २३१ पदांचा समावेश आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ रोजी यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. दिनांक १ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या विद्यार्थी संख्येनार परिणित झालेल्या कार्यभारानुसार, एकूण रिक्त पदांपैकी ५०१२ पदांच्या पदभरतीस पूर्वीच मान्यता देण्यात आली होती. आता या प्रक्रियेत अधिक स्पष्टता, सुटसुटीतपणा आणि पूर्ण पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने सविस्तर अटी व शर्ती जाहीर केल्या आहेत.

**पदभरती प्रक्रियेतील प्रमुख अटी व मार्गदर्शक तत्त्वे**

**ना हरकत प्रमाणपत्र व जाहिरात**

शासनाचे पदभरतीबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्था किंवा महाविद्यालयाने जाहिरातीचा मसुदा मंजुरीसाठी संबंधित विद्यापीठाकडे सादर करावा लागेल.

**शैक्षणिक पात्रता व आरक्ष**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. १८.०७.२०१८ रोजीच्या अधिसूचनेतील नियम ३ व ४, दिनांक ३०.०६.२०२३ मधील सुधारणा तसेच शासन निर्णयानुसार शैक्षणिक पात्रता, सामाजिक व समांतर आरक्षण अचूक असल्याची खातरजमा विद्यापीठाच्या मागास वर्ग कक्षाने करणे बंधनकारक राहील.

**वृत्तपत्रांमधील प्रसिद्धी**

विद्यापीठाने मंजुरी दिल्यानंतर संस्थांनी राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रात तसेच माहिती व जनसंपर्क विभागाने घोषित केलेल्या अ किंवा ब वर्गातील राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करणे अनिवार्य आहे.

**ऑनलाइन अर्ज व पोच पावती**

सर्व संस्था व महाविद्यालयांनी उमेदवारांचे अर्ज ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारावे. याशिवाय ऑफलाइन अर्ज स्वीकारल्यास त्याची पोच पावती देण्याची दक्षता संस्थेने घ्यावी.

**पारदर्शकता आणि गैरव्यवहारास कडक प्रतिबंध**

भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी संपूर्ण मुलाखत प्रक्रियेचे सीसीटीव्ही प्रणालीद्वारे रेकॉर्डिंग करणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे रेकॉर्डिंग मुलाखतीच्या दिनांकापासून किमान एक वर्ष सुरक्षित गोपनीय दस्तावेज म्हणून जतन करावे लागेल. तसेच, भरती प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार सिद्ध झाल्यास संबंधित संस्था किंवा महाविद्यालयावर नियमानुसार कठोर कारवाईचा इशारा शासनाने दिला आहे.

**मुलाखत आणि निवड प्रक्रिया**

उमेदवारांच्या शॉर्टलिस्टींगसाठी यूजीसीच्या नियमांनुसार अपेंडिक्स दोन, टेबल ३बी चा वापर केला जावा. मुलाखतीसाठी निवड समिती यूजीसी अधिसूचना आणि शासन निर्णयानुसार गठित केली जाईल. निवड प्रक्रियेत कोणतीही अनियमितता आढळल्यास संबंधित दोषींवर सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मराठा आरक्षणासाठी मंगळवेढ्यात ठिय्या आंदोलन



**मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा**

**एक मराठा, लाख मराठाच्या घोषणांनी दामाजी चौक दुमदुमला**

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि. २ सप्टेंबर -**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी मंगळवेढ्यातील श्री संत दामाजी चौकात आज ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी सकल मराठा समाजबांधवांनी मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी केली. एक मराठा, लाख मराठा; घोषणांनी चौक दुमदुमला

दामाजी चौकात जमलेल्या हजारो मराठा बांधवांनी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पूर्ण पाठिंबा दर्शविला. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाकडे शासनाने गांभीर्याने पाहून मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवावा, कुणबी प्रमाणपत्रे तात्काळ जारी करावीत आणि जात पडताळणी समित्या रद्द कराव्यात, अशा मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या.

#### तर ४ सप्टेंबरला मंगळवेढा बंद

उद्या (गुरुवार, दि. ३ सप्टेंबर) सकाळी ११ वाजता मंगळवेढा पोलिस स्टेशन व तहसील कार्यालय या ठिकाणी निवेदन देण्यात येणार आहे. सायंकाळपर्यंत मराठा आरक्षणाच्या मागणीवर ठोस निर्णय न झाल्यास शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी मंगळवेढा बंदची हाक देण्यात आली आहे. पुढील आंदोलनाची दिशा शासनाच्या निर्णयानंतर ठरविणार असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

# शहराच्या पर्यटन विकासासाठी चित्राज् सिटी रिसॉर्टचे योगदान

**उद्योजक धीरज जवळकर यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ सप्टेंबर-**

शहराच्या पर्यटन विकासासाठी चित्राज् सिटी रिसॉर्टचे योगदान आहे. सोलापूरचा सर्वांगीण विकास ही केवळ शासन किंवा महानगरपालिकेचे जबाबदारी नसून शहरातील प्रत्येक नागरिक उद्योजक आणि सामाजिक संस्थेची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन चित्राज् सिटी साईड रिसॉर्टचे मालक तथा उद्योजक धीरज जवळकर यांनी केले. ते म्हणाले की, सोलापूरच्या पर्यटन क्षेत्राला चालना देण्याच्या उद्देशाने चित्राज् सिटी साईड रिसॉर्ट कार्यरत आहे. शहराच्या परिसरात पर्यटकांना दर्जेदार निवास, मनोरंजन आणि कौटुंबिक पर्यटनाच्या सुविधा उपलब्ध करून देतानाच स्थानिक युवकासाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे काम रिसॉर्टच्या माध्यमातून केले जात आहे. बाहेरून येणाऱ्या पर्यटकांना चांगल्या सुविधा देणे,



सोलापूरची सकारात्मक ओळख निर्माण करणे, आणि स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे, हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**चित्राज् सिटी रिसॉर्टची प्रमुख वैशिष्ट्ये**

* शंभर खोल्या, भव्य बँक्वेट हॉल, ४० हजार चौरस फुटांचे प्रशस्त लॉन, वॉटर पार्क, अडवेंचर पार्क, क्रिकेटर टर्फ, व्ही.आर.गेम्स शाकाहारी रेस्टॉरंट आणि मीटिंग रूम अशा विविध सुविधा.
* सोलापूर आणि परिसरातील नागरिकांना विवाह सोहळे कौटुंबिक कार्यक्रम व्यावसायिक बैठका आणि पर्यटनासाठी एक सर्वसमावेशक ठिकाण
* पर्यटक तसेच स्थानिक नागरिकांना एकाच ठिकाणी निवास भोजन, मनोरंजन, कौटुंबिक कार्यक्रम आणि व्यावसायिक बैठकांच्या दर्जेदार सुविधा.
* विविध कार्यक्रमामुळे स्थानिक मंडप व्यावसायिक, डेकोरेटर्स, छायाचित्रकार, कलाकार, वाहतूकदार आणि इतर छोट्या उद्योजकांनाही व्यवसायाच्या नव्या संधी.
* सुविधा उपलब्ध होण्यासाठी ८९५६०३३१०० अथवा ८९५६०३३१०१ या क्रमांकावर संपर्क साधावा

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे ७ सप्टेंबर रोजी आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.२ सप्टेंबर : शासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिन आणि पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. त्यानुसार ऑगस्ट महिन्यातील जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

तालुकास्तरीय लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी किंवा तालुकास्तरीय लोकशाही दिनाच्या दिवशी नागरिकांनी आपल्या वैयक्तिक स्वरूपाच्या तक्रारी किंवा अर्ज विहीत नमुन्यात, दोन प्रतींमध्ये संबंधित तहसील कार्यालयात सादर करावेत. तालुकास्तरीय लोकशाही दिनात सादर केलेल्या अर्जावर ३० दिवसांत कार्यवाही न झाल्यास किंवा तालुकास्तरीय लोकशाही दिनातील उत्तराने समाधान न झाल्यास नागरिकांना जिल्हास्तरीय लोकशाही दिनात अर्ज सादर करता येईल. लोकशाही दिनाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्यास पुढील कामकाजाच्या दिवशी लोकशाही दिन आयोजित केला जाईल. अधिक माहितीसाठी नागरिकांनी संबंधित तहसील कार्यालय अथवा जिल्हाधिकारी कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.



### विविध वृत्त.....

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.२ सप्टेंबर : कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या 00.0१ वाजेपासून ते १६ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या २४.00 वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेच्या ऑनलाईन प्रवेशिकेसाठी २५ सप्टेंबरपर्यंत मुदत

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ सप्टेंबर : शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने १६ नोव्हेंबर, २०२६ पासून सुरु होणाऱ्या हौशी मराठी, हिंदी, संगीत व संस्कृत राज्य नाट्य स्पर्धांसाठी तसेच बालनाट्य स्पर्धा व दिव्यांग बालनाट्य स्पर्धांसाठी नाट्य संस्थांकडून २५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने प्रवेशिका मागविण्यात येत असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी दिली. लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नाट्य संस्थांनी महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे श्री.खेडेकर यांनी नमूद केले आहे. महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी डिसेंबर, २०२६ पासून विविध १० केंद्रांवर तर ६५ व्या हौशी हिंदी, संगीत व संस्कृत नाट्य स्पर्धेची अंतिमफेरी प्रत्येकी एका केंद्रावर डिसेंबर, २०२६ पासून आयोजित करण्यात येणार आहे.

नोंदणीकृत हौशी नाट्य संस्थांना तसेच गतवर्षी राज्यनाट्य स्पर्धेत सहभागी झालेल्या नाट्य संस्थांना स्पर्धेसाठी विहित नमुन्यातील प्रवेशिका, नियम संचालनालयाच्या HTTPS://MAHANATYASPARDHA.COM या वेबसाईटवर उपलब्ध होतील. आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रवेशिका २५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत ऑनलाईन सादर कराव्यात. विहित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत. प्रवेशिकेसोबत आवश्यक असणारी कागदपत्रे जोडलेली नसल्यास किंवा संपूर्ण तपशील भरला नसल्यास ऑनलाईन प्रवेशिका भरता येणार नाही.

### मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा;

# सकल मराठा समाजाची आज लातूर जिल्हा बंदची हाक



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ सप्टेंबर : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या सुरू असलेल्या उपोषणास पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने गुरुवारी (दि. ३ सप्टेंबर) लातूर जिल्हा बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

बुधवारी ( दि.२) लातूर येथे झालेल्या मराठा समाजाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर समाजबांधवांनी मोटारसायकल रॅली काढून छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांना अभिवादन केले व तेथुनही त्यांनी बंदची हाक दिली यावेळी रसत्यावर ठिय्या देऊन समाजबांधवांनी आरक्षण समर्थनार्थ व सकारविरोधात घोषणाबाजी केली.

बुधवारी हॉटेल लक्ष्मी येथे झालेल्या बैठकीत समाजबांधव व भगिनींनी मराठा आरक्षणाच्या प्रश्र्नावर आपली भूमिका मांडली. मराठा समाजाची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झाली असून अनेक कुटुंबांना संसाराचा तसेच मुलांच्या शिक्षणाचा खर्च पेलणे कठीण झाले आहे. कर्जबाजारीपणा व नापिकीमुळे समाजीतील अनेक शेतकऱ्यांनी व बेरोजगारीमुळे अनेक तरुणांनी आत्महत्या केल्या आहेत. हे चित्र बदलण्यासाठी मराठा समाजाला आरक्षण मिळणे अत्यंत गरजेचे असून, यासाठीच मनोज जरांगे पाटील आंदोलन करीत आहेत.

मात्र, सरकारकडून वारंवार आश्र्वासने देऊन आरक्षणाचा प्रश्र्न प्रलंबित ठेवला जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. जरांगे पाटील यांच्या प्रकृतीचा व मराठा समाजाच्या परीस्थितीचा विचार करून सरकारने तातडीने आरक्षणाचा प्रश्र्न निकाली काढावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. अन्यथा कोणत्याही मंत्र्याचा अथवा लोकप्रतिनिधीचा कार्यक्रम जिल्ह्यात होऊ देणार नाही, असा इशाराही बैठकीतून देण्यात आला.

हा बंद गुरुवारी सकाळी सात वाजता सुरू होणार आहे. अत्यावश्यक सेवा वगळता शाळा, महाविद्यालये, शिकवणी वर्ग आणि बाजारपेठा बंद ठेवण्यात येणार आहेत. बंदला सहकार्य करण्याचे आवाहन संबंधितांना करण्यात येणार असल्याचे सकल मराठा समाजाच्या वतीने यावेळी सांगण्यात आले.

### लातूरच्या 'व्हीडीजीएमसी'ची कामगिरी। मराठवाड्यात शासकीय रुग्णालयात प्रथमच शस्त्रक्रिया

## श्वासासाठी झुंज, तीन दिवसांच्या बाळावर दुर्बिणीद्वारे यशस्वी शस्त्रक्रिया




तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ सप्टेंबर : जन्माला येऊन अवघे तीन दिवस झालेले बाळ जन्मजात श्र्वासपटलाच्या दोषामुळे श्र्वास घेण्यासाठी झुंजत होते. अशा गंभीर परिस्थितीत लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील डॉक्टरांनी अवघ्या तीन मिलिमीटरच्या छिद्रातून दुर्बिणीद्वारे गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी केली. मराठवाड्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नवजात बाळावर अशा प्रकारची शत्रक्रिया प्रथमच झाल्याचे सांगण्यात आले.

महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पेडीयाट्रीक लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ. संजय पौळ पाटील यांनी ही शस्त्रक्रिया केली, बाळामध्ये जन्मजात श्र्वासपटलाचा दोष असल्याचे गर्भावस्थेतच निदान झाले होते. या विकारात श्र्वासपटलामध्ये दोष निर्माण झाल्याने पोटातील आतडी व इतर अवयव छातीच्या पोकळीत जातात. त्यामुळे फुफ्फुसांच्या वाढीवर परिणाम होऊन जन्मानंतर बाळाला श्र्वास घेण्यास गंभीर अडचण निर्माण होऊ शकते. बाळाचा जन्म झाल्यानंतर त्याला श्वसनाचा त्रास सुरू झाला. त्यामुळे कृत्रिम श्वसन यंत्रणेवर ठेवून प्रकृती स्थिर करण्याचे प्रयत्न करण्यात आले. प्रकृती स्थिर झाल्यानंतर शस्त्रक्रियेचा निर्णय घेण्यात आला.

या शस्त्रक्रियेसाठी डॉ. मेघराज चावडा, डॉ. गणेश स्वामी आणि भूलतज्ज्ञ डॉ. शिरसाट यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. शत्रक्रियेनंतर अतिदक्षता विभागात बालरोगतज्ज्ञ डॉ. अजय कुसुंबीवाल, डॉ. किरण होळीकर आणि डॉ. विकास साळुंखे

यांनी बाळाची देखरेख व उपचार केले. ही अतिशय गुंतागुंतीची आणि आव्हानात्मक शस्त्रक्रिया होती. मात्र बालशल्यचिकित्सक डॉ. संजय पौळ-पाटील आणि सहभागी वैद्यकीय पथकाने ती अत्यंत कौशल्याने यशस्वी केली आणि चिमुकल्याला जीवदान दिले. लातूरमध्ये उपलब्ध असलेल्या सुपरस्पेशालिटी सुविधांमुळे हे शक्य झाले. लातूरच्या शासकीय रुग्णालयात ही अत्याधुनिक शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याने मराठवाड्यातील बालरुग्णांना उच्च दर्जाच्या शस्त्रक्रिया सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल पडले आहे, असे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते-पाटील म्हणाले.

पारंपरिक शस्त्रक्रियेच्या तुलनेत दुर्बिणीद्वारे अत्यंत लहान छिद्रांतून शस्त्रक्रिया करता येते. त्यामुळे मोठी जखम, रक्तस्राव आणि संसर्गाचा धोका कमी होतो. शस्त्रक्रियेनंतर बाळाची प्रकृती लवकर सुधारण्यास मदत होते. औषधोपचाराचा कालावधी कमी होऊन बाळाला लवकर दूध सुरू करता येण्याची शक्यता असते. तसेच मोठ्या चिऱ्याचा व्रण राहत नसल्याने भविष्यातील सौंदर्यात्मक परिणामही चांगले राहतात, असे डॉ. संजय पौळ-पाटील यांनी सांगितले.

### यश मिळाले!

नवजात बाळाचे अत्यंत लहान आकारमान आणि छाती-पोटातील महत्त्वाच्या अवयवांची जवळीक यामुळे ही शस्त्रक्रिया मोठे आव्हान होते. शस्त्रक्रियेदरम्यान छातीमध्ये हृदय व फुफ्फुसांसारखे महत्वाचे अवयव, तर पोटाच्या भागात आतडी व किडनी यांसारखे अवयव असतानाही कोणत्याही अवयवाला इजा न पोहोचविता दोषपूर्ण श्र्वासपटलाची दुरुस्ती करण्यात आली. अवघ्या तीन मिलिमीटरच्या छिद्रांमधून दुर्बिणीद्वारे ही नाजूक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली, असे पेडीयाट्रीक लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ. संजय पौळ पाटील म्हणाले.

## शाहू महाविद्यालयात १३१ जणांची मोफत नेत्र तपासणी



तभा वृत्तसेवा

लातूर : शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात राजर्षी शाहू महाविद्यालय ल्युमनी असोसिएशनच्या वतीने 'माय डॉक्टर फॉर यु', या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या हेल्थ केअर सेंटरमध्ये मोफत नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण १३१ विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नेत्रतपासणी करण्यात आली.

महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. इम्रान जमादार यांच्या सहकार्याने दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी हे शिबिर घेण्यात आले. शिबिरामध्ये सहभागींची प्राथमिक आरोग्याबाबत आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. पूर्वीचे नेत्रविकारांचे रिपोर्ट, स्कॅन तसेच चष्मा असलेल्या व्यक्तींना त्यांचे चष्मे सोबत आणण्याचे आवाहन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे ही संस्थेची महत्त्वाची जबाबदारी असून, अशा आरोग्यविषयक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होते, असे यावेळी सांगण्यात आले.

महाविद्यालयाच्या हेल्थ केअर सेंटरच्या माध्यमातून नियमित आरोग्यसेवा व आरोग्यविषयक जनजागृती केली जाते. नेत्रतपासणीसारख्या प्रतिबंधात्मक आरोग्यसेवांचा लाभ विद्यार्थ्यांना व महाविद्यालयाशी संबंधित घटकांना मिळावा, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले. अशा उपक्रमातून माजी विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ होत असून, समाजोपयोगी आरोग्य उपक्रमांमध्ये माजी विद्यार्थ्यांचा सहभाग निश्र्चितच प्रेरणादायी आहे. या उपक्रमासाठी डॉ. अनुजा जाधव, प्रा. माधव शेळके, डॉ. स्वाती फेरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## लातूर शहर विधानसभा मतदार संघाची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध ३० सप्टेंबरपर्यंत दावे-हरकती दाखल करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २ सप्टेंबर : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लातूर जिल्ह्यात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून, आयोगाने जाहीर केलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी लातूर शहर विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. नागरिकांना ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत या प्रारूप मतदार यादीवर दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. त्यानंतर ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत नोटीस टप्पा व दावे-हरकतींचा निपटारा करण्यात येणार असून ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

२३५-लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी प्रारूप मतदार यादी तपासून आवश्यक असल्यास नवीन नाव नोंदणी, नावातील दुरुस्ती अथवा हरकती निर्धारित मुदतीत दाखल कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रारूप मतदार यादी भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून नागरिकांना संबंधित बीएलओ किंवा तहसील कार्यालयातही ती पाहता येणार आहे. उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारुप यादीमध्ये आढळलेले अनमॅप्ड २३,६९८ मतदार आणि नोमलीज असलेले २९,४२७ मतदार, अशा एकूण ५३,१२५ मतदारांच्या दाव्यांची व हरकतींची सुनावणी ३१ ऑगस्ट २०२६ ते २९ ऑक्टोबर २०२६ या नोटीस टप्प्याच्या कालावधीत घेतली जाणार आहे.

ज्या पात्र नागरिकांचे नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट झालेले नाही, तसेच १ ऑक्टोबर २००६ पूर्वी जन्म झालेल्या व १८ वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकांना अथवा नव्याने विवाह झालेल्या महिलांना फॉर्म-६ द्वारे नवीन मतदार नोंदणी करता येईल. यासाठी रंगीत छायाचित्र, आधार कार्ड, दहावीची सनद अथवा टीसी किंवा जन्म प्रमाणपत्र अथवा शालेय प्रवेश निर्गम उतारा, वडिलांचे किंवा आईचे निवडणूक ओळखपत्र, वीज बिल, सन २००२ मध्ये आजी अथवा आजोबा किंवा आई अथवा वडिलांच्या नावाचा मतदार यादीतील तपशील, मतदाराचा मोबाईल क्रमांक, आवश्यकतेनुसार विवाह नोंदणी प्रमाणपत्र आदी कागदपत्रे सादर करावी लागतील.

नाव, पत्ता, वय किंवा छायाचित्रामध्ये दुरुस्ती करण्यासाठी फॉर्म-८ भरावा. यासोबत आधारकार्ड किंवा पॅनकार्ड किंवा वीज बिल किंवा जन्म प्रमाणपत्र किंवा टी.सी. किंवा शालेय प्रवेश निर्गम उतारा अथवा फोटो यासारखे अनुषंगिक पुरावे सादर करावेत. मृत अथवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळण्यासाठी फॉर्म-७ भरता येणार आहे. यासोबत मृत्यू प्रमाणपत्र किंवा संबंधित मतदाराच्या कुटुंबातील सदस्याची फॉर्म-७ वर स्वाक्षरी घ्यावी.

सर्व फॉर्म ईसीआय नेट (एउखछएढ) पद्वारे ऑनलाईन तसेच संबंधित बीएलओकडे ऑफलाईन पद्धतीने भरता येणार आहेत. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर अनमॅप्ड आणि नॉमलीज श्रेणीतील मतदारांची सुनावणी घेऊन आवश्यक पुराव्यांच्या आधारे अंतिम यादीत नावे निश्र्चित करण्यात येणार आहेत. त्यामुळे नोटीस प्राप्त झाल्यानंतर संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह सुनावणीस उपस्थित राहून मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन लातूर शहर विधानसभा मतदारसंघाच्या उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे.

### नवोदय विद्यालय प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ०२ सप्टेंबर : नवोदय विद्यालय समितीमार्फत शैक्षणिक वर्ष २०२७-२८ साठी इयत्ता ९वी आणि ११वी मधील रिक्त जागांवर प्रवेशासाठी लॅटरल एंट्री सिलेक्शन टेस्ट -२०२७ ची ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी विनामूल्य ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. इयत्ता नववी व इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी स्वतंत्र ऑनलाइन नोंदणी पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले आहे.

अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर २०२६ आहे. इयत्ता नववीसाठी HTTPS://CBSEITMS.NIC.IN/२०२६/पींळु९ आणि इयत्ता अकरावीसाठी HTTPS://CBSEITMS.NIC.IN/२०२६/पींळु११ या पोर्टलवर नोंदणी करावी.

## हरवलेले ५९ मोबाईल मालकांच्या स्वाधीन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ सप्टेंबर : शहरातील विविध भागांतून गहाळ अथवा हरवलेल्या मोबाईल शोधण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन तसेच तपासात सातत्य ठेऊन शहरातील विविध पोलीस ठाण्यांनी तब्बल ५९ हरवलेले मोबाईल शोधण्यात यश मिळविले आहे. सर्व मोबाईल फोन त्यांच्या मूळ मालकांना परत केले.

नागरिकांनी पोलीस ठाण्यांमध्ये नोंदविलेल्या गहाळ मोबाईलच्या तक्रारींची दखल घेत लातूर शहर पोलिसांनी विशेष मोहीम राबवून त्यांचा शोध घेण्यास प्राधान्य दिले. त्यासाठी पोलीस अधिकारी व अंमलदारांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्याने अनेक दिवसांपासून हरवलेले मोबाईल शोधण्यात पोलिसांना यश आले.

विवेकानंद चौक हद्दीतील १९, शिवाजीनगर हद्दीतील १५, एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील १५ आणि गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीतील १० असे एकूण ५९ मोबाईल फोन शोधून हस्तगत करण्यात आले. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशांवर पोलीस निरीक्षक संतोष पाटील, पोलीस अंमलदार लक्ष्मण कांदे, अक्षय डिगोळे, पोलीस निरीक्षक समाधान चवरे, पोलीस अंमलदार त्रिंबकेश्र्वर विरकर, पोलीस निरीक्षक अरविंद पवार, पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड व पोलीस अंमलदार योगेश चिंचोलीकर यांनी मोलाची भूमिका बजावली.

# पहिल्या दिवशी ७ लाख ८७ हजार दंडाची वसुली, हेल्मेट स्वारांचे गुलाब पुष्पानी स्वागत

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ सप्टेंबर : एक सप्टेंबर पासून हेल्मेट सक्तीमुळे लातूर शहरात पहिल्या दिवशी ७८७ जणांवर कारवाई करण्यात येऊन त्यांच्याकडून जवळपास ७ लाख८७ हजार रुपयांची वसुली करण्यात आली . यासाठी केवळ वाहतूक शाखाच कार्यरत नव्हती तर प्रत्येक पोलीस ठाण्यांचे अधिकारी - कर्मचारी कारवाईसाठी रस्त्यावर उभे होते . यावेळी वाहतूक शाखेने आवाहन केले की, हेल्मेट सक्ती ही नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी असून नांच्या कारवाईची वाट न बघता स्वतः हून हेल्मेटचा वापर करावा तसेच हेल्मेट खरेदी करताना ते नामांकीत कंपनीचे आणि आयएसआय ट्रेडमार्क असलेले असावे . हेल्मेट सक्तीचा निर्णय होताच शहरात जागोजागी स्टॉल लागलेले दिसत असून ते हेल्मेट किती सुरक्षित आहेत तसेच विक्रेत्यांकडे लायसन्स आहे का, त्यांनी लायसन्स फी भरली आहे का ? याची खातरजमा करावी . जीएसटी बील आणि अधिकृत विक्रेत्यांकडूनच हेल्मेट खरेदी केले तर अपघात झाल्यावर क्लेम होऊ शकतो . या बाबी लक्षात घेऊनच हेल्मेटची खरेदी करावी .

जिल्ह्यात वाढत्या रस्ते अपघातामध्ये मोठ्या प्रमाणात जीव गमवावा लागत असल्याचे चित्र असून हेल्मेट वापर संदर्भात केवळ आवाहन न करता पोलिसांनी स्वतःच्या अधिकारी - कर्मचाऱ्यां पासून हेल्मेट वापराची अंमलबजावणी सुरु करून विना हेल्मेट वाहन चालविणाऱ्या ५८ पोलीस अधिकारी - कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली आहे .



हेल्मेट सक्ती केल्यामुळे घरातून बाहेर पडताना अनेकांनी हेल्मेट घातल्याचे दिसून येत असल्यामुळे अशांना पोलीसांकडून गुलाबाचे फुल देऊन स्वागत करण्यात आले

हेल्मेट सक्ती विषयी लातूर पोलीस अधीक्षक अमोल तांबे म्हणाले की, हेल्मेट हे ओझे नसून कुटूंबाचे सुरक्षा कवच आहे . जिवीतहानी रोखणे हाच या मोहिमेचा उद्देश आहे . पोलिसांनी केलेली कारवाई टाळण्यासाठी नव्हे तर अपघातात आपला जीव वाचावा आणि आपल्या कुटुंबावर दुःखाची वेळ येऊ नये . या भावनेतून प्रत्येकाने हेल्मेट वापरावे . हेल्मेट सक्ती विषयी वाहतूक नियंत्रण शाखेचे सपोनि मनोज जिरगे म्हणतात की, हेल्मेट सक्ती नाही तर कायद्याच्या अंमलबजावणी ला सुरुवात झाली असून दुचाकीस्वारांची यामुळे सुरक्षात होणार असून आज हेल्मेट घातलेले दुचाकीस्वार बघितल्यावर जनजागृतीचे फलीत झाले असे वाटते . केवळ कारवाई हा उद्देश नसून ज्यांना माहिती नाही त्यांना माहितीही करून दिली .

## संक्षिप्त...

### उदयगिरी महाविद्यालयाचे बॅडमिंटन स्पर्धेत घवघवीत यश पुरुष संघ - द्वितीय महिला संघ तृतीय




तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २ सप्टेंबर : स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन ब- विभाग बॅडमिंटन (पुरुष व महिला) स्पर्धेत महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी सक्रिय खेळ दाखवीत पुरुष संघाने द्वितीय क्रमांक तर महिला संघाने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. विजेत्या पुरुष संघामध्ये - संजयदत्तसिंह हजारी, गौरव पांचाळ, शुभम काटे, मांतेश स्वामी, अनिकेत देवणे, निरज मारेवार तर विजेत्या महिला संघामध्ये- कु. वैष्णवी माने, कु. श्रध्दा सुवर्णकार, कु. सृष्टी गुंडरे, कु. आरती गडदे या खेळाडूंचा समावेश होता. खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. सतिश मुंढे व प्रा. रमजू शेख यांचे मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल विजयी सर्व खेळाडूंचे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, उपाध्यक्ष बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लरगे, सहसचिव प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## नाली तुंबली; उपसा करावा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ सप्टेंबर : शहरातील महात्मा गांधी चौक ते मिनी मार्केटदरम्यान असलेली नाली तुंबली आहे. या ठिकाणी रुग्णालय आणि नागरिकांची मोठी वर्दळ असते. नालीतील घाण पाणी रस्त्यावर पसरल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या नालीचा नियमित उपसा करावा, परिसरातील दुकानदार, नागरिकांनी कचरा नालीत टाकु नये, असे आवाहन जागरुक नागरिकांकडून केले जात आहे.

## शेतकरी संघटनेचा रेणापूर येथे रास्ता रोको

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. २ सप्टेंबर : यंदाच्या खरीप हंगामात पावसाने पाठ फिरवल्याने रेणापूर तालुक्यातील शेतकरी गंभीर संकटात सापडला आहे. पावसाअभावी पिके वाळत असून अनेक भागांत पेरणीही होऊ शकलेली नाही. या पार्श्र्वभूमीवर रेणापूर तालुका तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करावा, शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी, या प्रमुख मागणीसाठी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गजानन बोळंगे यांच्या नेतृत्वाखाला मंगळवार (दि. १ सप्टेंबर) रोजी रेणापूर येथील पिंपळफाट्यावर शेतकरी व शेतमजूर यांच्या उपस्थितीत एक तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.



तालुक्यात सरासरीपेक्षा अत्यल्प पाऊस झाल्याने सोयाबीनसह अन्य खरीप पिके पाण्याअभावी करपण्याच्या मार्गावर आहेत. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने कागदोपत्री पाहणी न करता प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन पिकांची व पाण्याची परिस्थिती तपासावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे तसेच कमी पावसाची अचूक आणेवारी निश्र्चीत करून पीकविमा मिळण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, गतवर्षी पीकविम्यापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना न्याय द्यावा, पशुधनासाठी चारा व पाण्याची उपलब्धता सुनिश्र्चीत करून गरज असलेल्या ठिकाणी तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

दुष्काळाच्या परिस्थितीत ग्रामीण भागातील मजुरांच्या हाताला काम मिळावे यासाठी मनरेगाअंतर्गत सर्व पात्र कामे तातडीने सुरू करावीत. तसेच पाणीटंचाई निर्माण झालेल्या गावांमध्ये आवश्यकतेनुसार बोअरवेल अधिग्रहणाची कार्यवाही करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. यावेळी आंदोलनकर्त्यांनी वेगवेगळ्या मागण्यांच्या अनुषंगाने जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गजानन बोळंगे, तालुकाध्यक्ष सचिन निकम पाटील, उपाध्यक्ष उमेश कांबळे, तालुका संपर्कप्रमुख दत्ताभाऊ शिंगडे, शिवराज कुसंगे, व्यंकट बोळंगे विठ्ठल माने, बाबुराव तिडके , संगमेश्र्वर कोराटे, बाबुराव गुडले दगडू कुसंगे, इलाई शेख, राजकुमार नागरगोजे, प्रमोद चिकटे, रंगनाथ चिकटे यांच्यासह शेतकरी व शेतमजूर उपस्थित होते.

## वयाची नाही, जागरूकतेची गरज!

### खाटू श्याम मंदिरात ज्येष्ठ नागरिकांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ सप्टेंबर : डिजिटल युगात वाढत्या सायबर फसवणुकीच्या पार्श्र्वभूमीवर ज्येष्ठ नागरिकांमध्ये डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने खाटू श्याम मंदिर येथे ८० ते ९० ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्राला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या सत्रामध्ये कोणते मोबाईल प्स सुरक्षित आहेत, कोणते प्स वापरताना काळजी घेणे आवश्यक आहे, कोणत्या पला लोकेशनची आवश्यकता असते आणि कोणत्या पला अनावश्यकपणे लोकेशन परवानगी देऊ नये, याबाबत सोप्या आणि प्रभावी पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. तसेच डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाची काळजी आणि सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबतही माहिती देण्यात आली.

या उपक्रमासाठी श्री. राजेश मित्तल यांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश प्रभावीपणे पोहोचविणे शक्य झाले.

राजेश मित्तल यांनी या उपक्रमाबाबत प्रतिक्रिया देताना सांगितले की, हे सत्र अत्यंत प्रभावी आणि उपयुक्त ठरले. आजच्या काळात ज्येष्ठ नागरिकांसाठी अशा प्रकारची डिजिटल सुरक्षा जनजागृती अत्यंत आवश्यक आहे. केवळ ज्येष्ठ नागरिकांसाठीच नव्हे, तर आगामी पिढीसाठीही डिजिटल सुरक्षिततेचे ज्ञान तितकेच महत्त्वाचे आहे. या कार्यासाठी संपूर्ण टीमला मनःपूर्वक शुभेच्छा. तुम्ही अतिशय चांगले कार्य करत आहात. हा उपक्रम QUICK HEAL FOUNDATION यांच्या सहकार्याने आणि राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून राबविण्यात आला.

## लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात रक्षाबंधन व संस्कृत दिन उत्साहात संपन्न




तभा वृत्तसेवा

उदगीर : येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात रक्षाबंधन व संस्कृत दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक वसंत वाघमारे, पर्यवेक्षक कृष्णा मारावार माधव मठवाले तानाजी खोकले प्रमुख पाहुण्या ज्योती हंचनाळे रुपाली गाडेकर आयुष जाधव गुरुदत्त महामुनी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या ज्योती हंचनाळे यांनी आपल्या मनोगतातून रक्षाबंधनाचे महत्त्व विशद केले. तर रुपाली गाडेकर यांनी संस्कृत दिनाचे महत्त्व सांगून संस्कृत भाषेचा गौरवशाली इतिहास सांगितला.

रक्षाबंधनाचे औचित्य साधून विद्यार्थिनी तसेच काही महिला शिक्षिकांनी शहरातील पोलीस स्टेशन व शासकीय आरोग्य केंद्रास भेट देऊन तेथील पोलीस अधिकारी, कर्मचारी व आरोग्यसेवकांना राखी बांधण्याचा अभिनव उपक्रम राबविला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लक्ष्मी चव्हाण, सुप्रिया बुधे, श्रद्धा पाटील,संघप्रिया गायकवाड पंकज देशमुख विष्णू तेलंग निलेश मांडवकर यांनी परिश्रम घेतले.

## श्यामार्य कन्या विद्यालयात रक्षाबंधना निमित्त वृक्षवल्ली आम्हा सोयरे हा संदेश देण्यात आला

तभा वृत्तसेवा

उदगीर : रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या प्रेम, जिव्हाळा आणि संरक्षणाच्या पवित्र नात्याचा सण म्हणून सर्वत्र उत्साहात साजरा केला जातो. याच भावनेला व्यापक पर्यावरणीय संदेशाची जोड देत श्यामार्य कन्या विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, उदगीर येथे रक्षाबंधनानिमित्त वृक्षांना राखी बांधण्याचा अभिनव व पर्यावरणपूरक उपक्रम उत्साहात संपन्न झाला.



या उपक्रमातून वृक्ष वाचवा, वृक्ष जगवा आणि पर्यावरणाचे रक्षण करा असा अत्यंत सुंदर व अर्थपूर्ण संदेश विद्यार्थिनींनी दिला. वृक्ष हे केवळ निसर्गाचे सौंदर्य नसून मानवाच्या जीवनाचा आधार आहेत. ते आपल्याला प्राणवायू, सावली, फळे, औषधी वनस्पती तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी अमूल्य योगदान देतात. त्यामुळे वृक्षांशीही आपले भावनिक नाते निर्माण व्हावे आणि त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

यावेळी श्रीमती वैशाली अनकल्ले यांनी रक्षाबंधन सणाचे महत्त्व विद्यार्थिनींना समजावून सांगितले. रक्षाबंधनाच्या माध्यमातून केवळ भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेम व विश्र्वास दृढ होत नाही, तर ‘रक्षण’ ही संकल्पना व्यापक करून निसर्ग, पर्यावरण आणि वृक्षांचे संरक्षण करण्याची जबाबदारीही आपण स्वीकारली पाहिजे, असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून स्पष्ट केले.

त्यानंतर श्यामार्य कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती संगीता देशमुख यांच्या वतीने वृक्षाला राखी बांधून वृक्षसंवर्धनाचा संदेश देण्यात आला. वृक्षाला राखी बांधताना विद्यार्थिनींमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. वृक्षांचे संगोपन, संवर्धन आणि संरक्षण करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

ज्या वृक्षांनी आपले आयुष्य सुरक्षित ठेवले, त्या वृक्षांचे रक्षण करणे हीच खरी रक्षाबंधनाची भावना आहे, असा भाव या उपक्रमातून प्रकर्षाने अधोरेखित झाला. बहिणीने भावाच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या संरक्षणाची अपेक्षा करण्याबरोबरच, आज वृक्षांच्या मनगटावर राखी बांधून त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारण्याचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरला. राखी तयार करण्याचा वर्कशॉप मध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांनी खूप मोठ्या संख्येने सहभाग नोंदवलेला होता.

## श्रीराम विद्यालयात सेवापुर्ती निमित्त धायगुडे, बारस्कर यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. २ सप्टेंबर : श्रीराम प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय रेणापूर येथे ३१ ऑगस्ट रोजी विहित नियत वयोमानानुसार उपप्राचार्य प्रा.भरत सोपानराव धायगुडे व कलाशिक्षक रंगनाथ अनंतराव बारस्कर यांचा सत्कार संपन्न झाला . या कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी रेणुका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदासराव कुटवाड उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून रेणा सहकारी साखर कारखान्याचे संचालक तुकाराम कोल्हे , जुक्टा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष शिवराम सूर्यवंशी,माजी जिल्हाध्यक्ष शिवाजीराव शिंदे ,पोस्ट बेसिक आश्रम शाळा माजी प्राचार्य वसंतराव रायांमुळे यांची उपस्थिती होती.

व्यासपीठावर रेणुका शिक्षण संस्थेचे सचिव ड पंडितराव उगीले,उपाध्यक्ष रविकांत अकनगिरे,कोषाध्यक्ष ज्ञानोबा बरुरे,सहसचिव विठ्ठलराव कटके संचालक अनिता भातिकरे ,प्राचार्य अनिल कुटवाड , प्राथमिक मुख्याध्यापक चंचला वलसे ,पर्यवेक्षक जुबेर खान पठाण यांची उपस्थिती होती.सर्वप्रथम महादेव बन व विद्यार्थ्यांनी सुंदर सेवापूर्ती गीत सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकअनिल कुटवाड यांनी केले व कार्यक्रमाचा हेतू विशद केला. याप्रसंगी संस्थेच्या वतीने व कर्मचाऱ्यांच्या वतीने भेटवस्तू देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने जगन्नाथ येमले ,शिक्षकांच्या वतीने प्रा.।लहुकांत शेवाळे संस्थेच्या वतीने ड पंडीतराव उगीले यांनी मनोगत व्यक्त केले . जूक्टा संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष । शिवाजी शिंदे यांनी दोघांच्या शैक्षणिक कार्याचे कौतूक केले . जुक्टाचे जिल्हाध्यक्ष तथा राज्य उपाध्यक्ष मारुती सूर्यवंशी यांनी प्रा .भरत धायगुडे यांचे चळवळीतील कार्य व कला क्षेत्रातील रंगनाथ बारस्कर यांच्या कार्याचे कौतूक केले . संस्थेचे अध्यक्ष देविदास राव कुटवाड यांनी सेवापूर्ती निमित्त कार्याचा गौरव करून शुभेच्छा दिल्या . याप्रसंगी प्रा . भरत धायगुडे यांनी संस्था चालकांचे मार्गदर्शन सहकार्यांचे सहकार्य व पालकाच्या विश्र्वासामुळे कार्यास प्रेरणा मिळाली असे सांगितले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृतेश्र्वर स्वामी यांनी तर आभार सुरेखा बसापूरे यांनी मानले . सर्व विद्यार्थी व उपस्थितांनी भोजनाचा आस्वाद घेतला .या कार्यक्रमास माजी प्राचार्य सिध्देश्र्वर मामडगे सेवानिवत्त मु अ . सतिष मोरे मोतीराम गाडे ’जिल्हाभरातून शैक्षणिक सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते व पत्रकार पालक उपस्थित होते .

### शिरूर अनंतपाळ नगरपंचायतचा नियोजन शुन कारभार. लाखो रुपये खर्च करून केलेले विरूगुंळा केंद्राची दुरावस्था

## राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा आंदोलनाचा इशारा

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २ सप्टेंबर : शहरातील गांधी चौक येथील सार्वजनिक सभागृह शेजारी नगरपंचायतीच्या वतीने काही महिन्यांपूर्वी अंदाजे १३ लक्ष रुपये खर्च करून जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी विरंगुळा केंद्र निर्माण केले परंतु या विरंगुळा केंद्रात घाणीचे साम्राज्य तसेच मोठ्या प्रमाणात गवत वापल्यामुळे विरंगुळा केंद्रावर लाखो रुपये खर्च केलेला निधी पाण्यात गेल्याचे चित्र दिसून येत आहे या विरंगुळा केंद्राचा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे व माजी शहराध्यक्ष संदिप धुमाळे यांनी ऐरणीवर आणला असून या बाबतीत आवाळे यांनी बोलताना सांगितले की शिरूर अनंतपाळ नगरपंचायतीच्या वतीने जेव्हा हे विरंगुळा केंद्र करण्यात येत होते तेंव्हा सुद्धा या ठिकाणी विरंगुळा केंद्र न करता शेजारील सभागृह व मोकळी जागा एकत्र करून मोठ सभागृह करण्यात यावे अशी मागणी होती परंतु नगरपंचायत मधील एकहाती सत्तेच्या बळावर निव्वळ गुत्तेदारी करण्याच्या उद्देशाने विरंगुळा केंद्र या गोंडस नावाखाली काम केले गेले असल्यामुळे आज विरंगुळा केंद्राची दुरावस्था झाली असून शिरूर अनंतपाळ नगरपंचायतचे मुख्याधिकारी यांनी पुढील दोन ते तीन दिवसांत तातडीने या विरंगुळा केंद्राची स्वच्छता करून या ठिकाणी लाईटची व्यवस्था करावी जर पुढील तीन दिवसात काम केले गेले नाही तर या विरंगुळा केंद्रातील कचरा नगरपंचायत कार्यालयात टाकून आंदोलन करण्यात येईल असा इशारा महादेव आवाळे व संदिप धुमाळे यांनी दिला.



## अण्णाभाऊ साठे यांचे १०६ जयंती उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २ सप्टेंबर : तालुक्यातील बाकली येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. प्रशांत रावसाहेब पाटील तर प्रा.डॉ. सहदेव विलासराव रसाळ यांची व्याख्याते म्हणून उपस्थिती होती .

सर्वप्रथम अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले .

यावेळी मार्गदर्शन करत असताना डॉ. सहदेव रसाळ यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्याव,र साहित्यावर आणि सामाजिक परिवर्तनातील योगदानावर विचार व्यक्त करून अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य समाज परिवर्तनासाठी व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्या साहित्याने फार मोठे योगदान दिलेले आहे .प्रत्येक नागरिकांनी अण्णाभाऊंचे विचार आत्मसात करून शैक्षणिक प्रगती साधावी आणि साहित्याच्या माध्यमातून त्यांनी वंचित उपेक्षित आणि कष्टकरी समाजाच्या वेदना संघर्ष स्वाभिमानाला प्रभावीपणे वाचा फोडली. समाजासाठी त्यांचे विचार प्रेरणादायी असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास बब्रुवान रक्षाळे उमाकांत पाटील हनुमंत बालुरे पंकज रक्षाळे सुनील बसपुरे राजू क्षीरसागर महादू रसाळ स्वरूप हारगे भरत हारगे गोपाळ हारगे सोमनाथ चित्ते शरद पाटील राहुल पाटील दत्ता पाटील बाबुराव चिंचोल शिवाजी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर जयंती समितीचे पदाधिकारी अध्यक्ष महादू कांबळे सचिव नागनाथ हारगे तसेच परिसरातील नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. महादेव माणिकराव हारगे यांनी केले. तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाजातील सर्व समाज बांधवांनी परिश्रम घेतले .कार्यक्रमानंतर अण्णाभाऊ साठे यांची भव्य मिरवणूक गावामध्ये काढण्यात आली.

## येडेश्वरी मंदिर परिसरात १.४० लाखांचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२ सप्टेंबर -**

येथील येडेश्वरी मंदिर परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने भाविकाच्या सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला मारल्याची घटना २८ ऑगस्ट रोजी घडली. सावरगाव (ता. बार्शी) येथील राहुल सदाशिव गर्जे हे आई व पुतणीसह मंदिर परिसरात खेट्याचा दोरा बांधत असताना चोरी झाली.



दरम्यान, अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेत गर्जे यांच्या जवळील सुमारे १ लाख ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने ह ी चोरून नेले.

याप्रकरणी राहुल गर्जे यांनी १ सप्टेंबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून येरमाळा पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०४, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अज्ञात चोरट्याचा शोध घेत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### खंडाळा धरणावर एनडीआरएफ पथकाचे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

**नळदुर्ग, दि.२ सप्टेंबर -**

रामतीर्थजवळील खंडाळा धरण परिसरात १ सप्टेंबर रोजी आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने एनडीआरएफ पथकाच्या वतीने प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यक्रम घेण्यात आला. एनडीआरएफपथकाचे प्रमुख इन्स्पेक्टर सोकाशे, समन्वयक महादेव झेंडे व २८ सदस्य यावेळी उपस्थित होते. प्रशिक्षणात आपत्ती व्यवस्थापनाच्या साहित्याचा वापर, बोट उपलब्ध नसताना आपत्कालीन बोट तयार करण्याची पद्धत, पाण्यात बुडालेल्या व्यक्तीचा सुरक्षित बचाव तसेच CPR देण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत जलद पोहोचण्यासाठी पोहण्याच्या विविध पद्धती आणि बचावकार्यादरम्यान घ्यावयाची खबरदारी याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार नितीन चौधरी, मंडळ अधिकारी डी.टी. पवार, ग्राम महसूल अधिकारी व्ही.व्ही. वायचळ, महसूल सेवक, १२ आपदा मित्र, रामतीर्थ ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, परिवहन महामंडळाचे व्यवस्थापक पुडले, नगरपालिका अग्निशमन विभागाचे अधिकारी-कर्मचारी, ग्रामस्थ व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रक्षाबंधनातून संस्कारांची जपणूक करा : प्राचार्य कोळगे

**धाराशिव, दि.२ सप्टेंबर -**

भाऊ-बहिणीतील प्रेम, विश्वास आणि आपुलकीची भावना जपण्यासोबतच समाजातील नातेसंबंध टिकवण्यासाठी चांगले संस्कार आवश्यक आहेत. पद, पैसा किंवा प्रतिष्ठेपेक्षा माणसातील संस्कार महत्त्वाचे असतात, असे प्रतिपादन जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनी केले. रुईभर येथील विद्यालयात आयोजित सामुदायिक रक्षाबंधन कार्यक्रमात ते बोलत होते. भावाने बहिणीच्या इच्छा-आकांक्षांचा आदर करून तिच्या रक्षणाची जबाबदारी ओळखावी, तसेच स्त्री-पुरुषांमधील आदरयुक्त नातेसंबंध जपावेत, असेही त्यांनी सांगितले. यावेळी विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना राख्या बांधून रक्षाबंधन उत्साहात साजरे केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष सुभाषदादा कोळगे, रामदास आण्णा कोळगे, राजनारायण कोळगे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सचिन कांबळे यांनी केले.

## पावसाच्या खंडाने खरीप संकटात; पंचनामे करून तातडीने मदत द्या

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२ सप्टेंबर -**

धाराशिव जिल्ह्यासह परंडा, भूम व वाशी तालुक्यात पावसाने मोठा खंड दिल्याने खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. बाधित शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी, यासाठी माजी मंत्री तथा आमदार डॉ. तानाजी सावंत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन पाठपुरावा केला आहे.



जूनमध्ये पेरणी झाल्यानंतर सलग २५ ते ३० दिवस पावसाने दडी मारल्याने पिकांची वाढ खुंटली असून, फुलोरा व शेंगा लागण्याच्या अवस्थेतील पिकांनाही मोठा फटका बसला आहे. काही भागांत ८० ते १०० टक्क्यांपर्यंत पीक नुकसान झाल्याचे सावंत यांनी पत्रात नमूद केले आहे.

**डॉ. तानाजी सावंत यांची उपमुख्यमंत्री शिंदेंकडे मागणी**

भूम, परंडा व वाशी तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात महसूल, कृषी, पंचायत समिती आणि पीक विमा कंपन्यांच्या प्रतिनिधींची संयुक्त बैठक घेऊन मंडळनिहाय नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

गतवर्षीप्रमाणे पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांची अडवणूक होऊ नये आणि प्रत्येक नुकसानग्रस्त शेतकऱ्याला हक्काची मदत मिळावी, यासाठी नुकसानीचा अहवाल तातडीने शासनाकडे सादर करण्याची मागणीही सावंत यांनी केली आहे.

## मराठा आरक्षणासाठी चिखली चौकात रास्ता रोको



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ सप्टेंबर -**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी धाराशिव तालुक्यातील चिखली चौक येथे रस्त्यावर टायर जाळत रस्ता रोको आंदोलन सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले. यावेळी दोन्ही बाजूकडील वाहतूक ठप्प झाली होती.

मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसले आहेत. सरकारने वेळोवेळी आश्वासने देऊनही मराठा समाजाच्या मागण्यांची पूर्तता झालेली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे समाजामध्ये तीव्र नाराजी असल्याचे नमूद करण्यात आले आहे.



मागण्या मान्य करून मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण तातडीने सोडवावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे.

या रास्ता रोको आंदोलनात बलराज रणदिवे, तेजस सुरवसे, समाधान मुळे, संतोष जाधव, सुनिल ढवळे, काकासाहेब खंडाळकर, बालाजी पवार यांच्यासह मराठा समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मल्टीस्टेट क्रेडिट सोसायटीची १५ वी वार्षिक सभा उत्साहात




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ सप्टेंबर -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., आनंदनगर, धाराशिवची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ३१ ऑगस्ट रोजी केशेगाव येथील अरविंदनगर शाखेत संस्थेचे चेअरमन ॲड. चित्राव अरविंद गोरे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली.

सभेत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा लेखाजोखा सभासदांसमोर मांडण्यात आला. त्यास सभासदांनी टाळ्यांच्या गजरात मंजुरी दिली.

तसेच सभासदांच्या भागभांडवलावर १३ टक्के लाभांश देण्याची घोषणा करण्यात आली. यापुढे आधार पडताळणीद्वारे केवायसी प्रमाणीकरण, तसेच संचालक व अध्यक्षांना संस्थेतील व्यवहारांची माहिती मोबाईलवर थेट उपलब्ध करून देण्यासाठी 'लाईव्ह डॅशबोर्ड' प्रणाली राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

आगामी काळात कमी व्याजदरात गोल्ड लोनचा विस्तार आणि अधिकाधिक शाखांमध्ये अल्प दरात लॉकर सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजनही यावेळी जाहीर करण्यात आले.

यावेळी संस्थापक अध्यक्ष अरविंद जनार्धनराव गोरे, व्हा. चेअरमन लईक शेख, संचालक मंडळ, कर्मचारी, सभासद व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रशासन अधिकारी अमोल शदराव पाटील यांनी सूत्रसंचालन व प्रास्ताविक केले. शेवटी संचालक युवराज राजेनिंबाळकर यांनी आभार मानले.

## मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालविणाऱ्यावर गुन्हा

**धाराशिव, दि.२ सप्टेंबर -**

आनंदनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोर्ट कॉर्नर रोड येथे मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालविल्याप्रकरणी प्रफुल पवार (वय ४२, रा. अंबेहोळ, धाराशिव) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, पवार हा दि.१ सप्टेंबर रोजी एमएच २५ व्ही ७२४६ क्रमांकाची दुचाकी मद्यधुंद अवस्थेत चालविताना आढळून आला.

## पावसाच्या खंडाने खरीप पिके संकटात; पंचनामे करून तातडीने मदत द्या : कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ सप्टेंबर -**

जिल्ह्यात मागील महिनाभरापासून पावसाने मोठा खंड दिल्याने सोयाबीनसह इतर खरीप पिकांवर गंभीर परिणाम झाला आहे. जमिनीतील ओलावा कमी झाल्याने पिकांची वाढ खुंटली असून, अनेक ठिकाणी पिके करपण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे पावसाच्या खंडामुळे नुकसान झालेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत व पीक नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे बुधवारी (दि.२) केली.



सध्या सोयाबीन पीक फुलोरा व शेंगा लागण्याच्या महत्त्वाच्या अवस्थेत आहे. मात्र, पावसाचा दीर्घ खंड व वाढत्या तापमानामुळे जमिनीतील ओलावा कमी झाला असून पिकांची वाढ खुंटली आहे. पाण्याअभावी सोयाबीनची फुले व शेंगा गळून पडत असल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे.

शेतीच्या उत्पन्नावर शेतकरी कुटुंबांचा दैनंदिन खर्च, पुढील हंगामाचा खर्च तसेच मुलांच्या शिक्षणाचा खर्च अवलंबून असतो. त्यामुळे पीक उत्पादन घटल्यास शेतकऱ्यांपुढे मोठे आर्थिक संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने शेतकऱ्यांना मदत करावी, असे पाटील यांनी म्हटले आहे.

धाराशिव जिल्ह्यासह पावसाचा खंड पडलेल्या भागांत महसूल व कृषी विभागाच्या माध्यमातून प्रत्यक्ष शेतपातळीवर पाहणी करून सोयाबीन व अन्य खरीप पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करावेत.

पात्र शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत व पीक नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी केली.

## नदीत रक्षा विसर्जन न करता देवराईतील झाडांच्या मुळाशी

### ढेपे कुटुंबाचा पर्यावरणपूरक संदेश...

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२ सप्टेंबर -**

डॉ. नितीन ढेपे यांच्या मातोश्री स्व. शकुंतला ढेपे यांच्या रक्षा नदीत विसर्जित न करता ढेपे कुटुंबाने पाच वर्षांपूर्वी फुलवलेल्या देवराईतील वृक्षांच्या मुळाशी विसर्जित करून पर्यावरण संवर्धनाचा आगळावेगळा संदेश दिला.



ढेपे कुटुंबाने अणदूर येथे आपल्या दोन एकर शेतीमध्ये देवराई फुलवली आहे. पुणे येथील देवराई फाउंडेशनच्या सहकार्याने साकारलेल्या या देवराईमध्ये १०८ मूळ भारतीय वृक्ष-वेलींची लागवड करण्यात आली असून, ती पशुपक्ष्यांसाठी आश्रयस्थान तसेच आयुर्वेदिक व वनस्पतीशास्त्रीय उद्यान ठरत आहे. या ठिकाणी शाळांच्या सहली आयोजित करून विद्यार्थ्यांना वृक्ष व पर्यावरणाची माहिती देण्याचे कुटुंबाचे स्वप्न आहे.

तीन वर्षांपूर्वी डॉ. ढेपे यांचे वडील विश्वनाथ ढेपे गुरुजी यांच्या निधनानंतरही त्यांनी रक्षा नदीत विसर्जित न करता देवराईतील झाडांच्या मुळाशी अर्पण केली होती. त्याच पद्धतीने आई शकुंतला ढेपे यांच्या रक्षेचे विसर्जनही नातवंडांच्या हस्ते देवराईतील वृक्षांच्या मुळाशी करण्यात आले.

देवराईतील झाडांमधून आजी-आजोबा कायम आमच्यासोबत असतील, अशी भावना नातवंडे ऋतुराज, ऋषिकेश, मल्हार, मार्तंड, सागर व श्रीयान यांनी व्यक्त केली.

## सोलार प्रकल्पातील साहित्य चोरी; ९.८५ लाखांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ सप्टेंबर -**

कळंब तालुक्यातील खामसवाडी शिवारातील बी.यू. भंडारी एनर्जी प्रा. लि. कंपनीच्या सोलार प्रकल्पातून अज्ञात चोरट्याने साहित्य चोरी करून तसेच तोडफोड करत एकूण ९ लाख ८५ हजार रुपयांचे नुकसान केल्याची घटना उघडकीस आली आहे.

१३ जुलै ते ११ ऑगस्ट २०२६ दरम्यान अज्ञात व्यक्तीने सुमारे ४ लाख रुपयांचे सोलार प्लेटचे साहित्य चोरीला नेले. तसेच ५ लाख ८५ हजार रुपयांच्या सोलार साहित्याचे नुकसान करण्यात आले.

याप्रकरणी कंपनीचे सेक्युरिटी सुपरवायझर शशिकांत बाबासाहेब पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून १ सप्टेंबर रोजी शिराढोण पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अधिक तपास पोलिस करीत आहेत.

## धाराशिवमध्ये ५ व ६ सप्टेंबरला 'महिला लोककला महोत्सव'

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ सप्टेंबर -**

महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला व लोकपरंपरेचे जतन, संवर्धन आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे धाराशिवमध्ये 'महिला लोककला महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. स्वयंवर मंगल कार्यालय, बार्शी नाका येथे ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता आणि ६ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता हा महोत्सव होणार आहे.

महोत्सवात मंगळागौर, आराधी नृत्य, लावणी, एकतारी भजन, भारूड, भोंडला, भुलाबाई गाणी, शाहिरी तसेच विविध मैदानी खेळांचे सादरीकरण होणार आहे.

महिला लोककलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि पारंपरिक लोककला पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

महोत्सवाचा प्रवेश विनामूल्य असून, नागरिक, कलारसिक व लोककला प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे.

## चिंताजनक : पावसाची दडी, महावितरणचा लपंडाव; येरमाळ्यात सोयाबीन वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२ सप्टेंबर -**

गेल्या दोन आठवड्यांपासून पावसाने दडी मारल्याने फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेतील सोयाबीन पीक वाळण्याच्या मार्गावर आहे. हातातोंडाशी आलेले पीक वाचविण्यासाठी येरमाळा परिसरातील शेतकरी विहीर, बोअर व अन्य जलस्रोतांच्या पाण्यावर स्प्रिंकलर, मिनी स्प्रिंकलर तसेच पाटाने सिंचन करण्यासाठी जीवापाड प्रयत्न करीत आहेत. मात्र, शेतीपंपांचा वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने शेतकऱ्यांची मोठी कोंडी झाली आहे.

येरमाळा महसूल मंडळात यंदा सुमारे साडेसहा ते सात हजार हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी झाली आहे. सुरुवातीला पेरणीस पोषक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी खरीप पिकांची लागवड केली. कोळपणी, खुरपणी, तणनाशक व कीटकनाशकांच्या फवारण्या करून पिकांची योग्य निगा राखल्याने गेल्या दोन महिन्यांत सोयाबीनची वाढ जोमाने झाली.

मात्र, सध्या पावसाने उघडीप दिल्याने प्रखर उन्हात जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे. परिणामी सोयाबीनची झाडे माना टाकू लागली असून, शेंगा व्यवस्थित भरत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. काही ठिकाणी एक-दोनच दाणे असलेल्या शेंगा लागल्याने उत्पादनावर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे.



पीक वाचविण्यासाठी शेतकरी उपलब्ध पाण्यावर सिंचन करीत असले तरी शेतीपंपांसाठी असलेल्या वीजपुरवठ्याच्या वेळेतच दुरुस्तीच्या नावाखाली वारंवार वीज खंडित होत असल्याची तक्रार आहे. दर मंगळवारी तब्बल बारा तास वीजपुरवठा बंद राहत असल्याने शेतकऱ्यांना सिंचन करणे कठीण झाले आहे.

पावसाअभावी संकटात सापडलेले पीक वाचविण्यासाठी शेतकरी रात्री-अपरात्री शेतात पाणी देण्यासाठी धाव घेत आहेत. मात्र, त्याचवेळी वीज उपलब्ध नसल्याने सिंचनात अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे फुलोरा व शेंगा भरण्याच्या निर्णायक टप्प्यावर असलेले सोयाबीन हातचे जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

सुरुवातीला पाऊस चांगला झाल्याने यंदा सोयाबीनचे उत्पादन समाधानकारक होईल, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती.

मात्र, आता पावसाने पाठ फिरवल्याने उपलब्ध जलस्रोतांच्या आधारे पीक वाचविण्याची धडपड सुरू आहे. अशा परिस्थितीत शेतीपंपांना नियमित व सुरळीत वीजपुरवठा मिळणे अत्यावश्यक आहे.

महावितरणने शेतीपंपांचा वीजपुरवठा सुरळीत करून वारंवार होणारा लपंडाव थांबवावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. अन्यथा महावितरणविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे.

## धाराशिवमध्ये २९ सप्टेंबरला 'रोजगार महाकुंभ'

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ सप्टेंबर -**

शिक्षण व कौशल्य असूनही योग्य रोजगाराच्या संधींच्या शोधात असलेल्या युवक-युवतींसाठी धाराशिवमध्ये मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी 'रोजगार महाकुंभ' (पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा) आयोजित करण्यात आला आहे.

पात्र उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता व कौशल्यानुसार थेट रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे. जिल्ह्यातील उद्योग, आस्थापना व व्यावसायिक संस्थांनी मेळाव्यात सहभागी होऊन उपलब्ध रिक्त पदांची माहिती सादर करावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्तांनी केले आहे.


**जाहीर प्रगटनाद्वारे समन्स**

**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद, ता.जि. उस्मानाबाद येथील श्रीमती एस.व्ही. कुलकर्णी, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

बादप्रकांच्या निश्चितीसाठी समन्स
आज्ञावली ५. नियम १.५

सीएनआर-एमएचओएस०२-००२७९१२०२५
नियमीत दिवाणी दावा ३४७/२०२५
अरुण /वि./ राजाभाऊ
निशाणी क्रमांक - ५२

प्रति,
**प्रतिवादी-१. राजाभाऊ बाबुराव जाधव, वय-५२ वर्षे, धंदा शेती,**
**२. सुरज राजाभाऊ जाधव, वय-२४ वर्षे,**
**धंदा- शेती, ३. आकाश राजाभाऊ जाधव, वय २८ वर्षे, धंदा शेती, सर्व रा. कामेगाव, ता.जि. धाराशिव.... यास**

ज्याअर्थी उपरिनामित वादी **अरुण नानासाहेब जाधव, वय ६१ वर्षे, धंदा सेवानिवृत्त, रा. खाडगाव रोड, लातूर ता.जि. लातूर** यांनी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थी ह्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी **दिनांक १३/१०/२०२६ रोजी दिवसा ११:०० वाजता** तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरीत्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तरे देउ शकेल अश्या वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नाचे देउ शकणारे एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याव्दारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याव्दारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेंट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्रेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेंट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काउंटर फ्रेम) पुष्टर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सुची करुन ती सुची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसुर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरीता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसुर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

**आज दिनांक ०२.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

कोर्टाचा शिक्का

**स्वाक्षरित/-**
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, उस्मानाबाद

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सास्तूर येथे दिव्यांग बालकांसाठी मोफत शस्त्रक्रिया शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२ सप्टेंबर -**

लोहारा तालुक्यातील सास्तूर येथे विविध सामाजिक संस्था व आरोग्य संस्थांच्या संयुक्त विद्यमाने ० ते १६ वर्षे वयोगटातील दिव्यांग बालकांसाठी मोफत निवारण शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

स्पर्श ग्रामीण रुग्णालय, सास्तूर येथे ५ सप्टेंबर रोजी पूर्वतपासणी शिबिर होणार असून, निवड झालेल्या बालकांवर ३ व ४ ऑक्टोबर रोजी मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

लातूर व मुंबई येथील तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व शस्त्रक्रिया केली जाणार असून, शस्त्रक्रियेनंतर २१ दिवसांनी तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत मोफत पुनर्तपासणीही करण्यात येणार आहे.

या उपक्रमातून आतापर्यंत १,२०० हून अधिक दिव्यांग बालकांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

गरजू पालकांनी आपल्या दिव्यांग पाल्याची पूर्वतपासणी करून या मोफत शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चारकुरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, स्पर्श ग्रामीण रुग्णालयाचे प्रकल्प अधिकारी रमाकांत जोशी व निवासी दिव्यांग शाळेचे मुख्याध्यापक बालाजी नादरगे यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### तुळजापुरात ‘बोंब मारो’ आंदोलन

**तुळजापूर, दि.२ सप्टेंबर -**

मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील हे अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या उपोषणाची व प्रकृतीची सरकारने तातडीने दखल घ्यावी, या मागणीसाठी मराठा क्रांती ठोक मोर्चा व सकल मराठा समाज, तुळजापूर यांच्या वतीने बुधवारी तहसील कार्यालयासमोर ‘बोंब मारो’ आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी सरकारविरोधात घोषणाबाजी करत मराठा समाजाच्या मागण्यांवर तातडीने ठोस निर्णय घेण्याची मागणी केली. तसेच जरांगे पाटील यांचे आमरण उपोषण सोडविण्यासाठी सरकारने तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली. सरकार आंदोलनाकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत, जरांगे पाटील यांच्या प्रकृतीकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला. याबाबतचे निवेदन तुळजापूर तहसीलदारांना देण्यात आले. यावेळी सकल मराठा समाजाचे बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्वरांश राठोडची आर्चरीत कामगिरी

**लोहारा, दि.२ सप्टेंबर -**

तालुक्यातील एकोंडी (लो) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील बालधनुर्धर स्वरांश सुनील राठोड



याने वाशिम येथे झालेल्या धनुर्विद्या (आर्चरी) स्पर्धेत अंडर-१० इंडियन राऊंड प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत कौशल्याचा ठसा उमटवला. यापूर्वी गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील आर्चरी स्पर्धेतही त्याने पदक पटकावले आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत राष्ट्रीय ते जिल्हास्तरावर यश मिळविणाऱ्या स्वरांशच्या कामगिरीचे कौतुक होत आहे. त्याच्या यशाबद्दल मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ तसेच गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### सुंदरवाडीत सप्ताह उत्साहात सुरू

**उमरगा, दि.२ सप्टेंबर -**

तालुक्यातील सुंदरवाडी येथील पंचक्रोशीचे ग्रामदैवत श्री संत दुधागिरी महाराज यांच्या सप्ताहानिमित्त अखंड



हरिनाम सप्ताह व तुकाराम गाथा पारायणास (दि.१सप्टेंबर) पासून प्रारंभ झाला. गेल्या १२५ वर्षांपासून ग्राम स्थांकडून ही धार्मिक परंपरा अखंडपणे जोपासली जात आहे. सप्ताहात दररोज काकड आरती, प्रवचन, कीर्तन व हरिजागराचे आयोजन करण्यात आले आहे. ७ ते १२ सप्टेंबरदरम्यान विविध नामवंत कीर्तनकार व प्रवचनकारांची धार्मिक सेवा होणार आहे. १३ सप्टेंबर रोजी महंत अवधूत पुरी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होऊन रात्री भारुडाचा कार्यक्रम होणार आहे. तर १४ सप्टेंबर रोजी संत दुधागिरी महाराजांची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भजनी मंडळ व समस्त सुंदरवाडी ग्रामस्थ परिश्रम घेत असून, भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



### शाळेला आरो वॉटर प्लांट भेट

**धाराशिव, दि.२ सप्टेंबर -**

स्वर्गीय जयंत विनोदराव लावंड यांच्या स्मरणार्थ विनोद लावंड यांच्याकडून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आळणी येथील विद्यार्थ्यांसाठी आरो वॉटर प्लांट भेट देण्यात आला. विद्यार्थ्यांना स्वच्छ, शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी मिळावे, या सामाजिक भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. या प्लांटमुळे शाळेतील सुमारे २५० विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून, विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. यावेळी विनोद मामा लावंड, रमाकांत चाचा लावंड, श्रीपाल वीर, श्याम लावंड, आप्पा नांदे, हनुमंत लावंड यांच्यासह ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित होते.

### व्यसनमुक्ती जनजागृती अभियान उत्साहात

**इटकळ, दि.२ सप्टेंबर -**

शंभुराजे बहुउद्देशीय सामाजिक संस्था व ग्रामीण



पत्रकार संघ, इटकळ यांच्या संयुक्त विद्यमाने केशेगाव येथील हनुमान नगर तांड्यावर व्यसनमुक्ती जनजागृती अभियान घेण्यात आले. संत सेवालाल महाराज मंदिरात झालेल्या कार्यक्रमाची सुरुवात जगदंबा देवी यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली.रामभक्त दिनेश सलगरे यांनी दारूच्या व्यसनामुळे होणारे कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक नुकसान तसेच मुलांच्या भविष्यावर होणाऱ्या परिणामांबाबत मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यकर्ते दयानंद काळुंके यांनी व्यसनमुक्तीपर गीत सादर करून जनजागृती केली.

# पावसाने पाठ फिरवताच कळंबच्या सोयाबीनला ‘मरणकळा’!

**२५-३० दिवसांपासून पावसाची दडी... | शेंगा भरण्याच्या काळात पीक वाळले.... | बळीराजा आर्थिक संकटात...**



> पावसाअभावी सोयाबीनचे पीक वाया गेले आहे. उसाची वाढही पूर्णपणे खुंटली आहे. त्यामुळे शेतकरी प्रचंड आर्थिक संकटात सापडला आहे. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. आता पाऊस पडला तरी वाळलेल्या पिकांना त्याचा फारसा उपयोग होणार नाही. मात्र, पुढील पिकांसाठी मोठ्या पावसाची नितांत गरज आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनत आहे.
> **- निशिकांत महाजन, शेतकरी**

> सद्यस्थितीत सोयाबीनचे पीक वाळून गेल्याने शेतकऱ्यांच्या हाताला काहीच लागत नाही. शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. खामसवाडी गावातून तलाठ्यांकडे पिकांचे पंचनामे करण्याबाबत लेखी निवेदन दिले आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनाही याबाबत लेखी कळविणार आहोत.
> **- अमोल पाटील, सरपंच, खामसवाडी**

**सुशील पाटील**
**खामसवाडी, दि.२ सप्टेंबर -**

तालुक्यात गेल्या २५ ते ३० दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने सोयाबीन पिकाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. पेरणीपासून जोमात असलेले पीक ऐन वाढीच्या आणि शेंगा भरण्याच्या काळात पावसाअभावी कोमेजून वाळू लागले आहे. हातातोंडाशी आलेले पीक डोळ्यादेखत करपताना पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली असून, बळीराजा पुन्हा एकदा निसर्गाच्या लहरीपणाचा बळी ठरत आहे.

कळंब तालुक्यातील कळंब, मोहा, गोविंदपूर, शिराढोण, ईटकूर आणि येरमाळा मंडळांमध्ये पावसाची स्थिती विशेषतः चिंताजनक आहे. तालुका जिल्ह्यातील सर्वाधिक सोयाबीन पेरा होणाऱ्या भागांपैकी एक असून, यंदा जूनमध्ये वेळेवर पेरणी झाल्याने सुरुवातीला पीक चांगले होते. मात्र, गेल्या काही आठवड्यांपासून पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरले आहे.

पावसाअभावी शेतातील सोयाबीनने माना टाकल्या असून पाने पिवळी पडून गळत आहेत. फुले आणि शेंगा गळण्याचे प्रमाण वाढले आहे. जमिनीत पुरेसा ओलावा नसल्याने पिकावर विविध किडींचा प्रादुर्भाव वाढत आहे. ज्या शेतकऱ्यांकडे विहिरी अथवा बोअरवेलची सोय आहे, ते उपलब्ध तुटपुंज्या पाण्यावर पीक जगविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सोयाबीनसाठी एकरी १२ ते १५ हजार रुपयांपर्यंत खर्च झाला आहे. बी-बियाणे, खते, औषध फवारणी आणि मशागतीवर मोठा खर्च केल्यानंतर आता पावसानेच साथ सोडल्याने उत्पादन निम्म्यावर येण्याची भीती निर्माण झाली आहे.

गेल्या वर्षी सोयाबीनला साधारण ४ हजार २०० ते ४ हजार ६०० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला होता. यंदा मात्र पावसाच्या लहरीपणामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मिळणाऱ्या उत्पन्नातून उत्पादन खर्च भरून निघेल की नाही, अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

सोयाबीनसोबतच ऊस, तूर आणि मूग या पिकांनाही पावसाच्या खंडाचा फटका बसला आहे. उसाची वाढ खुंटली असून तूरही कोमेजू लागली आहे. त्यामुळे खरीप हंगामातील जवळपास सर्वच पिकांवर संकटाचे सावट निर्माण झाले आहे.

पावसाअभावी तालुक्यातील विहिरी आणि बोअरवेलची पाणीपातळी झपाट्याने खालावत आहे. मांजरा नदीही कोरडी पडू लागल्याने शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. अनेक गावांमध्ये टँकरची मागणी वाढत असून, आगामी काळात पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यातच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

पावसाअभावी निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेऊन कळंब तालुका दुष्काळसदृश जाहीर करावा, पिकांचे तातडीने पंचनामे करून पीक विम्याचा लाभ द्यावा आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.



## सामाजिक संरक्षण योजनांच्या संतृप्तीसाठी जिल्हास्तरीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ सप्टेंबर -**

जिल्ह्यातील असुरक्षित, वंचित व गरजू कुटुंबांना शासनाच्या सामाजिक संरक्षण व कल्याणकारी योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळवून देण्यासाठी जिल्हा परिषदेत जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेत योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी विभागीय समन्वयावर भर देण्यात आला.

जिल्हाधिकारी डॉ. किर्तीकिरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यशाळेस मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे उपस्थित होते.

पात्र लाभार्थ्यांची ओळख, योजनांची माहिती, कागदपत्रांची पूर्तता, अर्ज प्रक्रियेस मदत आणि लाभ मिळेपर्यंत पाठपुरावा करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पुजार यांनी दिले.

## ‘व्यसनमुक्त जीवनाचा संकल्प’; कळंबच्या जि.प. प्रशालेत जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ सप्टेंबर -**




**नशामुक्त भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना व्यसनांच्या दुष्परिणामांची माहिती**

जिल्हा परिषद प्रशाला कळंब क्रमांक दोन येथे नशामुक्त भारत अभियानांतर्गत व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये व्यसनांपासून दूर राहण्याबाबत जनजागृती निर्माण करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाला उपजिल्हा रुग्णालय कळंबचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नागनाथ धर्माधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. समुपदेशक तानाजी कदम यांनी विद्यार्थ्यांना तंबाखू, गुटखा, दारू तसेच इतर व्यसनांचे शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आर्थिक दुष्परिणाम समजावून सांगत व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अन्सारी एस. बी. यांची प्रमुख उपस्थिती होती. यश मेडिकल फाउंडेशनच्या अधिकारी स्वाती भातलवंडे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. व्यसनांमुळे आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम, कुटुंबावर येणारा आर्थिक व सामाजिक ताण तसेच विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर होणारा परिणाम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी ‘व्यसनमुक्त जीवन जगण्याचा संकल्प’ करण्याचा संदेश दिला. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## सावंतांच्या पुढाकाराने शिराळा उपसा सिंचन योजनेला जीवदान!

**१९ ते २० गावांतील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार...**



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२ सप्टेंबर -**

**भैरवनाथ शुगर्सकडून १२ लाखांचा धनादेश**

परंडा तालुक्यातील शिराळा उपसा सिंचन योजनेचे थकीत वीज बिल न भरल्याने महावितरणने वीजपुरवठा खंडित केला होता. ऐन दुष्काळी परिस्थितीत सिंचनाची सुविधा उपलब्ध असूनही पाण्याअभावी शेतकऱ्यांची पिके धोक्यात आली होती. ‘पाणी उशाला, पण कोरड शेतकऱ्यांच्या शेताला’ अशी परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांनी योजना तातडीने सुरू करण्यासाठी महावितरणकडे वारंवार पाठपुरावा केला. मात्र, थकीत वीज बिल भरल्याशिवाय वीजपुरवठा सुरू करता येणार नसल्याची भूमिका महावितरणने घेतली.

ही बाब शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आल्यानंतर अण्णासाहेब जाधव, अशोक गरड आणि गुलाब शिंदे यांनी शेतकऱ्यांसह पुणे येथे जाऊन भूम-परंडा-वाशी मतदारसंघाचे आमदार तथा माजी मंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांची भेट घेतली. यावेळी शिराळा उपसा सिंचन योजनेची सविस्तर माहिती देत थकीत वीज बिलाचा प्रश्न सोडवून योजना तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली.

शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेत आमदार तानाजीराव सावंत यांनी तातडीने पुढाकार घेत भैरवनाथ शुगर्सच्या माध्यमातून १२ लाख रुपयांचा धनादेश उपलब्ध करून दिला. हा धनादेश शेतकरी व पदाधिकाऱ्यांनी महावितरणचे धाराशिव येथील कार्यकारी अभियंता रडे यांच्याकडे सुपूर्द केला. तसेच शिराळा उपसा सिंचन योजना लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी करण्यात आली.

या निर्णयामुळे दुष्काळाच्या छायेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, सिंचनाबरोबरच अनेक गावांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मार्गी लागण्याची शक्यता आहे.

यावेळी परंडा पंचायत समितीचे सभापती यांचे प्रतिनिधी तथा शिवसेना तालुकाप्रमुख अण्णासाहेब जाधव, लोणीचे सरपंच वसंत जगताप, उपसरपंच विनोद शिंदे, माजी सरपंच शहाजी शिंदे, सीताराम पाटील, विकास शिंदे, उज्ज्वल शिंदे, पांडुरंग पाटील, पिंपरीचे माजी सरपंच अशोक गरड, कपिलापुरीचे गुलाब शिंदे, आसूच्या माजी सरपंच महालिंग राऊत, वडनेरचे हमीद शेख, रामभाऊ कदम, नवनाथ काशीद, शिराळा गावचे भारत आबा ढोरे आदी उपस्थित होते.

> **१२ लाखांच्या मदतीने २० गावांचा प्रश्न मार्गी...**
> शिराळा उपसा सिंचन योजनेचे १२ लाख रुपयांचे थकीत वीज बिल आमदार तानाजीराव सावंत यांनी भैरवनाथ शुगर्सच्या माध्यमातून महावितरणकडे सुपूर्द केले. त्यांच्या या पुढाकारामुळे शिराळा उपसा सिंचन योजनेचा वीजपुरवठा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, १९ ते २० गावांतील शेतकऱ्यांच्या शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. या निर्णयाबद्दल तालुक्यातील शेतकऱ्यांनी आमदार सावंत यांचे आभार मानले आहेत.

## मराठा आरक्षणासाठी आज धाराशिव जिल्हा बंद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ सप्टेंबर -**

मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी दि.३ सप्टेंबर रोजी धाराशिव जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. या बंदला जिल्हा व्यापारी महासंघानेही पाठिंबा जाहीर केला असून, व्यापाऱ्यांनी दुकाने व व्यावसायिक आस्थापना बंद ठेवून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

जिल्ह्यातील विविध तालुक्यांत मराठा समाजाच्या बैठका घेऊन बंद शांततेत पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बंदच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी कायदा-सुव्यवस्था व शांतता राखण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अत्यावश्यक सेवा सुरू राहण्याची शक्यता आहे.

## सापडलेला १५ हजारांचा मोबाईल प्रामाणिकपणे केला परत



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२ सप्टेंबर -**

नळदुर्ग बसस्थानकात बसमध्ये फिरून शेंगदाणे, गोळ्या, बिस्कीट व पाण्याच्या बाटल्या विकणाऱ्या खंडुशा बताले या युवकाने सापडलेला १० ते १५ हजार रुपये किमतीचा अँड्रॉइड मोबाईल वाहतूक नियंत्रकाकडे जमा करून प्रामाणिकतेचे दर्शन घडविले.

दि.१ सप्टेंबर रोजी बसस्थानकातील बाकड्यावर खंडुशा यांना मोबाईल सापडला. त्यांनी तो स्वतःकडे न ठेवता वाहतूक नियंत्रक महेश डुकरे यांच्याकडे जमा केला. त्यानंतर मोबाईलवर आलेल्या फोनवरून तो सलगरा (ता. तुळजापूर) येथील श्रीमंत गायकवाड यांचा असल्याचे स्पष्ट झाले. ओळख पटविल्यानंतर वाहतूक नियंत्रक महेश डुकरे, पोलीस कॉन्स्टेबल कुंभार, सामाजिक कार्यकर्ते विशाल डुकरे, एस. के. गायकवाड व उत्तम झेंडारे यांच्या उपस्थितीत मोबाईल गायकवाड यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

त्यांच्या या कृतीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## नळदुर्गेतील १३३ गुंठेवारी प्रकरणांची चौकशी करा

### सुधीर पोतदार यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२ सप्टेंबर -**

नळदुर्ग शहरातील २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षांत दाखल झालेल्या १३३ गुंठेवारी प्रकरणांमध्ये काही बाबी संशयास्पद असल्याचा दावा नगरसेवक सुधीर पोतदार यांनी केला आहे. या प्रकरणांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व नगरविकास सचिवांकडे केली आहे.

नगरपालिकेच्या उपलब्ध यादीनुसार या १३३ प्रकरणांच्या फाईलींमध्ये एकूण ५ हजार ३६९ पाने असून, काही सर्व्हे नंबरमध्ये एकापेक्षा अधिक गुंठेवारी प्रकरणे तसेच काही व्यक्तींची नावे वारंवार आढळत असल्याचे पोतदार यांनी म्हटले आहे. मुळ सातबारा, फेरफार नोंदी, मोजणी नकाशे, मंजूर ले-आउट, मालकी हक्काची कागदपत्रे, स्थळ पाहणी अहवाल, नियमितीकरण आदेश तसेच शुल्काच्या पावत्यांची सखोल तपासणी करण्याची मागणी त्यांनी केली. मुळ जमिनीचे क्षेत्रफळ आणि नियमित करण्यात आलेले क्षेत्रफळ याचा ताळेबंद तयार करावा, तसेच अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करून शासनाचे नुकसान झाल्यास नुकसानभरपाई वसूल करावी, असेही पोतदार यांनी नमूद केले.

गुंठेवारीच्या नावाखाली शासकीय, आरक्षित अथवा रस्त्याच्या जागेवर अनधिकृत प्लॉटिंग झाली आहे का, याचीही चौकशी करावी. ‘गुंठेवारीच्या नावाखाली नेमके काय नियमित झाले?’ हा प्रश्न उपस्थित करत पोतदार यांनी भूमाफियांवर कठोर कारवाई व बेकायदेशीर गुंठेवारी रद्द करण्याची मागणी केली आहे.